# ''२०१४ विधानसभा निवडणूक एक चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ पुणे शहर''

**संशोधन अहवाल**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या

एम. फिल पदवीकरीता राज्यशास्त्र विद्याशाखा अंतर्गत

सादर केलेल्या शोधप्रबंधाचा संशोधन अहवाल


* संशोधक *

**रती सागर शिरोळे**

* मार्गदर्शक *

**डॉ. माणिक सोनावणे**

विभाग प्रमुख राज्यशास्त्र विभाग

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, सदाशिव पेठ, पुणे


**शैक्षणिक वर्ष**

**सन २०१४–२०१५**

# घोषणापत्र

मी खाली सही करणार रती सागर शिरोळे असे घोषित करतो/करते की,

**''२०१४ विधानसभा निवडणूक एक चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ पुणे शहर (कसबा पेठ, पर्वती मतदारसंघ).''**

नावाचा प्रकल्प अहवाल प्रा.डॉ. माणिक सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करुन एम्. फिल सामाजिकशास्त्रे अभ्यासक्रमाच्या परिपूर्ततेसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर करीत आहे. सदर संशोधन कार्य पूर्णत: माझे स्वत:चे मूळ काम असून कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करण्यात आलेली नाही.

संशोधक – रती शिरोळे

स्वाक्षरी

ठिकाण – पुणे

दिनांक –

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की,

हा प्रकल्प अहवाल श्रीमती शिरोळे रती सागर या विद्यार्थीनीने माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. सदर प्रकल्प अहवाल टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, राज्यशास्त्र विभागास सादर केला जात असून हा प्रकल्प यापूर्वी दुसऱ्या कोणत्याही विद्यापीठास किंवा शैक्षणिक संस्थेस सादर केलेला नाही.

संशोधक मार्गदर्शकाची सही

स्वाक्षरी

ठिकाण – पुणे

दिनांक –

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने एम.फील राज्यशास्त्र या अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्षासाठी संशोधन प्रकल्प अहवाल अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून समाविष्ट केल्याने संशोधनाची जी मौलिक संधी मिळाली त्याबद्दल मी विद्यापीठाची आभारी आहे.

तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. माणिक सोनावणे यांचीही मी ऋणी आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय हा संशोधन अहवाल पूर्णत्वास जाणे अशक्य होते.

संशोधक – रती शिरोळे

ठिकाण – पुणे

दिनांक –

# अणुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरणाचे नाव | |
|---|---|---|
| | नुखपृष्ठ | i |
| | प्रथमपृष्ठ | ii |
| | प्रतिज्ञापत्र | iii |
| | ऋणनिर्देश | iv |
| | अनुक्रमणिका | v |
| **प्रकरण १ ले** | **प्रास्ताविक आणि संशोधन पद्धती** | |
| | **प्रास्ताविक** | २ |
| १.१ | संशोधन प्रश्न | ४ |
| १.२ | संशोधन प्रश्नाचे स्पष्टीकरण | ४ |
| १.३ | संशोधन शोध प्रबंधाची उद्दिष्ट्ये | ५ |
| १.४ | गृहितके | ५ |
| १.५ | संशोधनाचे महत्त्व | ६ |
| १.६ | सैद्धांतिक पार्श्वभूमी | ६ |
| १.७ | महत्वाच्या संकल्पना कार्यात्मक व्याख्या | ७ |
| १.८ | अभ्यास विषयातील मर्यादा | ९ |
| **१.२** | **संशोधन पद्धती** | |
| | संशोधन प्रकार | १० |
| | – न्यादर्श पद्धती | १0 |
| | – संशोधन आढावा | १४ |
| | – माहिती संकलनाची साधने | १४ |

| | | |
|---|---|---|
| **प्रकरण २ रे** | **संशोधन साहित्याचा आराखडा** | |
| २.१ | संबंधित साहित्याच्या आढाव्याची उद्दिष्ट्ये | १९ |
| २.२ | संबंधित साहित्याच्या सिंहावलोकनाचे महत्त्व | २० |
| २.३ | संबंधित साहित्याचा आढावा | २० |
| २.४ | संशोधनाचे वेगळेपण | २४ |
| **प्रकरण ३ रे** | **महाराष्ट्रातील सत्ताबदलामागील पार्श्वभूमी** | |
| ३.१ | महागाई | २७ |
| ३.२ | राष्ट्रीय घोटाळे, गैरव्यवहार | ३० |
| ३.३ | बेरोजगारांची समस्या | ३३ |
| ३.४ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या | ३५ |
| ३.५ | भ्रष्टाचार विरोधातील जनआंदोलने | ३९ |
| ३.६ | १६ व्या लोकसभा निवडणूकीचा प्रभाव | ४१ |
| **प्रकरण ४ थे** | **पुणे शहर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीचा आढावा** | |
| ४.१ | पुणे शहराची व परिसराची ओळख | ५० |
| ४.२ | राजकीय पक्ष व राजकीय पक्षांची सद्यस्थितीतील परिस्थिती | ५३ |
| ४.३ | पुणे शहरातील मतदार संघाच्या हद्दीचा परिसर | ५८ |
| ४.४ | मतदार संघातील परिस्थिती | ६० |
| ४.५ | निवडणुकीस उभे राहिलेले उमेदवार | ६३ |

| | | |
|---|---|---|
| ४.६ | माघारी घेतलेले अर्ज, माघार घेतलेले उमेदवार | ६८ |
| ४.७ | जातीचा प्रभाव | ७० |
| ४.८ | निवडणूक यंत्रणा | ७४ |
| ४.९ | पुण्यातील खास प्रचारसभा | ७६ |
| ४.१० | मागील निवडणूक आढावा | ७८ |
| ४.११ | निकाल | ८९ |
| **प्रकरण ५ वे** | **२०१४ पुणे विधानसभा निवडणूक माहितीचे सारणीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचन** | ९२ |
| **प्रकरण ६ वे** | **निष्कर्ष व उपाययोजना, गृहितकांची पडताळणी** | **१११** |
| | **संदर्भग्रंथ सूची** | **११८** |
| | **अनुसूची** | **१२१** |

प्रकरण १

# प्रास्ताविक आणि संशोधनपद्धती

# प्रकरण – १

# प्रास्ताविक आणि संशोधनपद्धती

## प्रास्ताविक :

लोकशाहीत राज्याची अंतिम सत्ता जनतेच्या हाती असते. जनता सार्वभौम असते, हे तत्त्व निवडणुकीच्या माध्यमातून प्रस्थापित होते म्हणून लोकशाहीत निवडणुका महत्त्वाच्या असतात. त्या लोकशाही व्यवस्थेचा अविभाज्य भाग असतात. आधुनिक काळात राज्यांनी प्रतिनिधीक लोकशाहीचा स्वीकार केला आहे. या लोकशाहीत लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी लोकांच्यावतीने राज्यकारभार चालवितात. निवडणुकांमुळे नागरिकांना आपले प्रतिनिधी निवडून राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळते. नागरिक राजकीयदृष्ट्या जागरुक व जबाबदार बनतात. तर लोकप्रतिनिधी (शासन) जबाबदारीने जनतेची इच्छा, आकांक्षा विचारात घेऊन राज्यकारभार चालवितात. जेव्हा नागरिक शासनाची ध्येयधोरणे व कामकाजाबाबत नाराज असतात तेव्हा ते आपली नाराजी निवडणुकीच्या माध्यमातून व्यक्त करून प्रचलित शासन बदलू शकतात. नागरिक शासनाच्या कामकाजाबाबत समाधानी असतील तर ते निवडणुकीतून शासनाला आपला पाठिंबाही दर्शवितात. थोडक्यात नागरिक निवडणुकांच्या माध्यमातून आपले राज्यकर्ते कोण असावेत याचा निर्णय घेऊन शासनावर नियंत्रण ठेवण्याचे अतिशय महत्त्वाचे काम करीत असतात. आपल्याला निवडणुकांना सामोरे जायचे आहे, म्हणून राज्यकर्ते अधिक जबाबदारीने काम करतात. ते लोकांच्या अपेक्षा विचारात घेऊन आपली ध्येयधोरणे निश्चित करतात. भारताच्या राज्यघटनेने सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा स्वीकार करून देशातील १८ वर्षे वयावरील सर्व स्त्री–पुरुषांना मतदानाचा अधिकार प्रदान केलेला आहे. आपला मताधिकार वापरून अत्यंत जबाबदारीने जनतेने शासनाला नियंत्रित केल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे.

लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होत असतात. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून आजपर्यंत राज्यात विधानसभेच्या १२ निवडणुका झाल्या आहेत. त्यापैकी पहिल्या तीन निवडणुकीत काँग्रेसने निर्विवाद विजय संपादन करून राज्याची सत्ता आपल्या हाती ठेवण्यात यश मिळविले म्हणून महाराष्ट्रातील १९६० ते १९७५ दरम्यानच्या राजकारणाचे वर्णन काँग्रेसी व्यवस्था असे केले जाते. [1] (सकाळ, इयर बुक मासिक, प्रथमावृत्ती २०१५) कारण या दिड दशकात राज्याच्या राजकारणावर काँग्रेस पक्षाचे निर्विवाद वर्चस्व निर्माण झाले होते व काँग्रेसमध्ये मराठा नेतृत्त्वाची चलती होती. याचा अर्थ मराठ्यांनी काँग्रेसच्या माध्यमातून राज्याच्या सत्तेवर नियंत्रण मिळविले होते. ७० च्या दशकात श्रीमती इंदिरा गांधींनी राज्यातील मराठा वर्चस्वाला शह देण्याचे राजकारण सुरु केले. परिणामी काँग्रेस अंतर्गत गटबाजी सुरु झाली. या गटबाजीच्या राजकारणाने राज्यातील काँग्रेसी प्रभुत्वाला ग्रहण लागले. काँग्रेसचे राजकीय आधार डळमळीत होऊन राजकारणात स्पर्धात्मकतेचा उदय झाला. या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात बदलाचे वारे वाहू लागले. त्याचा प्रारंभ १९७८ च्या विधानसभा निवडणुकांपासून झाल्याचे दिसते.[2] (डॉ. एकनाथ खांदवे– महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, आरती प्रकाशन, प्रथमावृत्ती, सन २००९.)

महाराष्ट्रात सन २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुका या अनेक अर्थाने ऐतिहासिक आणि राज्याच्या राजकारणाला नवे वळण देणाऱ्या ठरल्या आहेत. या निवडणुकांच्या पूर्वी महाराष्ट्रात १५ वर्षे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारचे शासन होते. त्या आघाडी सरकारचा या निवडणुकीत दारुण पराभव झाला व भाजपप्रणित महाआघाडी भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली नवे सरकार उदयास आले. या निवडणुकांत विधानसभेच्या २८८ जागांपैकी १२२ जागा जिंकून भारतीय जनता पक्ष हा सर्वात मोठा पक्ष ठरला आणि विधानसभेत विश्वासदर्शक ठराव मंजूर झाल्यावरही भाजपने पुन्हा एकदा 'युती' करून शिवसेनेला सत्तेत सामावून घेतले. त्यामुळे सरकारलाही स्थैर्य प्राप्त झाले. पर्यायाने राज्यातील आघाडीच्या राजकारणाचे पर्व संपुष्टात आले. [3] (सकाळ इयर बुक मासिक, प्रथमावृत्ती २०१५)

आघाडी सरकारच्या या निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवास आघाड्यांचे राजकारणच प्रामुख्याने कारणीभूत आहे. या सरकारवर गेल्या पाच वर्षांत आदर्श गृहनिर्माण संस्थेपासून सिंचन तसेच पाटबंधारे खात्यातील भ्रष्टाचाराचे आणि घोटाळ्यांचे मोठे आरोप झाले. त्याच बरोबर हे सरकार याच काळात कमालीचे निष्क्रिय होते. या दोन्ही पक्षांचे बडे नेते हे घराणेशाहीच्या, नात्यागोत्याच्या राजकारणात गुंतून पडले होते. त्यातच सत्तेसाठी एकत्र आलेल्या दोन्ही काँग्रेस सतत एकमेकांना पाण्यात पाहात, एकमेकांबद्दलची उणी-दुणी बाहेर काढून राज्यकारभाराच्या अपयशाचे खापर आपल्याच मित्रपक्षावर फोडत होते. महाराष्ट्रातील जनता यास कंटाळली होती. या निवडणुकीच्या सहाच महिने आधी झालेल्या लोकसभा निवडणुकीत, जनतेने केंद्रातील काँग्रेसप्रणीत आघाडी सरकारच्या कारभाराला विटून भाजपला स्पष्ट बहुमत दिले. त्याचाच प्रभाव महाराष्ट्रावरही पडला. महाराष्ट्राचा कारभार गेल्या काही वर्षात इतक्या बेधुंद पद्धतीने सुरु होता की नरेंद्र मोदी नावाची त्सुनामी न येती तरीही या आघाडी सरकारचा पराभव अटळच होता. या निवडणुकीत एकूण ४,११९ मध्ये महिला उमेदवारांची संख्या फक्त २७६ होती. एकूण २८८ सदस्यांच्या विधानसभा निवडणुकीत फक्त १६ महिला उमेदवार निवडून आल्या. त्यापैकी १० महिला उमेदवार (आमदार) भाजपच्या आहेत. ह्या १० पैकी पुणे विधानसभा मतदारसंघातून भाजपच्या दोन महिला उमेदवार, पर्वती मतदार संघातून माधुरी मिसाळ तसेच कोथरुड मतदार संघातून प्रा. मेधा कुलकर्णी निवडून आल्या. काँग्रेसच्या पाच महिला उमदेवार तर राष्ट्रवादी काँग्रेसची एक. एकंदरीत महिलांची उपेक्षा एका अर्थी केलेली दिसून येते.[4] (सकाळ इयर बुक मासिक, प्रथमावृत्ती २०१५)

या शोधप्रबंधातून सन २०१४ पुणे शहर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीचा आढावा घेतला आहे. तसेच राजकीय सत्तांतराची कारणे देखील अभ्यासली आहेत. पुणे विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकांचा आढावा घेत असताना पुणे शहराची ओळख, विधानसभा मतदारसंघांची ओळख, हद्दीचा परिसर, विधानसभांच्या पुणे शहरातील मतदारसंघाच्या मागील वर्षीच्या निवडणुकांचा तसेच निवडून आलेले उमेदवार, निवडणूक यंत्रणा, प्रचारसभा इत्यादींचा आढावा घेतला आहे. तसेच मतदारांकडून सत्ताबदलाची कारणे शोधली आहेत.

सदर शोधप्रबंधात वर्णनात्मक, संख्याशास्त्रीय संशोधनपद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधन समस्या निश्चित केल्यानंतर प्रत्येक गोष्टीचा पुन्हा पुन्हा शोध घ्यावा लागतो.

''संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे किंवा तथ्ये शोधण्यासाठी व जुनी तथ्ये, तत्त्वे परिक्षणासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय.''

संशोधनाच्या कार्यपद्धतीचे नियोजन करताना म्हणजेच संशोधनाची कार्यवाही करताना संशोधन पद्धती, न्यादर्श माहिती संकलनाची साधने, संख्याशास्त्रीय साधने इत्यादी बाबींचा विचार केला आहे.

प्रस्तुत प्रकरणात न्यादर्श निवडण्यासाठी कोणती पद्धती वापरावी? माहिती संकलनासाठी कोणती पद्धती वापरावी? माहिती विश्लेषणाची कोणती साधने वापरावी इत्यादी चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली आहे-

## १.१ – संशोधन प्रश्न –

१) १३ व्या विधानसभा निवडणूकीमध्ये भाजपप्रणित महाआघाडीला सत्ता मिळाली? इतर पक्ष सत्तेवर का आले नाहीत. पुणे शहर विधानसभा निवडणूक २०१४ चा समग्र आढावा घेणे. म्हणजे पुणे शहरातील विविध मतदारसंघ, विविध पक्ष, निवडणुकीसाठी उभे राहिलेले उमेदवार, केलेली विकासकामे, दिलेली आश्वासने, मागील वर्षीच्या निवडणूकीचा आढावा. १३ व्या विधानसभेच्या निवडणूकीत जिंकून आलेले उमेदवार यामागील कारणे शोधणे.

२) सत्तांतराची कारणे शोधत असताना खरोखरीच जनतेचा सत्ताधाऱ्यांबद्दल असंतोषच कारणीभूत आहे का?

३) मोदी लाट म्हणजे काय? ती कशी निर्माण झाली? मोदी लाटेचा प्रभाव म्हणजे काय?

४) ह्या अगोदर सत्तेवर असणाऱ्या सरकारने जनतेसाठी कल्याणकारी योजना राबविल्या नाहीत का? त्या योजनांची यशस्वी अंमलबजावणी झाली नाही का? भारतातील लोकांच्या मनात यु.पी.ए. आघाडीबाबात असंतोष आहे का? त्यामागील कारणांचा शोध घेणे.

५) पुणे शहर विधानसभा निवडणूक २०१४ मध्ये फक्त भाजप या पक्षानेच महिला उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उभे केले. इतर पक्षांनी महिला उमेदवार निवडणूकीमध्ये का उभे केले नाहीत?

६) महायुतीचा पाठिंबा भाजपाला होता का?

## १.२ – संशोधन प्रश्नाचे स्पष्टीकरण –

१) महाराष्ट्राच्या राजकारणात, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, मनसे, शेतकरी कामगार पक्ष, बहुजन भारिप महासंघ, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया हे पक्ष असताना फक्त भाजप या पक्षालाच या १३ व्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये सत्ता मिळाली. इतर पक्ष सत्तेवर का आले नाहीत.

२) लोकांवर मोदी लाटेचा प्रभाव होता? मोदी लाट प्रसारमाध्यमांनी आणली होती का? हा प्रश्न संशोधन करताना संशोधिकेपुढे होता.

३) जसे पंतप्रधान पद नरेंद्र मोदींना मिळाल्यावर त्यांच्या जनधन योजना, अटल पेन्शन योजना, ग्रामस्वच्छता अभियान या योजना जनतेपर्यंत पोहोचल्या त्याप्रमाणे, युपीए आघाडी सरकारच्या काळातील योजना जनतेला माहिती नाहीत का?

४) पुणे शहरातून भाजपच्या दोन महिला उमेदवार मेधा कुलकर्णी व माधुरी मिसाळ यांना उमेदवारी १३ व्या विधानसभा निवडणुकीमध्ये दिली गेली होती. परंतु पुणे शहरामध्ये इतर पक्ष काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, शिवसेना, बहुजन महासंघ, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया हे इतरही अनेक पक्ष आहेत. त्यांनी महिलांना निवडणूकीच्या रिंगणात का उभे केले नाही.

५) महायुतीमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, शेतकरी कामगार पक्ष, बहुजन महासंघ हे पक्ष येतात. त्यांनी या निवडणुकीत भाजपबरोबर जायचा निर्णय घेतला होता का? हा संशोधिकेसमोर प्रश्न होता.

## १.३ – संशोधनाची उद्दिष्टे :-

१. पुणे शहर विधानसभा निवडणूक २०१४ चा समग्र आढावा घेणे.
२. पुणे शहर विधानसभा निवडणूक २०१४ अन्वयाने सत्तांतराची कारणे अभ्यासणे.
३. पुणे विधानसभा निवडणूकीमध्ये जातीपेक्षा विकासाला प्राधान्य दिले होते का? याचा अभ्यास करणे.
४. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४ मध्ये सक्रीय सहभागी असलेल्या पक्ष व गटातटांचा आढावा घेणे.
५. विधानसभा निवडणूक २०१४ च्या माध्यमातून लिंगभावाधारित राजकारणाचा आढावा घेणे.
६. विधानसभा निवडणुकीवर मोदी लाटेचा प्रभाव होता का? ह्याचा अभ्यास करणे.

## १.४ – गृहितके:-

१. पुणे शहर, विधानसभा निवडणूक २०१४ मधील सत्तांतराला काँग्रेस, राष्ट्रवादी आघाडी सरकारातील प्रस्थापितांवरील असंतोष कारणीभूत आहे. महिलांची असुरक्षितता, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महागाई, भ्रष्टाचार, घोटाळे, निवडणूकीत दिली जाणारी पोकळ आश्वासने यांना जनता कंटाळली होती त्याचे पर्यवसन २०१४ सालच्या विधानसभेच्या निवडणूकीत दिसून येते.
२. पुणे विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक २०१४ वर मोदी लाटेचा प्रभाव होता.
३. पुणे विधानसभा मतदारसंघ निवडणूक जातीच्या प्रभावापेक्षा विकासाला प्राधान्य देणारी होती.
४. १३ वी विधानसभेची निवडणूक लढल्यामुळे कोणत्याच पक्षाला बहुमत मिळणार नाही. त्यामुळे सत्ता स्थापनेसाठी आघाडी/युती करावी लागेल.
५. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीवर पुणे शहरामध्ये महिलांचा प्रभाव पडला नाही.

## १.५ – संशोधनाचे महत्त्व :-

१. प्रस्तुत शोधप्रबंधातून पुणे शहरातील कसबापेठ व पर्वती विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकांचा संपूर्ण आढावा घेतला आहे.

२. मतदारसंघ ओळख, हद्दीचा परिसर, मागील मतदार संघातील निवडणूकांचा निकाल, उभे राहिलेले उमेदवार, जिंकलेले तसेच, पराभूत उमेदवार, प्रचार साहित्यामधील नाविन्यता; निवडणूक यंत्रणेची कार्यक्षमता राबविलेल्या योजना, आचारसंहिता व उमेदवारावर दाखल झालेले गुन्हे इत्यादी संदर्भात संपूर्ण आढावा घेतला आहे.

३. तसेच विधानसभा निवडणूक २०१४ मध्ये महाआघाडी हा गट बहुमताने निवडून आला. ह्यामागील राजकीय सत्तांतराची कारणे शोधण्यासाठी संशोधनाचे महत्त्व आहे.

४. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीवर मोदी लाटेचा काही परिणाम झाला होता का? हे पाहण्यासाठी या संशोधनाचे महत्त्व आहे.

५. सामाजिक संस्था, राजकीय संस्था यांना विविध प्रकारचे प्रकल्प राबविण्यासाठी मदत होणार आहे. भविष्यात, संशोधन कर्त्यास माहितीचा दुय्यम स्रोत म्हणून उपयोग होणार आहे. महाआघाडी सत्तेवर येण्यामागील कारणे समजल्यामुळे विरोधी पक्षाला स्वतःच्या चुका सुधारण्यास व पुढील धोरणे आखण्यास मदत होणार आहे.

६. २०१४ विधानसभा निवडणुकीवर महिला उमेदवारांचा प्रभाव होता का हे पाहण्यासाठी संशोधनाचे महत्त्व आहे.

## १.६ – सैद्धांतिक पार्श्वभूमी:–

**१.६.१ : पोलॉक :** पोलॉक या राज्यशास्त्रज्ञाच्या मते, सार्वजनिक निवडणूकांचे आयोजन काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने करण्यात आले नाही तर केवळ सार्वजनिक सेवांचीच नाचक्की होते असे नाही तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच धोक्यात येते. लोकशाहीतील निवडणूका मुक्त व स्वतंत्र वातावरणात होणे महत्त्वाचे असते. [5] (डॉ. प्रकाश पवार, 'महाराष्ट्राच्या राजकारणाची पुर्नस्थापना' मार्च २००९, प्रतिमा प्रकाशन.)

### १.६.२ : मार्शल :-

मार्शलच्या मतानुसार नागरिकांच्या राजकीय अधिकाराअंतर्गत निवडणूकीमध्ये (Elections) सहभाग घेण्याचा अधिकार आणि राजकीय सत्तेशी संबंधीत असलेल्या संस्थांमध्ये कार्य करण्याच्या अधिकारांचा समावेश होतो. मग ती संस्था विधीमंडळ असो की मंत्रीमंडळ असो. तसे पाहिले तर राजकीय अधिकारांची तरतूद ही मागणी करीत असते की निश्चित प्रक्रियेनुसार (Procedure) राजकीय सत्ता प्राप्त करण्याचा मार्ग सर्वांसाठी खुला असावा. सर्वसामान्य लोक आपल्या पसंतीच्या शासकाला निवडू शकतील, न पटणाऱ्या शासकांना बदलू शकतील. सरकारची धोरणे, निर्णयांना प्रभावित करू शकतील. पर्यायी धोरणे व कार्यक्रम यांची मांडणी करू शकतील. साम्यवादी देशांमध्ये (जसे की जनवादी चीन

गणराज्य आणि पूर्वीच्या सोव्हिएत संघामध्ये) राजकीय सत्तेवर एकाच पक्षाचा म्हणजे साम्यवादी पक्षाचा एकाधिकार होता. तिथे निवडणूका होत राहिल्या. परंतु उमेदवाराची निवड करण्याचा अधिकार मात्र सत्ताधारी पक्षाकडे राहिला. सर्वसामान्य जनतेत सत्ताधाऱ्यांमध्ये बदल करण्याची क्षमता राहिली नाही. त्यामुळे तिथे खऱ्या अर्थाने नागरिकांना राजकीय अधिकार मिळाले नाही. तरीसुद्धा ते आपल्या शासनाला 'लोकशाही व्यवस्था' ही संज्ञा देत राहिले.[6] (डॉ. य. ग. शिंदे, 'पुणे जिल्हा परिषद निवडणूक प्रथमावृत्ती २००१, स्नेहवर्धन पब्लिशींग हाऊस, पुणे)

मार्शलने मांडलेल्या विचारांचा २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत वापर झालेला दिसून येतो. या निवडणूकीमध्ये जनतेमध्ये असंतोष काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीबाबत होता. या निवडणुकीमधे सर्वसामान्य लोकांनी, जनतेने आपल्या पसंतीच्या शासकाला निवडून दिल्याचे दिसून येते. तसेच न पटणाऱ्या म्हणजेच निष्क्रीय असणाऱ्या सत्तेवरील राज्यकर्त्यांना (शासकांना) बदलून टाकण्यात आलेले आहे असे येथे दिसून येते.

## १.७ – महत्त्वाच्या संकल्पना कार्यात्मक व्याख्या :

### १.७.१) निवडणुका :

लोकशाही व्यवस्थेचा 'निवडणूका' हा एक मुख्य आधार असून मतदार आपले प्रतिनिधी निवडणूकांच्या साहाय्याने / माध्यमातून निवडून त्यांच्यामार्फत शासन निर्माण करतात निवडणूका या न्याय्य पद्धतीने व सातत्याने होणे आवश्यक असते. कारण त्यामुळे लोकशाहीचा दर्जा टिकतो. भारताच्या राज्यघटनेत कलम ३२४ व ३२९ या कलमांद्वारे निवडणूक यंत्रणा व प्रक्रियेबाबत वर्णन केले आहे.

### १.७.२) मतदान यादी :

आपल्या भारत देशात सर्वच मतदारांची एक सर्वसाधारण मतदार यादी बनविण्यात आली आहे. भारतीय राज्यघटनेतील ३२५ व्या कलमान्वये संसदेच्या किंवा राज्य कायदेमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या निवडणूकीसाठी प्रत्येक प्रादेशिक मतदारसंघाची 'एक सर्वसाधारण मतदार यादी' (One General Electroral Roll) असेल आणि कोणतीही व्यक्ती धर्म, वंश, जात, लिंग या कारणावरुन वरील यादीत समाविष्ट होण्यास अपात्र समजण्यात येणार नाही.

### १.७.३) मतदार संघ :

लोकसभेच्या किंवा राज्य विधानसभेच्या मतदारसंघाची रचना लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात येते. प्रत्येक राज्यातील सर्व मतदारसंघांच्या लोकसंख्येचे प्रमाण साधारणत: सारखेच राहील. अशी दक्षता मतदारसंघाची निर्मिती किंवा रचना करताना घेण्यात आलेली असते. प्रत्येक जनगणनेनंतर मतदारसंघांची पुनर्रचना केली जाते.

### १.७.४) प्रौढ मताधिकार :

भारतीय राज्यघटनेतील ३२६ व्या कलमान्वये प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वाला मान्यता देण्यात आली आहे. जी व्यक्ती भारताची नागरिक आहे किंवा जिच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाली आहेत अशी प्रत्येक व्यक्ती लोकसभा व विधानसभा निवडणूकीत मतदान करण्यास पात्र ठरते. काही अपवाद वगळता.

### १.७.५) विधानसभा :

राज्यातील कायदेविषयक कामासाठी राज्यविधिमंडळ बनविले जाते. विधीमंडळाची रचना संसदेप्रमाणेच असते. राज्य विधीमंडळाच्या कनिष्ठ गृहास विधानसभा म्हणतात व वरिष्ठ गृहास विधानपरिषद म्हणतात.

### १.७.६) निवडणूक आयोग :

राज्यघटनेच्या कलम - ३२४ नुसार स्वतंत्रपणे कार्यरत राहणारी 'निवडणूक-आयोग' नावाची संस्था प्रस्थापित करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाद्वारे संपूर्ण निवडणूक यंत्रणा आणि पद्धती यांची देखरेख केली जाते.

### १.७.७) आचार संहिता :

आचार संहिता म्हणजे कायदा नव्हे. शांततेने, सुखाने जगण्याचा लोकांचा हक्क कोणी हिरावून घेवू शकत नाही. निवडणूकीची प्रक्रिया सुरु झाल्यापासून निवडणूकीच्या निकालापर्यंतच्या काळात, उमेदवाराकडून, कार्यकर्त्यांकडून लोकांच्या शांततामय जीवन जगण्याच्या कार्यात कोणतेही अडथळे निर्माण होवू नयेत हा हेतू आचारसंहितेमागील असतो.आचार संहिता पाळताना काही गोष्टींचे पालन केले जाते. निवडणुकीत अफाट पैसे खर्च करणे, गाड्यांचा अनिर्बंध वापर, भित्तीपत्रके यांसाठीचा खर्च टाळावा, आचारसंहितेत प्रचार करू नये, मिरवणुका काढू नयेत, परिचयपत्रके काढू नयेत, कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देवू नये, खर्च अधिकाऱ्यांना दाखवून तपासून घेणे.योग्य त्या मुदतीत खर्चाचे विवरण संबंधित अधिकाऱ्यांकडे सुपूर्त करावे. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यापासून अथवा पहिले निवेदन प्रसिद्ध झाल्यापासून आचारसंहिता लागू होते. निवडणूक जाहीर झाल्यापासून मंत्री अथवा इतर अधिकारपदावर असणाऱ्या व्यक्तीने आर्थिक मदत निधी यांची घोषणा करू नये. नव्या प्रकल्पाचे भूमिपूजन करू नये. प्रचारासाठी सरकारी मालमत्तेचा वापर करू नये. शासकीय विमाने, मोटारी, इतर वस्तू इ. चा वापर करू नये. जाहीर सभांसाठी सार्वजनिक जागा, विमानतळ, हेलिपॅड यांचा वापर करू नये. विश्रामगृहे, डाकबंगले. सरकारी तिजोरीतील पैशातील निवडणूकीची जाहिरात देता कामा नये. जात, धर्म, भाषा यांचा वापर करून व्यक्तीगतरित्या भांडणे अथवा संघर्ष निर्माण होईल असे मुद्दे प्रचारात असू नयेत. प्रतिपक्षाच्या खाजगी जीवनावर प्रचारात भाष्य करू नये. धार्मिक, जातीयतेवर आधारित वक्तव्य करू नयेत, प्रचारासाठी मंदीर, चर्च, मशिद, धार्मिक स्थळांचा वापर करू नये. मतदारांना लाच देणे, दमदाटी

करणे, खोटे मतदान, मतदारांना मतदान केंद्रावर जाण्यासाठी वाहनांची सोय. सभेसाठी पोलिसांची परवानगी. प्रतिपक्षाच्या नेत्यांचे फोटो जाळणे अथवा मतदारांच्या भावना भडकतील असे कृत्य करू नये. मिरवणुका वाहतुकीला अडथळा येणार नाही याची काळजी घेणे. मतदानाच्या वेळेस – दारुचे वितरण करू नये. अनावश्यक गर्दी टाळावी. आचारसंहितेत स्पष्ट केलेल्या तरतूदीप्रमाणे वागावे.[7] (प्रा. व्ही. बी. पाटील, 'भारतीय राज्यव्यवस्था – महाराष्ट्राच्या संदर्भासह')

**१.७.८ भारतामध्ये दोन प्रमुख आघाड्या आहेत त्या म्हणजे एन. डी. ए. आघाडी व यु.पी.ए. आघाडी भारतातील प्रमुख आघाड्या व त्यामध्ये समाविष्ट असलेले पक्ष पुढीलप्रमाणे आहेत.**

**एन.डी.ए.–**

भारतीय जनता पार्टी, तेलगु देसम पार्टी, शिवसेना, देसीय मुरपोकु द्रविड कडगम, शिरोमनी अकाली दल, मिताली मक्कल कटची, मारुमलार्ची द्रविड मुन्नेत्र कडगम, लोक जनशक्ती पार्टी, अपना दल, हरयाना जनहित काँग्रेस, स्वाभिमानी पक्ष, इंधिया जननयागा कच्छी, कोंगुंडु मक्कल देसिया कच्छी, ऑल इंडिया एन.आर. काँग्रेस, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले), राष्ट्रीय समाज पक्ष, रेव्हॉल्युशनरी सोशॅलिस्ट पार्टी (बोलशेविक), केरला काँग्रेस (नॅशलिस्ट)

**युपीए–**

इंदिरा राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रीय जनता दल, राष्ट्रीय लोक दल, झारखंड मुक्ती मोर्चा, जम्मु अॅण्ड काश्मिर नॅशनल कॉन्फ्रेन्स, महान दल, इंडियन युनियन मुस्लिम लिग, सोशॅलिस्ट जनता, केरला काँग्रेस, रेव्हॉल्यूशन सोशलिस्ट पार्टी, बोडोलॅन्ड पिपल्स् फ्रंट. [8] (राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर – 'महाराष्ट्रातील सत्तांतर' (दोन अस्वस्थ दशके))

## १.८ – अभ्यास विषयातील मर्यादा:–

१. सदरचे संशोधन हे केवळ पुणे शहरातील कसबा व पर्वती विधानसभेच्या मतदारसंघापुरतेच मर्यादित आहे.
२. सदर शोध हा केवळ १०४ नमुन्यांपुरताच मर्यादित आहे.
३. प्रस्तुत संशोधनातून पुढे आलेले निष्कर्ष केवळ अभ्यासक्षेत्रापुरतेच मर्यादित आहेत.

## १.२ – संशोधन पद्धती –

संशोधन पद्धतीचे तीन प्रकार पडतात ते खालीलप्रमाणे

संशोधन पद्धती


- ऐतिहासिक संशोधन पद्धती
- वर्णनात्मक सर्वेक्षण संशोधन पद्धती
- प्रायोगिक संशोधन पद्धती

## संशोधन प्रकार

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

## न्यादर्शपद्धती

१३ व्या विधानसभा निवडणूकीसाठी पुणे शहरामध्ये ८ मतदारसंघ आहेत. कसबा, पर्वती, शिवाजीनगर, खडकवासला, हडपसर, पुणे, कॅन्टोन्मेन्ट, कोथरुड, वडगाव शेरी. यापैकी हडपसर व खडकवासला हे दोन ग्रामीण भाग जोडलेले मतदारसंघ आहेत.



**जनसंख्या**

१) ''संशोधकाने नमुना ज्यातून निवडला आहे असा संपूर्ण भाग म्हणजे जनसंख्या होय.''

२) ''नमुन्याची गुणवैशिष्टये ज्याच्याशी समान आहेत अशा व्यक्ती किंवा वस्तु म्हणजे जनसंख्या होय.''[9] (आगलावे प्रदिप- संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर विद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती २०००. पृ.१८०)

प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या म्हणजे पुणे शहरातील आठ विधानसभा मतदार संघातील १६ लाख ९७ हजार मतदार हे प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे.

प्रस्तुत संशोधनसाठी संशोधकाने सुगम यादृच्छिक पद्धती वापरून (लॉटरी पद्धत) वापरली आहे.

## १) जॉर्ज व व्हॅट यांच्या मते –

''नमुना किंवा न्यादर्श म्हणजे मोठया गटातून निवडलेला प्रातिनिधिक स्वरूपाचा लहान गट होय.'' [10] (भिंताडे वि. रा. शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे नित्य नुतन प्रकाशन, आवृत्ती २००८, पृ. ८२)

## २) गुड व हॅट –

''नमुना त्यातील नावाप्रमाणेच एक विस्तृत समूहाचा लघु प्रतिनिधी आहे. ''

वरील व्याख्यावरून असे स्पष्ट होते की विश्व किंवा समग्रातील एकूण एककापैकी काही प्रातिनिधिक एककांची निवड करणे म्हणजे नमुना होय.

प्रस्तुत संशोधनात पुणे शहरातील एकूण आठ विधानसभा मतदार संघांपैकी दोन मतदार संघांची म्हणजेच पर्वती मतदार संघ आणि कसबापेठ मतदार संघांची निवड केली.


### १) संभाव्यता पध्दती

जनसंख्येतून न्यादर्शाचे घटक निवडताना ते निवडले जाण्याची निश्चित संभाव्यता ज्या पध्दतीत असते. त्या पध्दतीस संभाव्यता पध्दती असे म्हणतात.

### २) असंभाव्यता पध्दती


ज्या पध्दतीमध्ये अभ्यासाच्या निर्णयानुसार न्यादर्शातील घटकांची निवड केली जाते त्यास असंभाव्यता पध्दती असे म्हणतात. [11] (भिंताडे वि. रा. शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे नित्य नुतन प्रकाशन, आवृत्ती २००८, पृ. ८४)

संशोधकाने नमुना म्हणून पुणे शहरातील एकूण आठ मतदार संघांपैकी पर्वती  या मतदार संघातील २.९८ लाख मतदारांपैकी ५५ मतदारांची निवड केली. पर्वती हा मतदारसंघामधे पुरग्रस्तांचे पुर्नवर्सन करण्यात आले असले कारणाने हा स्थित्यंतर आलेला मतदारसंघ आहे. हा एस.सी., एस.टी. साठी राखीव असलेला मतदार संघ आहे.




तसेच कसबा पेठ या मतदार संघातील एकूण २ लाख ९८ हजार मतदारांपैकी ४९ मतदारांची निवड केली.

## KASBA PETH



वरील दोन पध्दतीपैकी संशोधकाने संभाव्यता पध्दतीने निवड केली आहे. यामध्ये सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा उपयोग न्यादर्श निवडी मध्ये केला आहे.

यासाठी संशोधकाने कसबा पेठ मतदार संघातील खालील विभागातील मतदारांची निवड केली.

कसबा पेठ मतदारसंघ हा स्थिरस्वरूपाचा मतदारसंघ आहे. मराठा, ब्राह्मण उमेदवारांसाठी हा मतदारसंघ आहे. पुणे शहराच्या मध्यवर्ती भागात हा मतदार संघ येतो. तसेच भाजपचा बालेकिल्ला म्हणून या मतदारसंघाला ओळखले जाते.

**पर्वती मतदार संघातील प्रतिसादक निवड**

| **विभाग** | **नमुना म्हणून निवडलेले मतदार** |
|---|---|
| पर्वती पायथा | ९ |
| हिंगणे | ८ |
| सहकारनगर | १० |
| मुकुंदनगर | ११ |
| बालाजी नगर | ८ |
| लुल्ला नगर | ३ |
| **एकूण** | ४९ |

**कसबा पेठ मतदार संघातील प्रतिसादक निवड**

| **विभाग** | **नमुना म्हणून निवडलेले मतदार** |
|---|---|
| अलका टॉकीज | ५ |
| स.प. महाविद्यालय | ४ |
| ओंकारेश्वर मंदिर | १० |
| एकबोटे कॉलनी | ८ |
| अल्पना थिएटर | ८ |
| मंडई | ३ |
| शनिवार वाडा | ९ |
| कसबा पेठ | ८ |
| **एकूण** | ५५ |

## संशोधन आराखडा :

या संशोधनप्रबंधाच्या अभ्यासासाठी सुगम यादृच्छिक नमुना वापरला आहे. संशोधकाने कसबा मतदारसंघ व पर्वती मतदार या मतदार संघातील १०४ मतदारांची लॉटरी पद्धतीने निवड केली आहे.

**थोडक्यात समारोप**

१) **अभ्यासाची क्षेत्रे :** कसबा मतदारसंघ व पर्वती मतदार संघ, पुणे

२) **घेतलेले नमुने :** प्रश्नावली व मुलाखत अनुसुचीद्वारे मिळालेली माहिती मिळवली.

३) **नमुना आकार :** पुणे शहरामधील कसबा व पर्वती मतदारसंघातील वय वर्षे १८ ते ६०मधील स्त्री व पुरुष मतदार.

४) **नमुना निवडीची पद्धत :** सदर अभ्यासासाठी निवडणूक मतदार यादी घेऊन सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर केला आहे. कसबा मतदारसंघ व पर्वती मतदार या मतदार संघातील १०४ मतदारांची लॉटरी पद्धतीने निवड केली आहे.

संशोधन करीत असताना माहिती संकलित करण्यासाठी विविध तंत्रे व पद्धती वापरली जातात, त्यांना तथ्य संकल्पनाची तंत्रे, संशोधन साधने म्हणतात. प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावली, मुलाखत अनुसुची, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, नियतकालिके, संशोधन अहवाल इत्यादींचा वापर करण्यात आलेला आहे.


प्रश्नावली व मुलाखत अनुसुचीचा वापर तथ्य संकलनासाठी करण्यात आला. तथ्यांच्या आधारावर समस्यांचे निराकरण करणे शक्य झाले. सदर अभ्यासातून संकलित झालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी, आलेख या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करण्यात आला आहे.

## माहिती संकलनाची साधने :-

संशोधनाच्या परिकल्पनांची आपण सुरूवात केलेली असते. त्या परिकल्पनांचे मूल्यांकन करून अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी विविध प्रकारची माहिती व आकडेवारी आवश्यक असते. तिला आपण संशोधनाची साधनसामग्री म्हणतो. ही साधनसामग्री विश्वासार्ह व वैध असावी लागते. तिचे विश्लेषण व निर्वचन करून आपण संशोधनाचे निष्कर्ष मांडत असतो. त्यासाठी गुणात्मक व परिमाणात्मक अशा दोन्ही प्रकारची साधनसामग्री आवश्यक असते. त्यासाठी विविध प्रकारची तंत्रे व पद्धती वापरल्या जातात. त्यांना आपण संशोधनाची साधने म्हणतो.

अनेक साधनांमधून संशोधनाच्या योग्य त्या साधनांची निवड करणे आवश्यक असते. ही निवड योग्य होण्यास संशोधकाला त्या साधनाच्या गुण दोषाची माहिती व मर्यादांची माहिती असणे आवश्यक असते. त्या साधनापैकी एक अथवा अनेक साधनांचा वापर संशोधक करू शकतो. ही माहिती संख्यात्मक व गुणात्मक असू शकते.

**संशोधनाची विविध साधने**




प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावली या साधनाचा उपयोग केला आहे.

**प्रश्नावली**

'एका विषयासंदर्भात व्यक्तीकडून माहिती मिळविण्यासाठी तयार केलेली प्रश्नांची एक क्रमबद्ध सूची म्हणजे प्रश्नावली होय.'

**१. जोहॅन गॅल्टुंग**

''लिखित चेतक प्रश्न व लिखित उत्तर म्हणजे प्रश्नावली होय.''

**२. बोगार्डस्**

''प्रश्नावली म्हणजे विविध व्यक्तींना उत्तर देण्याकरिता तयार करण्यात आलेली एक तालिका होय.''[12] (आगलावे प्रदिप- संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर विद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती २०००. पृ. २६२)

वरील व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की प्रश्नावली ही विशेष प्रकारच्या प्रश्नांची अनुसूची असून अध्ययन विषयाच्या संबंधित प्राथमिक तथ्यांना एकत्रित करण्यासाठी नमुन्यात निवडलेल्या विद्यार्थ्यांना दिली जाते. या प्रश्नावल्या भरून आल्यानंतर त्यांचे वर्गीकरण केले जाते व प्रत्येक प्रश्नांचा संख्याशास्त्रीय पद्धतीने विचार केला जातो.

**प्रश्नावलीचे प्रकार**

१. संरचित प्रश्नावली
२. असंरचित प्रश्नावली
३. बंदिस्त प्रश्नावली
४. मुक्त प्रशावली
५. चित्रमय प्रश्नावली
६. मिश्रित प्रश्नावली

**बंदिस्त प्रश्नावली**

बंदिस्त प्रश्नावलीत प्रत्येक प्रश्नांचे पर्यायी उत्तर दिलेले असते. उत्तर दात्याला आपले मत स्वतंत्रपणे मांडण्याचे स्वातंत्र्य नसते. फक्त पर्यायी उत्तरांपैकी त्याला योग्य उत्तराची निवड करावी लागते. म्हणून त्या प्रश्नावलीस बंदिस्त प्रश्नावली असे म्हणतात.

बंदिस्त प्रश्नावलीचा सर्वात महत्त्वाचा लाभ म्हणजे उत्तरदाता प्रश्नावलीतील सर्व प्रश्नांची उत्तरे देतो. प्रश्नांची उत्तरे देण्यामध्ये त्याला कंटाळा येत नाही. उत्तरदात्याला प्रश्नांचा अर्थ त्वरीत कळतो. तसेच प्रश्नावलीद्वारे प्राप्त माहितीचे वर्गीकरण करणे सोपे असते.

**प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावली या साधनांचा उपयोग केला आहे.**

प्रश्नावलीद्वारे कमी वेळात जास्तीत जास्त तथ्याचे संकलन केले जाते. तसेच एकाचवेळी अनेक उत्तरदात्यांकडून प्रश्नावली सोडवून घेतली जाऊ शकते. तसेच उत्तरदात्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव नसतो. तो स्वत:च्या मतानुसार उत्तरे देत असतो.

वरील कारणामुळे संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी बंदिस्त प्रश्नावलीचा वापर केला आहे.

**मुलाखत**

संशोधनासाठी आधार सामग्री संकलित करण्यासाठी मुलाखत हे महत्त्वाचे माहिती संकलनाचे साधन आहे. मुलाखतीच्या माध्यमातून हवी असलेली माहिती संकलित करता येते.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने मुलाखत तंत्राचा उपयोग केला आहे.

## समारोप –

सदर संशोधनासाठी वापरण्यात येणाऱ्या पद्‌धती, त्यांची उपयुक्तता, वैशिष्ट्ये, संशोधन प्रकार, संशोधनाची जनसंख्या, न्यादर्श माहिती संकलनाची साधने, माहिती विश्लेषणाची साधने त्यामुळे पुढील संशोधनास गती मिळाली व संशोधन गतिशील झाले. प्रस्तुत संशोधनात संशोधनाचे प्रास्ताविक, समस्येचे विधान, समस्येचे स्पष्टीकरण, संशोधनाची गृहितके, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा इ. मुद्द्यांचा परामर्श घेण्यात आलेला आहे.

## संदर्भ :

संदर्भ क्र. १ – सकाळ, इयर बुक मासिक, प्रथमावृत्ती २०१५.

संदर्भ क्र. २ – डॉ. एकनाथ खांदवे– महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, आरती प्रकाशन, प्रथमावृत्ती, सन २००९.

संदर्भ क्र. ३ – सकाळ इयर बुक मासिक, प्रथमावृत्ती २०१५

संदर्भ क्र. ४ – सकाळ इयर बुक मासिक, प्रथमावृत्ती २०१५

संदर्भ क्र. ५ – डॉ. प्रकाश पवार, 'महाराष्ट्राच्या राजकारणाची पुर्नस्थापना' मार्च २००९, प्रतिमा प्रकाशन.

संदर्भ क्र. ६ – डॉ. य. ग. शिंदे, ‘पुणे जिल्हा परिषद निवडणूक प्रथमावृत्ती २००१, स्नेहवर्धन पब्लिशींग हाऊस, पुणे

संदर्भ क्र. ७ – प्रा. व्ही. बी. पाटील, ‘भारतीय राज्यव्यवस्था – महाराष्ट्राच्या संदर्भासह’

संदर्भ क्र. ८ – राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर – ‘महाराष्ट्रातील सत्तांतर’ (दोन अस्वस्थ दशके)

संदर्भ क्र. ९ – आगलावे प्रदिप– संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर विद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती २०००. पृ.१८०

संदर्भ क्र. १० – भिंताडे वि. रा. शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे नित्य नुतन प्रकाशन, आवृत्ती २००८, पृ. ८२

संदर्भ क्र. ११ – भिंताडे वि. रा. शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे नित्य नुतन प्रकाशन, आवृत्ती २००८, पृ. ८४

संदर्भ क्र. १२ – आगलावे प्रदिप– संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर विद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती २०००. पृ. २६२

# प्रकरण २
# संशोधन साहित्याचा आढावा

# प्रकरण २
# संशोधन साहित्याचा आढावा

## प्रस्तावना

कोणत्याही विषयावर संशोधन कार्य करत असताना त्या संशोधनाला एक विशिष्ट स्थान, दिशा,देण्यासाठी संशोधकाला त्या संबंधित विषयाशी निगडीत असलेल्या संशोधन कार्याची समिक्षा करणे गरजेचे असते. पूर्वी झालेल्या संशोधन कार्याची माहिती मिळविण्यासाठी संशोधक संबंधित शोध साहित्याचे पुर्ननिरीक्षण करीत असतो. संशोधनासाठी समस्या निश्चित करताना त्याबाबत पूर्वी काय अभ्यास झाला आहे हे पाहणे महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळे कार्य पद्धतशीर व सखोल होण्यास मदत होते.

संबंधित साहित्याचे सिंहावलोकन म्हणजे शोधकार्याच्या समस्येशी संबंधित सर्व प्रकारची पुस्तके, ज्ञानकोश, पत्र-पत्रिका, अभिलेख तसेच प्रकाशित , अप्रकाशित शोध प्रबंध यांचे पुर्ननिरीक्षण करून संशोधक स्वत:च्या समस्येची निवड करतो. परिकल्पना बनवतो. तसेच संशोधन कार्यासाठी रूपरेषा तयार करून संशोधन कार्याला एक निश्चित दिशा प्राप्त करून देत असतो.

संशोधन करीत असताना विषयासंदर्भात पूर्णत: संशोधन व्हावे. तसेच या विषयासंबंधीत इतर किती व कशाप्रकारे संशोधन केले आहे हे समजण्यासाठी पूर्वी केलेल्या संशोधन कार्याचा अभ्यास करणे गरजेचे असते. संबंधित संशोधन साहित्याचा आढावा घेतल्याने संशोधकाचे ज्ञान वाढीस लागते. संशोधनाची कार्यपद्धती मर्यादा, समस्येची निवड, संशोधनाची गृहीतकृत्ये ठरविणे सोपे जाते. तसेच संशोधन क्षेत्रात आजपर्यंत झालेल्या संशोधनाची माहिती मिळते. संख्याशास्त्रीय कोणते साधन वापरावे हे निश्चित करता येते. मागील संशोधनाच्या आधारे निष्कर्षाचा अन्वयार्थ लावू शकतो.

एखाद्या समस्येची संशोधन अभ्यासाची संशोधक तयारी करतो तेव्हा संशोधकास संदर्भ विषयाचा मागोवा घेणे महत्त्वाचे असते. त्यामुळे आजपर्यंत या विषयात किती कोणत्या स्वरुपात कोणी अभ्यास केला आहे. याची कल्पना संशोधकाला येते. तसेच संदर्भ साहित्याचीही माहिती संशोधकाने मिळवणे आवश्यक असते.

## २.१ – संबंधित साहित्याच्या आढाव्याची उद्दिष्ट्ये –

१. पूर्वीच्या संशोधनाची पुनरावृत्ती टाळणे.
२. प्रस्तुत संशोधनाची योग्य दिशा ठरविणे.
३. संशोधन विषयासंबंधी सिद्धांत व परिकल्पना यांच्या मांडणीबद्दल निश्चित कल्पना प्राप्त करून घेणे.
४. पूर्वी झालेल्या संशोधनातील त्रुटी टाळून प्रस्तुत संशोधन अधिक निर्दोष स्वरुपात करणे.
५. स्वत:च्या ज्ञानात भर टाकणे.

## २.२ – संबंधित संशोधनाच्या सिंहावलोकनाचे महत्त्व :–

१. पूर्वी झालेल्या संशोधनाची माहिती करून घेतल्याने त्याची पुनरावृत्ती टाळता येते व संशोधन विषय निवडण्यास मदत होते. जोपर्यंत संशोधकाला संबंधित विषयामध्ये किती संशोधन झालेले आहे, त्यातून कोणते निष्कर्ष आलेले आहेत हे माहिती होत नाही तोपर्यंत संशोधक समस्येची निश्चिती करू शकत नाही.

२. निवडलेल्या विषयासंबंधी समुचित पद्धती, तंत्र साधनाबाबत माहिती मिळते.

३. संबंधित विषयासंबंधी सिद्धांत व गृहितकृत्य यांच्या मांडणीची निश्चित कल्पना येते.

४. आधार सामग्री व निष्कर्ष या विषयी तुलनात्मक माहिती मिळते. समर्पक सांख्यिकी तंत्र व त्यांचा उपयोग निर्वचन करण्यासाठी मार्गदर्शन प्राप्त होते.

५. संदर्भ साहित्याचा अभ्यास करून स्वत:ची ज्ञानवत्ता वाढविता येते.

६. वर्णनात्मक संशोधनासाठी संबंधित साहित्याचे सर्वेक्षण अत्याधिक महत्त्वाचे असते. यामध्ये संशोधनाला योग्य दिशा मिळावी म्हणून तसेच भूतकाळातील प्राप्त संदर्भ जाणून घेण्यासाठी संबंधित साहित्याचे सर्वेक्षण करणे अत्यावश्यक असते.

संबंधित संशोधनाचे सिंहावलोकन हे संशोधकाला संशोधनकार्यांत मार्गदर्शक व उपयुक्त ठरते. म्हणून इंटरनेट, विविध ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके या माध्यमांद्वारा संबधित साहित्याचे सिंहावलोकन केले आहे. या विषयावर मोठ्या प्रमाणात साहित्य उपलब्ध नाही. मात्र पुस्तके वाचलनालये, इंटरनेट यांच्या माध्यमातून साहित्य मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## २.३ – संबंधित साहित्याचा आढावा –

या पार्श्वभूमीवर संशोधिकेने महाराष्ट्रात आजपर्यंत झालेल्या निवडणुका व तत्सम साहित्य विषयाच्या अभ्यासाचा आढावा पुढीलप्रमाणे घेतला आहे.

### २.३.१) पवार प्रकाश, 'महाराष्ट्राच्या राजकारणाची पुनर्रचना', प्रकाशक – अरुण पारगांवकर – प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती मार्च २००९.

या ग्रंथात लेखकाने महाराष्ट्रातील विधानसभा तसेच लोकसभा मतदार संघाची पुनर्रचना अंतर्गत पुणे जिल्ह्यातील मतदारसंघाची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. पुणे मतदारसंघांमध्ये समाविष्ट केलेले विभाग तसेच मतदारसंघाची अंदाजे लोकसंख्या इ. चा संदर्भ दिला आहे. यामध्ये पुणे शहरातील विविध मतदारसंघ जसे की, कसबा, कॅन्टोन्मेंट, पर्वती, कोथरुड, वडगाव शेरी, शिवाजीनगर, खडकवासला या मतदारसंघाचा अभ्यास केला आहे. तसेच मतदारसंघाची वैशिष्ट्ये व महत्त्व डॉ. प्रकाश पवारांनी सांगितले आहे. प्रस्तुत पुस्तक विभाग, जिल्हा, विधानसभा मतदारसंघातील बदलत्या राजकारणाचे विश्लेषण केले आहे. १९५२ ते २०१४ पर्यंतच्या राजकीय घडामोडींचा अभ्यास केला आहे, जलसिंचन, पाणी व विजेसंदर्भातील असंतोष, जात संघटनांचे पक्षनिहाय विभाजन राजकीय सत्ता व अधिकार न

मिळाल्याबद्दल राजकीय असंतोष, जिल्हा नेतृत्वाची पूनर्रचना, जात धर्मनिहाय लोकसंख्याबळाची फेरजुळणी यांचा अभ्यास केला आहे.

डॉ. प्रकाश पवार यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्राच्या राजकारणाची पुनर्रचना' ह्या पुस्तकातून शोधप्रबंधासाठी आवश्यक असलेल्या माहितीचा संशोधिकेला उपयोग झाला. ह्या पुस्तकातून पुणे शहरातील विधानसभेच्या मतादारसंघामध्ये येणारे विभाग, मतदार संघ हद्दीचा परिसर कळण्यास मदत झाली. ह्या माहितीचा वापर शोधप्रबंधामध्ये करण्यात आला आहे.

## २.३.२) शिंदे य. ग. ,'पुणे जिल्हा परिषद निवडणूक' स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे – प्रकाशक – एल.व्ही. तावडे, पुणे जिल्हा परिषद ७ वी सार्वत्रिक निवडणूक

## (सन २००२) प्रथमावृत्ती २३ डिसेंबर २००१.

या पुस्तकात लेखकाने अभ्यासाविषयाची मांडणी केलेली आहे. पान १४९–१५० यामध्ये आचारसंहिता म्हणजे काय? आचारसंहितेचा हेतू काय असतो. आचारसंहिता चालू असताना कोणत्या गोष्टी टाळाव्यात. तसेच आचारसंहितेची उद्‌दिष्ट्ये याबाबत सविस्तर विवेचन केले आहे. आचार संहितेचा भंग करणे. आचारसंहिता पाळणे म्हणजे काय करणे इ. बाबत सविस्तर विवेचन केले आहे.

सदर पुस्तिकेचा वापर संशोधन करताना झाला. निवडणूक काळात लागू करण्यात आलेली आचारसंहिता म्हणजे काय, आचारसंहितेत कोणत्या गोष्टी सामाविष्ट होतात. आचारसंहितेचा भंग करणे म्हणजे काय या गोष्टी कळण्यास मदत झाली व ह्या माहितीचा वापर शोधप्रबंधात करण्यात आला.

## २.३.३) प्रा. व्ही.बी. पाटील, 'भारतीय राज्यव्यवस्था – महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह'

यांनी लिहिलेल्या वरील पुस्तकात अभ्यासविषयाची मांडणी केली आहे. भारतीय राज्यघटनेमधील निर्वाचन आयोग रचना व कार्ये तसेच राजकीय व्यवस्थेसंदर्भात राज्यशासनसंस्थेची रचना अधिकार व कार्ये स्पष्ट केली आहे. तसेच पक्षपद्‌धतीचे स्वरुप, राष्ट्रीय पक्षांची भूमिका – तत्त्वप्रणाली, संघटन आणि निवडणूक यशापयश, प्रादेशिक पक्षाची तत्त्वप्रणाली, संघटन तसेच निवडणूक प्रक्रिया मुख्य वैशिष्ट्ये, प्रौढमताधिकार, निर्वाचन आयोगाची भूमिका, मतदान वर्तनाचे प्रतिमान मतदान वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक, निवडणूकांचे आयोजन करण्यातील समस्या व अडचणी, निवडणूक सुधारणा इ. बाबत विश्लेषण केले आहे.

लोकशाही व्यवस्थेत निवडणूकांचे महत्त्व स्पष्ट करताना लेखक म्हणतात. भारतात लोकशाही आहे. लोकशाही व्यवस्थेत राज्याची अंतिम सत्ता जनतेच्या हाती असते. राज्यकारभार जनतेच्या हाती, राज्यकारभारात जनतेच्या इच्छा आकांक्षाचे प्रतिबिंब पडले पाहिजे. सद्य स्थितीत अस्तित्वात असलेल्या मोठ्या किंवा विशालकाय राज्यांच्या स्वरुपामुळे राज्यातील सर्व नागरिकांना राज्यकारभारात सहभागी करून घेणे सर्वस्वी अशक्य आहे, त्यावर उपाय म्हणून लोकशाही व्यवस्थेत निवडणूकीचा अवलंब करण्यात येतो, निवडणूकींच्या माध्यमातून आपले प्रतिनिधी निवडून द्यावे आणि या प्रतिनिधींनी जनतेला

उत्तरदायी राहून राज्यकारभार करावा. अशी व्यवस्था येथे केलेली असते. सरकार लोकांच्या संमतीनेच राज्यकारभार चालवीत आहे ही गोष्ट निवडणूकीमुळे सिद्ध होते.

'भारतीय राज्यव्यवस्था – महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह', लेखक प्रा. व्ही. बी. पाटील या पुस्तकाचा संशोधिकेला संशोधन करताना उपयोग झाला. त्यामुळे निर्वाचन आयोग रचना व कार्ये काय आहेत, तसेच राज्य शासन संस्थेची रचना, अधिकार, कार्ये समजण्यास उपयोग झाला. लोकशाही व्यवस्थेत राज्याची अंतिम सत्ता जनतेच्या हाती कशी असते, सरकार लोकांच्या संमतीनेच राज्यकारभार कशाप्रकारे चालवित असते हे समजण्यास झाला तसेच त्याचा वापर संशोधनात करण्यात आला.

## २.३.४) राजेंद्र व्होरा व सुहास पळशीकर, यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्रातील सत्तांतर' (दोन अस्वस्थ दशके)

या पुस्तकात अभ्यास विषयाची पार्श्वभूमी सांगितली आहे. प्रस्तुत पुस्तकात १९९५ पूर्वीच्या दोन दशकांच्या राजकारणाचे विश्लेषण केले आहे. तसेच यशवंतराव चव्हाणांपासून – शंकरराव चव्हाण – वसंतदादा पाटील – शरद पवार – बॅ. अंतुले – बाबासाहेब भोसले – वसंतदादा पाटील – शिवाजीराव पाटील निलंगेकर – पुन्हा शरद पवार इ. पर्यंतच्या मुख्यमंत्र्यांच्या कारकीर्दीच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. तसेच इंदिरा गांधीचे राजकारण, राजीव गांधींचे राजकारण, मागासलेल्या जातीचे राजकारण, व्ही.पी. सिंग ते नरसिंहराव पर्यंतचे सत्तांतर इ. आढावा प्रस्तुत पुस्तकात घेतला आहे.

या पुस्तकामुळे संशोधिकेला १९९५ पूर्वीच्या दोन दशकांचे राजकारण कशा प्रकारचे होते हे कळण्यास मदत झाली.

## २.३.५) गोखले शरदचंद्र , 'आढावा सत्तांतराचा', केसरी प्रकाशन, प्रथमावृत्ती ऑगस्ट १९९०.

१९९० साली लेखक 'केसरी' वृत्तपत्राचे संपादक म्हणून काम पाहात असताना राजकीय, आर्थिक, सामाजिक, घडामोडींशी त्यांचा जवळून संबंध आला. त्यांनी त्या संदर्भात दखलही घेतली. त्यावेळी जनता दल सत्तेवर आला. ह्या राजकीय सत्तांतराचा मागोवा त्यामागील कारणांचा शोध त्यांनी ह्या पुस्तकातून घेतला आहे. केंद्रात भाजप तसेच महाराष्ट्रात शरद पवारांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्ष अशी परिस्थिती होती त्यामागील कारणांचा शोध लेखकाने घेतला आहे. ह्या सत्ताबदलाचे विश्लेषण करताना त्यांना त्यावेळची राजकीय परिस्थिती, नेतृत्वामधील होणारा बदल, गरीब जनतेपुढे उभे असणारे प्रश्न इत्यादीवर भाष्य केले आहे. ह्या पुस्तकामध्ये शरद जोशी, प्रमोद महाजन, शिवसेनेचे बाळासाहेब ठाकरे इ. यांच्या घेतलेल्या मुलाखतींचे विश्लेषण केले आहे. तसेच सामान्य जनतेला भेडसावणाऱ्या प्रश्नांची महागाईपासून – बोफार्सपर्यंत मागोवा घेतला आहे. तसेच दहशतवाद, आर्थिक विकास ह्यावर थोडक्यात विवेचनही केले आहे.

आढावा सत्तांतराचा डॉ. शरदचंद्र गोखले यांच्या पुस्तकाचा वापर संशोधिकेला संशोधन शोध कार्यासाठी झाला. ह्या पुस्तकामध्ये सामान्य जनतेला भेडसावणाऱ्या महागाईपासून बोफोर्सपर्यंतच्या

प्रश्नांचा मागोवा घेण्यात आला आहे. महागाई, बोफोर्स गैरव्यवहार यामुळे जनतेमध्ये सरकारविरोधी कसे वातावरण तयार होते व त्याचा परिणाम सरकार, निवडणूकीतील निकाल यांवर कशाप्रकारे होतो हे लक्षात येते.

## २.३.६) निकाळजे, तुषार निवृत्ती 'भारतीय निवडणूक प्रणाली-एक चिकित्सक अभ्यास (१९५२-२००४)' टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पी.एच्.डी. (राज्यशास्त्र)

शोधप्रबंधामध्ये संशोधकाने इतर देशांमधील निवडणूक व्यवस्था, निवडणूक आयोग रचना व कार्ये, निवडणूक पद्धतीतील सुधारणा, तसेच १९५२ पासून २००४ पर्यंतच्या जेवढ्या सार्वत्रिक निवडणूका झाल्या त्या निवडणूकांमध्ये राजकीय पक्षांना मिळालेली मते, जिंकलेल्या जागा, राज्यनिहाय मतदार, मतदान, बाद मते, मुख्य निवडणूक आयुक्त व त्यांचा कालावधी, इ. विषयावर चिकित्सक अभ्यास केलेला आहे.

या शोधप्रबंधामध्ये संशोधकाने गृहीतके मांडली ती अशी -

१) कोणत्याही मंत्र्याचा निवडणूक आयोगाच्या प्रशासनात राजकीय हस्तक्षेप नाही.

२) इतर सामान्य प्रशासनातील आर्थिक भ्रष्टाचाराप्रमाणे निवडणूक प्रशासनामध्ये भ्रष्टाचार नाही.

३) भारतीय निवडणूक प्रणाली व प्रशासन व्यवस्था सर्व जगातील लोकशाही असलेल्या देशात सक्षम म्हणून ओळखली जाते.

ह्या गृहीतकाच्या पडताळणीसाठी त्यांनी विविध दाखले दिलेले आहेत. यासाठी त्यांनी ब्रिटीश युरोपियन काळापासूनचे लेख, अहवाल, पुस्तके, गॅझेटियर्स, वृत्तपत्रीय लेख, मासिकामधील लेख, समित्यांचे अहवाल, इंटरनेट इ. माहितीचा वापर केलेला आहे.

तसेच १९५२ पासून २००४ पर्यंत झालेल्या निवडणूकांचा आढावा घेत असताना राजकीय पक्ष, निवडणूक लढवणारे व जिंकणारे उमेदवार, अनामत रक्कम जप्त झालेले. मिळालेली मते, मतांची टक्केवारी, जिंकलेल्या जागांची टक्केवारी इ. सखोल अभ्यास या संशोधनात केलेला आहे.

तुषार निवृत्ती निकाळजे ह्या संशोधक विद्यार्थ्याचे भारतीय निवडणूक प्रणाली-एक चिकित्सक अभ्यास (१९५२-२००४) या शोधप्रबंधाचा उपयोग प्रस्तुत संशोधन अभ्यास करताना झाला.

तुषार निकाळजे ह्यांच्या शोधप्रबंधामुळे १९५२ ते २००४ पर्यंतच्या निवडणूकांचा आढावा घेता आला.

**२.३.७ – प्रदिप चिबर व राहुल वर्मा यांची** (National Election Study 2014 - The BJP's - 2014 'Modiwave' - An Ideological consolidation of the Right - Pradeep Chhibber, Rahul Verma) - September - 27, 2014, VOL-XLIX No. 39, Economic & Political Weekly) मध्ये लेख २७ सप्टेंबर २०१४ रोजी प्रसिध्द झालेला आहे. लेखाचे नाव 'The BJP's - 2014' Modi Wave - An Ideological consolidation of the Right.

या लेखात लेखकांनी मोदी लाटेबाबत विचार मांडले आहेत. मोदींना उच्च वर्गांबरोबर मागास जातींचा (SC, ST, OBC) इतर मागास जातींचा पाठिंबा मिळण्यामागील मते सांगितली आहेत. तसेच भाजपा कशाप्रकारे किती मतांनी टक्कांनी सत्तेवर आला. पूर्वी कधीही न घडल्या प्रमाणे काँग्रेसपेक्षाही भाजपला जास्त मते मिळाली. त्यामागील कारणांचा शोध; त्यामागे नवीन असे काय होते. मोदींनी Business Regulations तसेच Reducing subsidies ह्या मुद्द्यांवरुन मोदी लाटेचा effect परिणाम वाढला का? Role of State in Economy ह्याचे विश्लेषण केले आहे. तसेच मोंदीची प्रतिमा (Image) जनमानसात कशी आहे ते हिंदूत्व आयकॉन तसेच Pro-Business reformer कसे आहेत. गुजरात मॉडेल, कार्यक्षम प्रशासक इ. बाबींवर विचार मांडले आहे.

तसेच काँग्रेस पक्ष एकदंरीत UPA सरकारमधील भ्रष्टाचार, घोटाळे इ. चा आढावा घेतला आहे. मोदींची कार्यक्षम प्रशासक कशाप्रकारे आहेत हे कळण्यास मदत झाली व त्याचा शोधप्रबंधासाठी वापर झाला.

या लेखाचा उपयोग शोधप्रबंधासाठी झाला. २०१४ साली विधानसभेच्या निवडणूकीवर मोदी लाटेचा परिणाम होता त्या अनुषंगाने मोदींची प्रतिमा कशाप्रकारे जनमानसात होती हे या पुस्तकात सांगितले आहे.

## २.४ – संशोधनाचे वेगळेपण –

प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण अशासाठी आहे की आजपर्यंतच्या संशोधनात २०१४ पूर्वीच्या निवडणुकींचा अभ्यास केला गेला होता. प्रस्तुत संशोधनात ‘विधानसभा निवडणूक २०१४’ चा अभ्यास करण्यात आला आहे.

१) विधानसभा निवडणूक – २०१४ ही एक ऐतिहासिक व राजकीय दृष्टीने एक वेगळे वळण राजकारणाला देणारी निवडणूक आहे. यामध्ये प्रत्येक पक्ष काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना भाजपा, स्वबळावर लढला आहे. युती तसेच आघाडी फुटली आहे.

२) तसेच ह्या निवडणुकीमध्ये जो सत्ताबद्दल झाला त्यामुळे पार्श्वभूमीचा येथे खोलात जावून अभ्यास करण्यात आलेला आहे.

३) तसेच जनतेमधील असंतोष, महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महिलांची असुरक्षितता, विविध घोटाळे, गैरव्यवहार, भ्रष्टाचार इत्यादी विषय कसे सत्ताबदल होण्यास कारणीभूत ठरतात याचा खोलात जावून विचार करण्यात आलेला आहे.

४) पुणे शहर विधानसभा निवडणूक २०१४ चा संपूर्ण आढावा येथे घेण्यात आलेला आहे. नविन निवडणूक यंत्रणेने राबविलेल्या योजना, प्रचारयंत्रणा इ.

सदर संशोधनाचा भावी संशोधनासाठी निश्चितच उपयोग होईल.

## समारोप –

संबंधित साहित्याचा आढावा या प्रकरणामधे संशोधनासाठी मागील कोणत्या संशोधनाचा अभ्यास केला आहे याची माहिती लिहली आहे. या संबंधित साहित्याच्या आढाव्यावर संशोधनाची इमारत रचली गेली आहे. त्यामुळे हा पाया पक्का असणे महत्त्वाचे आहे.

# प्रकरण ३ रे

# महाराष्ट्रातील सत्ताबदलामागील पार्श्वभूमी

# प्रकरण ३ रे

# महाराष्ट्रातील सत्ताबदलामागील पार्श्वभूमी :-

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यात प्रथमच भाजपचा मुख्यमंत्री बनला तो म्हणजे देवेंद्र फडणवीस. आजपर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणाचा इतिहास बघितला तर कॉंग्रेस हाच बलाढ्य असा पक्ष असलेला दिसून येतो. केंद्रात तसेच महाराष्ट्र राज्यात भाजपप्रणित महाआघाडीचे सरकार येण्यामागे कॉंग्रेस आघाडी सरकारविरोधातील असंतोष खूप मोठ्या प्रमाणात कारणीभूत असलेला दिसून येतो. कॉंग्रेस आघाडी सरकारने विविध योजना आणल्या नाहीत असे नाही. परंतु त्या योजनांची पूर्णपणे अंमलबजावणी केली गेली नसल्याचे तसेच त्या योजना जनतेपर्यंत पोहोचल्या नाहीत, जनतेला त्यांची माहिती नाही. कॉंग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारच्या काळातील भ्रष्टाचार, गैरव्यवहार, मंत्र्यांनीच केलेले गैरव्यवहार यामुळे जनता आघाडी सरकारला कंटाळली होती. त्यातच महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्तेची प्रकरणे महिलांची असुरक्षितता, रोजगाराच्या संधीची कमतरता, बेरोजगारी ही कारणे सत्तांतराला कारणीभूत ठरली. तसेच नरेंद्र मोदी यांचे सरकार दिल्लीत केंद्रात आले. मोदींचा विकासाचा मुद्दा यावर जनतेने विश्वास टाकला. गुजरातचे चौथ्यांदा मुख्यमंत्रीपद भुषविलेले नरेंद्र मोदी यांचा प्रभाव गुजरात मॉडेल, मोदी लाट यांचा प्रभाव जनतेवर होता. यामुळे देखील महाराष्ट्रात सत्तांतर घडून येण्यास मदत झाली. महाराष्ट्रातील निवडणुका होण्याअगोदर आप, आम आदमी या पक्षावर पर्यायाने अरविंद केजरीवाल या नेत्यावर जनतेने विश्वास टाकला होता. सत्तेवर आल्यावर पाणी, वीजबील कमी करू शकतात. तर इतर राजकारणी का करू शकत नाहीत? हा प्रश्न जनतेसमोर उभा राहिला प्रसार माध्यमांनी तो जनतेपुढे आणला. त्यामुळे लोकांमध्ये राजकीय जागृती होण्यास मदत झाली. कारण दिल्ली विधानसभा निवडणूक जिंकल्यानंतर त्यांनी मोफत पाणी, निम्मे वीजबील करून दाखविले, आश्वासनांची पूर्ती देखील केली. परंतु अरविंद केजरीवालांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे जनतेचा भ्रमनिरास झाला. तश्यातच अण्णा हजारे यांनी लोकपाल जनविधेयक संसदेत मान्य करून मिळावं म्हणून केलेले उपोषण, रामदेवबाबांनी काळ्या पैशांविरोधात केलेले आंदोलन या सर्व गोष्टींमुळे महाराष्ट्रात कॉंग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकार विरोधात सत्तापालट घडून येण्यास मदत झाली. त्याचा घेतलेला थोडक्यात आढावा :-

## ३.१ - महागाई:-

२०१४ विधानसभा निवडणुकीत जो सत्ताबद्दल झाला त्याला कॉंग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारवर असलेला असंतोष जनतेमधील असंतोष कारणीभूत आहे. महागाई दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. आघाडी सरकारकडून अन्नधान्यांच्या किंमतीवर नियंत्रण करण्यामागे जे निर्णय घेतले जातात. त्याचा परिणाम महागाई नियंत्रित करण्यापाठीमागे होत असतो. जनतेमध्ये आघाडी सरकारविरोधात प्रचंड असंतोष आहे आणि महागाई हे एक महत्त्वाचे कारण सत्ताबद्दल होण्यामागे कारणीभूत असलेले दिसून येते. ते कशाप्रकारे याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

१९६० मधील किंमतीच्या मानाने गेल्या ५२ वर्षांतील वाढलेल्या किंमती व ग्राहक किंमत निर्देशांकावरुन खालीलप्रमाणे आहेत. १९६० हे पायाभूत वर्ष धरुन किंमतीच्या निर्देशांकात झालेली वाढ तक्त्यात दर्शविली आहे.

## तक्ता क्र. १ – ग्राहक किंमतीचा सरासरी निर्देशांक (१९६०–२०१३)

| | | |
|---|---|---|
| १९६५–६६ – १५१ | १९९४–९५ – १४०२ | २००५–०६ – २६६२ |
| १९७१–७२ – १९२ | १९९८–९९ – २०४१ | २००६–०७ – २९३३ |
| १९७४–७५ – ३१७ | १९९९–०० – २१११ | २००७–०८ – ३१२० |
| १९७९–८० – ३६० | २०००–०१ – २१८९ | २००८–०९ – ३४०२ |
| १९८४–८५ – ५८२ | २००१–०२ – २२८३ | २००९–१० – ३८२४ |
| १९८९–९० – ८५३ | २००२–०३ – २३७६ | २०१०–११ – ४२२३ |
| १९९०–९१ – ९५१ | २००३–०४ – २४५० | २०११–१२ – ४५०५ |
| १९९१–९२ – १०७९ | २००४–०५ – २५५९ | जाने – २०१३ – ५०४५ |

## किरकोळ किंमतीतील वाढ (प्रतिकिलो रु.)

| वस्तू | १९६० | २००८ | २०१२ |
|---|---|---|---|
| गहू | ०.७२ | १९ | ३० |
| तांदूळ | ०.९० | २६ | ३६ |
| साखर | ०.८० | २२ | ४० |
| दुध (लि.) | ०.८० | २६ | ४० |
| पेट्रोल (लि.) | ०.७० | ५५ | ७५ |
| ज्वारी | ०.५० | २० | ४० |
| तूरडाळ | ०.८० | ४६ | ७८ |
| गुळ | ०.६० | २६ | ६० |
| गोडेतेल | १.५५ | ७३ | १४५ |
| भेंडी | ०.४० | ३२ | ८० |

टीप – वरील सर्व किंमती पुणे येथील चांगल्या प्रतीच्या किरकोळ मालाच्या आहेत.

१९९१ साली भारत सरकारने नव्या आर्थिक धोरणाखाली रुपयाच्या विनिमय मूल्याचे नियंत्रण, नियोजनाद्वारा राबवल्या जाणाऱ्या स्वस्त धान्य योजना, पेट्रोलियमजन्य उत्पादनाच्या नियंत्रित किंमती, शिक्षण आरोग्य, सिंचन, वीजपुरवठा इ. सार्वजनिक सेवा–सुविधा पुरवठा यामधील अनुदान, खादी ग्रामोद्योगास संरक्षण, दुर्बल घटकांना सवलतीचा कर्जपुरवठा इ. शासकीय योजना मोडीत काढल्या. ज्वारी आठपट महागली. स्वस्त धान्य दुकानातल्या गहू, तांदुळाच्या किंमती शासनाने पाचपट केल्या. १९६० ते १९९० भाववाढ होतच होती.

अशाप्रकारे वाढत्या महागाईला शासनालाच जबाबदार जनतेने धरले आहे. ह्या २०१४ विधानसभेच्या निवडणूकीत सत्तांतर होण्यापाठीमागे काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारच कारणीभूत आहे. महागाईविरोधात लोकांच्या मनात असलेल्या असंतोषामुळे सत्ताबदल झाला.

महागाईचा त्रास देशभरातील सगळ्या जनतेला होतो आहे. महागाईने सर्वसामान्य, कामगार, शेतमजूर, शेतकरी, कारागीर, मध्यमवर्गीय या साऱ्यांचे जीवन असह्य करून टाकले आहे. मात्र काळाबाजारवाले, औद्योगिक भांडवलदार सट्टेबाज, व्यापारी, मोठे जमीनमालक यांचा फायदा होतो आहे व त्यांच्या संपत्तीत भर पडत आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गेल्या सुमारे ५० वर्षांच्या काळात वस्तूंचे भाव सतत वाढत आहेत.

| **वर्ष** | **भाववाढीचा वेग टक्क्यांमध्ये** |
|---|---|
| १९५५-१९६५ | ५.९% |
| १९६६-१९७५ | ८% |
| १९७९-१९९० | ९% |
| १९९१ ते २००८ | ८% |
| २००८ | १२% |

२००८ पासूनच्या मध्यात सामान्य माणसाला महागाईने पछाडले आहे. तांदूळ, गहू, ज्वारी, खाद्यतेले, तूरडाळ, साखर, भाजीपाला, दूध, औषधे, डिझेल, पेट्रोल, कापड, इतर अत्यावश्यक वस्तूंचे भाव आभाळाला भिडलेले आहेत. ह्याचा फायदा श्रीमंताना होतो. गरीब जनता मात्र ह्यांमध्ये भरडली जाते.

पूर्वी सरकार सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत रेशनिंग कार्ड धारकांना तांदूळ, गहू, साखर आणि रॉकेल ह्या वस्तू स्वस्त दरात देत होते. ह्यामुळे सरकारला बाजारभावावर नियंत्रण ठेवता येत होते. परंतु आता सरकार वितरण व्यवस्थेसाठी शेतकऱ्यांकडून जे अन्नधान्य खरेदी करीत होते त्यात कपात करीत आहे आणि खाजगी व्यापाऱ्यांना आणि मोठमोठ्या शेतकी कंपन्यांना थेट शेतकऱ्यांकडून शेतमाल विकत घेण्यास परवानगी देत आहे. अन्नधान्यांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार आता स्वतःच्या अन्नधान्याच्या साठवणुकीचा उपयोग करीत नाही. याचा परिणाम शेती उद्योगातील मोठ्या कंपन्यांकडे प्रचंड प्रमाणात अन्नधान्याचा साठा जमा झालेला आहे. त्यांच्या मर्जीप्रमाणे ते हव्या त्या किंमतीला अन्नधान्य विकू शकतात. मध्यंतरीच्या काळात कांदा भाववाढ प्रचंड प्रमाणात झाली.

आपल्या देशात येणाऱ्या डॉलर्सची रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, रुपयांशी देवाणघेवाण करते त्यासाठी नोटा छापते त्यामुळे अर्थव्यवस्थेतील पैशांचा पुरवठा वाढतो. पण त्याच प्रमाणात कुठल्याही प्रकारे उत्पादन वाढ न झाल्यामुळे, अर्थव्यवस्थेतील ही प्रचंड पैशाची वाढ हे महागाईचं एक महत्त्वाचं कारण आहे. शेती व्यवस्थेचा विध्वंस झाला आहे. साम्राज्यवादी भारतीय शेती व्यवस्थेवर ताबा मिळवून भारताची अन्नधान्याची सुरक्षितता नष्ट करण्यात यशस्वी झाले आहेत. भारताचे दरडोई अन्नधान्याचे उत्पादन १९४० च्या दशकापेक्षाही कमी झाले आहे. अन्नधान्याच्या उत्पादनात झालेल्या प्रचंड घटीमुळे महागाई वाढलेली आहे.

महागाईमुळे लोकांवर दारिद्र्याची उपासमारीची परिस्थिती निर्माण होते यावर उपाय म्हणून सरकारने सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरु केली आहे. भारतातील अन्नधान्य महामंडळ (Food Corporation of India किंवा FCI व सार्वजनिक वितरण व्यवस्था बंद करावी अशी जागतिक बँकेची शिफारस आहे. व भारतीय शासक कर्तव्यतत्परतेने आज्ञापालन करीत आहेत.

सरकारने १९९६ साली 'लक्ष्यकेंद्री' सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरु केली. दारिद्र्यरेषेखालील, दारिद्र्यरेषेवरील अशी कुटुंबांची वर्गवारी करण्यात आली. २००० साली दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या, अन्नधान्याच्या किंमती बाजारात असलेल्या किंमतीएवढ्या वाढवण्यात आल्या. परिणामी ह्या दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांनी सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून अन्नधान्य घेणे बंद केले. सर्वच गरीब कुटुबांना दारिद्र्यरेषेखालील, रेशनिग कार्ड मिळाले असे नाही. सरकारच्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील ७०.५% कुटुंबांना एक तर कार्डच मिळाले नाही. किंवा दारिद्र्यरेषेवरील कार्ड मिळाले आहे आणि प्रत्यक्षात मात्र ८७% ग्रामीण कुटुंबांना दोन वेळचं अन्नदेखील मिळत नाही.

सरकारने ठरवून दिलेल्या दारिद्र्यरेषेच्या खाली म्हणजे दरडोई दरमहिना ३६५ रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्यांपैकी बहुसंख्यांना पण दारिद्र्यरेषेखालील कार्ड मिळालेले नाही.

## ३.२ राजकीय घोटाळे / गैरव्यवहार :-

पुणे शहरामधील हडपसर येथे २०१४ विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांनी प्रचारसभा घेतली. त्यामध्ये काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात झालेल्या १०१ गैरव्यवहारांची यादी विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे यांनी दिली. हे गैरव्यवहार सुमारे ११.८८ लाख कोटींचे आहेत. 'एवढे पैसे खाल्ल्यावर त्यांना पुन्हा सत्ता हवी आहे.' अशी जोरदार टीका भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष अमित शहा यांनी केली. पुण्यातील ह्या प्रचारसभेमुळे पुण्यातील जनतेत प्रचंड प्रमाणात आघाडी सरकारविरोधात असंतोष निर्माण झाला. पुण्यामध्ये आठ मतदारसंघातील आठही जागी भाजपचे उमेदवार निवडून आले.

२०१४ विधानसभा निवडणुकीत भाजप प्रणीत महाआघाडीला सत्ता प्राप्त झाली. ह्यामागील कारणांचा विचार केला तर भारतातील मोठे राजकीय घोटाळे समोर येतात. आज प्रसारमाध्यमे, दूरदर्शनवरील बातम्या घोटाळ्यांबाबत उघडपणे बोलताना दिसतात. प्रचारमाध्यमांचा प्रभाव भारतीय जनतेवर आहेच. सरकार करीत असलेले घोटाळे व त्यामुळे भारतीय लोकांमध्ये सत्ताधाऱ्यांबद्दल गैरसमज तसेच सरकारबद्दल सरकारच्या कारभाराबाबत शंका निर्माण होतात. ह्या जनतेमधील असंतोषामुळे २०१४ विधानसभा निवडणूकीमध्ये राजकीय सत्तापालट झाला. भारतामध्ये अनेक मोठमोठे राजकीय घोटाळे झाले. चुरहाट लॉटरी प्रकरण, बोफार्स गैरव्यवहार, सेंट किट्स प्रकरण, जे.एम. लाचखोरी प्रकरण, हवाला गैरव्यवहार, चारा घोटाळा इ. या सर्व घोटाळ्यांमुळे भारतातील राजकीय आघाडी सरकारविरोधी एक अविश्वास संभ्रम भारतीय जनतेच्या मनात निर्माण झाला आहे.

भारतातील घोटाळे, गैरव्यवहारांचे सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे :-

१) चुरहाट लॉटरी प्रकरण ( १९८२) : काँग्रेसचे जेष्ठ नेते व मध्यप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री अर्जुनसिंह हे चुरहाट लॉटरी गैरव्यवहारात गुंतले होते. या संस्थेला लॉटरीच्या माध्यमातून निधी गोळा करण्यास परवानगी देण्यात आली होती. त्याचप्रमाणे धर्मदाय संस्थेप्रमाणे करारातून सूट देण्यात आली. या निधीतील मोठी रक्कम वापरुन भोपाळजवळ अलिशान केरवा डॅम पॅलेस उभारण्यात आल्याचे आरोप सर्व थरांतून झाले.

२) बोफोर्स गैरव्यवहार (१९८७) : भारतातील सर्वात महत्त्वाचे आणि चर्चिले गेलेले भ्रष्टाचाराचे प्रकरण. भारताला १५५ एमएम फिल्ड हॉवित्झर तोफा पुरविण्यासाठीचे कंत्राट देण्याच्या बदल्यात बोफोर्स एबी या कंपनीकडून तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी आणि त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी लाच घेतल्याचा आरोप करण्यात आला.

३) सेंट किट्स प्रकरण : माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव त्यांचे सहकारी मंत्री के. के. तिवारी, चंद्रास्वामी आणि के. एम. आगरवाल हे या प्रकरणात आरोपी होते. व्ही. पी. सिंह यांचे पुत्र अजेयसिंह यांनी सेंट किट्स बेटावरील फस्ट ट्रस्ट बँकेत खाते उघडून तेथे २१ दशलक्ष डॉलर्स ठेवण्याचे दर्शविणारी बनावट कागदपत्रे तयार केल्याचा आरोप या चौंघावर होता. या बँक खात्याचे व्ही. पी. सिंह लाभार्थी असल्याचे कागदपत्रांत म्हटले होते.

४) जे. एम लाचखोरी प्रकरण (१९९३) : नरसिंहराव यांनी मध्यस्थांमार्फत झारखंड मुक्ती मोर्चा (जे.एम.एम) च्या सदस्यांना आणि जनतादलातून फुटून निघालेल्या सदस्यांना लाखो रुपये दिल्याचा आरोप करण्यात आला. २००२ मध्ये विशेष न्यायालयाने नरसिंहराव आणि त्यांचे सहकारी बुटासिंग यांना दोषी ठरविले.

५) हवाला गैरव्यवहार (१९९३) : देशाच्या इतिहासातील हा मोठा राजकीय गैरव्यवहार किंवा घोटाळा होता. यामध्ये जैन बंधुंकडून राजकीय नेत्यांना हवालाच्या माध्यमातून दलांलांमार्फत पैसे दिल्याचा आरोप होता. १९९३ मध्ये उजेडात आलेल्या या लाचखोरी प्रकरणात १८ दशलक्ष डॉलर्सचा गैरव्यवहार झाला. देशातील महत्त्वाचे राजकीय नेते एकशे पंधरा वरिष्ठ सनदी अधिकारी या गैरव्यवहारात गुंतल्याचे स्पष्ट झाले होते. या हवालातून काश्मिरमधील हिज्बुल मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेला पैसा पुरविल्याचा आरोप होता.

६) चारा घोटाळा (१९९६) : या गैरव्यवहारामध्ये बिहारच्या सरकारी तिजोरीतून तब्बल नऊशे पन्नास कोटी रुपयांचा (२१०.९ दशलक्ष डॉलर्स) अपहार करण्यात आला. सरकारी अधिकारी, विविध सत्तारुढ तसेच स्थानिक विरोधी पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या संगनमताने हा अपहार केला. पशुखाद्य, जनावरांसाठीची औषधे तसेच पशुवैद्यकीय उपकरणे यांची खोटी खरेदी केल्याचे दाखवत हा गैरव्यवहार केला. १९९६ मध्ये हे प्रकरण उघडकीस आले.

७) २००२ : संजय अगरवालचा गृहनिर्माण घोटाळा

८) २००३ : अब्दुल करीम तेलगी याने केलेला मुद्रांक घोटाळा १७२ कोटी रुपये

९) २००५ : आरपीओ, डी मॅट घोटाळा १४६ कोटी रुपये, बिहारमधील पूरग्रस्तांच्या निधीतील घोटाळा, १७ कोटी रुपये, स्कॉर्पिन पाणबुडी घोटाळा १८,९७८ कोटी रुपये.

१०) २००६ : पंजाबमधील सिटी सेंटर प्रकल्पातील गैरव्यवहार १६०० कोटी रुपये, ताज कॉरिडोर घोटाळा १७५ कोटी रुपये

११) २००८ : सत्यम घोटाळा : १०,००० कोटी रुपये, लष्करातील रेशन घोटाळा ५,००० कोटी रुपये.

टू जी स्पेक्ट्रम वाटपातील ६०,००० कोटी स्टेट बँक ऑफ सौराष्ट्रमधील अफरातफर रुपये, ९५ कोटी रुपये स्वीस बँकेत असणारा बेकायदेशीर पैसा ७१,००,००० कोटी रुपये.

१२) २००९ : झारखंडमधील वैद्यकीय उपरकणे खरेदीतील गैरव्यवहार १३० कोटी रुपये, तांदूळ निर्यात घोटाळा २५०० कोटी रुपये, ओरिसातील खाण घोटाळा ७००० कोटी रुपये. मधू कोडा यांनी केलेला भ्रष्टाचार ४००० कोटी रुपये.

१३) सुखराम यांचा दूरसंचार घोटाळा (१९९६): ऑगस्ट १९९६ मध्ये माजी केंद्रीय दूरसंचारमंत्री सुखराम यांच्या नवी दिल्ली आणि हिमाचल प्रदेशातील मंडी येथील निवासस्थानात नोटांनी भरलेल्या सुटकेसेस जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी त्यांच्याविरुद्ध दोन गुन्हे दाखल केले गेले. नरसिंहराव यांच्या काळात मंत्री असताना चार कोटी रुपयांची बेहिशेबी मालमत्ता बाळगल्याप्रकरणी त्यांना दोषी ठरविण्यात आले.

१४) बराक क्षेपणास्त्र घोटाळा (२००१): इस्त्रायलकडून बराक खरेदी करताना झालेल्या या भ्रष्टाचार प्रकरणाने संरक्षण दलांसह सर्वत्र खळबळ उडाली. यामध्ये समता पक्षाचे माजी खजिनदार आर. के. जैन यांच्यासह अनेकांना अटक करण्यात आली आहे. या गैरव्यवहारात प्राथमिक तपास अहवालात माजी संरक्षणमंत्री व ज्येष्ठ समाजवादी नेते जॉर्ज फर्नांडीस, जया जेटली यांचीही नावे समाविष्ट होती.

१५) तहलका घोटाळा : भाजपचे अध्यक्ष बंगाल लक्ष्मण लाच स्वरुपात नोटांची बंडले घेत असल्याचे चित्रीकरण एका बनावट कंपनीला सरकारी कंत्राटे मिळवून देण्याच्या बदल्यात लक्ष्मण ही लाच घेत होते. तहलकाने ही व्हिडीओ प्रदर्शित केली.

१६) टू जी स्पेक्ट्रम गैरव्यवहार : देशाच्या इतिहासातील सर्वात मोठा घोटाळा यामध्ये केंद्र सरकारमधील मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी गुंतले होते. मोबाईल कंपन्यांना कमी किमतीत फ्रिक्वेन्सी परवाने विकल्याचा आरोप या सर्वांवर आहे. या फ्रिक्वेन्सीचा वापर मोबाईल कंपन्या मोबाईल ग्राहकांना टूजी तंत्रज्ञान देण्यासाठी करणार होत्या.

१७) आदर्श गृहनिर्माण संस्थेतील गैरव्यवहार : आदर्श गृहनिर्माण संस्था ही मुंबईतील एक सहकारी संस्था आहे. कारगील युद्धातील जेष्ठांना तसेच युद्धात शहीद झालेल्यांच्या विधवा वीरपत्नींसाठी ही गृहनिर्माण संस्था होती. मात्र आदर्श सोसायटीचे बांधकाम करताना अनेक टप्प्यांवर नियम तसेच

कायद्यांचे उल्लंघन करण्यात आले. प्रसारमाध्यमांनी हे वृत्त प्रसिद्ध करून हा गैरव्यवहार चव्हाट्यावर आणला. यामध्ये माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे नाव प्रकर्षाने घेतले जाते.

विविध गैरव्यवहार भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमुळे सत्तापालट झाला. जनतेमधील असंतोषाचा परिणाम सत्तापालटास कारणीभूत ठरला.[1] (संदर्भ : शिदोरी, महाराष्ट्र शासनाचे मासिक, नोव्हेंबर २०१४ चा अंक)

## ३.३ – बेरोजगारांची समस्या :–

बेरोजगारांची समस्या भारतातील जनतेपुढे आहे. १३ व्या विधानसभा निवडणूकीत सत्तापालट होण्यास हा घटक खूप प्रमाणात कारणीभूत आहे. कारण भारतातील राज्यकर्ते रोजगाराच्या संधी भारतीय जनतेपुढे निर्माण करीत नाहीत. 'सरकारच्या जागतिकीकरण व खासगीकरण या धोरणांमुळे नोकऱ्यांवर आमुलाग्र परिणाम झाले आहेत. कंत्राटी कामगारांची भरती, कामगार कायदे बदलविणे. नोकरीवरुन काढून टाकणे, नोकरीची, रोजगाराची शाश्वती नसणे. परिणामी प्रचंड बेरोजगारी, उपासमार, दारिद्र्य, गुन्हेगारी या समस्यांना जनतेला तोंड द्यावे लागत आहे.

या प्रकरणात जागतिकीकरण व खासगीकरणामुळे नोकऱ्यांवर कसे परिणाम झाले, १९९६ ते २००५ या कालावधीतील सरकारी क्षेत्रातील कमी झालेल्या नोकऱ्या, खाजगी क्षेत्रांमधील १९९८–२००५ कमी झालेले रोजगार. मल्टिनॅशनल कंपन्या भारतात आल्यामुळे कमी झालेले रोजगार, भारतातील उद्योगधंद्यावरील परिणाम, लघुउद्योग क्षेत्रांची पिछाडी, तसेच कामगार चळवळींचा कमजोरपणा, कंत्राटी रोजंदारीवरील कामगरांच्या हालअपेष्ठा, तसेच सॉफ्टवेअर व बी.पी.ओ. क्षेत्रामधील रोजगाराची परिस्थिती, इत्यादी गोष्टी राजकीय सत्तापालट होण्यास कशाप्रकारे कारणीभूत झाल्या याचे विश्लेषण केले आहे.

जागतिकीकरणाच्या सुरुवातीच्या काळात, सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रांमध्ये थोड्याफार प्रमाणात नोकऱ्यांमध्ये वाढ होत होती. पण जसंजसं जागतिकीकरण आणि खाजगीकरण पुढे रेटलं गेलं (म्हणजे सार्वजनिक क्षेत्र बंद होण्याचं प्रमाण वाढायला लागलं.) तसतशी सार्वजनिक व खाजगी दोन्ही क्षेत्रातील नोकऱ्यांना घरघर लागली. १९९६ ते २००५ ह्या कालावधीत सरकारी क्षेत्रातील १४.१ लाख नोकऱ्या कमी झाल्या. ह्याच क्षेत्रात १९८१ ते १९९६ ह्या कालावधीत ३९ लाख नोकऱ्या निर्माण झाल्या होत्या. त्याचप्रमाणे खाजगी संघटित क्षेत्रांमध्ये १९९८–२००५ मध्ये ३ लाख रोजगार कमी झाले. ह्या क्षेत्रात १९९१ ते १९९८ ह्या कालावधीत १० लाख (आणि १९८१–९८ मध्ये १३.६) रोजगार निर्माण झाले.

MNCs म्हणजेच मल्टिनॅशनल कंपन्या भारतात आल्यामुळे खाजगी क्षेत्राला आपला ढाचा बदलणे भाग पडले. एका बाजूला ह्या मोठ्या उद्योगघराण्यांचं उत्पादन व नफा वाढत आहे तर दुसऱ्या बाजूला ते लाखो कामगारांना कामावरुन काढून टाकत आहेत. उदा. १९९९ मध्ये टाटा मोटर्सच्या ३५,००० कामगारांनी १,२९,००० मोटारींचं उत्पादन केलं होतं. ५ वर्षानंतर उत्पादन अडीच पट वाढलं

आणि ३,१२,००० गाड्यांवर जाऊन पोचलं. पण कामगारांची संख्या एक तृतीयांशने कमी होऊन २१,००० झाली. बजाजमध्ये १९९५ मध्ये २३,००० कामगार १० लाख दुचाकीचं उत्पादन करत होते. एका दशकांनंतर २००४ मध्ये मात्र ११,००० कामगार १५ लाख दुचाकी बनवत होते. हीच परिस्थिती सर्व बड्या उद्योगांची आहे. क्रॉम्प्टन ग्रीव्हज पासून रिलायन्स पर्यंत. तसेच लघुउद्योग क्षेत्रही झपाट्याने नष्ट होत आहे.

परिणामी सगळ्या संघटित क्षेत्रातील एकूण रोजगार (म्हणजे सार्वजनिक आणि खाजगी संघटित क्षेत्रांत मिळून, दुसऱ्या शब्दात भारतात असलेल्या सर्व पंजीकृत कारखान्यांमधील ) १९९० च्या दशकाच्या शेवटापासून खूप वेगाने कमी झाली आहे. १९९८-२००५ मध्ये १७ लाख कामगार कमी झाले. जागतिकीकरणाची सुरुवात झाल्यानंतर १९९१ ते २००५ दरम्यान संघटित क्षेत्रातील एकूण कामगारांची संख्या वाढण्याऐवजी उलट २.७ लाखांनी कमी झाली आहे.''

भारतातील संघटित क्षेत्रातील रोजगार १९९१-२००५ (लाखात)

| वर्ष | पब्लिक सेक्टर | प्रायव्हेट सेक्टर | एकूण |
|---|---|---|---|
| १९९१ | १९०.६ | ७६.८ | २६७.३ |
| १९९८ | १९४.२ | ८७.५ | २८१.७ |
| २००५ | १८० | ८४.५ | २६४.६ |

यावरून हे स्पष्ट होते की MNCs मुळे निर्माण होणाऱ्या मूठभर रोजगारांपेक्षा नष्ट होणारा रोजगार खूपच जास्त आहे.

भांडवलदार वर्ग निर्भयपणे स्वत:चा नफा पहातो. देशातील वाढती बेरोजगारी आणि कमजोर कामगार चळवळी यांचा गैरफायदा घेऊन राज्यकर्ते कष्टकरी वर्गाला दिलेल्या सर्व सवलती काढून घेत आहेत. कायमस्वरुपी कामगारांच्या जागी कंत्राटी किंवा रोजंदारीवर कामगार घेतले जात आहेत. जे काही थोडेफार रोजगार शिल्लक उरले आहेत त्यांचा दर्जाही घसरलेला आहे. कामगार १० ते १२ तास काम करतात. त्यांना ओव्हरटाईम दिला जात नाही. सुट्टी दिली जात नाही. कामगारांच्या तारुण्यातील (निर्मिती क्षमतेतील) चांगली वर्ष पिळून घ्यायची आणि ४० व्या वर्षीच त्यांचा चोथा करून वापरुन फेकून देण्याची विनाशकारी धोरणं, अधिक नफ्याला चटावलेले इथले भांडवलदार लादत आहेत. या सगळ्या गोष्टी करणं या बड्या भांडवलदारांना सोप्प जावं म्हणून कामगारांना किमान सुरक्षा देणारे कामगार कायदे मूळापासून बदलले जात आहेत.

सॉफ्टवेअर आणि बीपीओ क्षेत्रातं भरपूर रोजगार निर्माण होत आहेत. असा प्रचार सध्या केला जात आहे. पण वस्तुस्थिती ह्याच्या ठीक उलट आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे दोन विभाग आहेत. एक म्हणजे सॉफ्टवेअर क्षेत्र आणि दुसरं त्यावर अवलंबून असलेलं बीपीओ क्षेत्र. (Business Process Outsourcing) २००३ पर्यंत ह्या क्षेत्रांत अनुक्रमे ४ लाख ९० हजार आणि १ लाख ६० हजार रोजगार होते. इतकेच. आणि २००७ पर्यंत ह्या क्षेत्रातील एकूण रोजगार भरभराट असून सुद्धा फक्त १६.३ लाख

झाले होते. म्हणजे देशांतल्या एकूण रोजगाराच्या एक टक्क्याच्या एक तृतीयांश फक्त ०.३३%! आणि हे विकसित देशांमध्ये घसरण चालू होण्यापूर्वी झाले.

शेतीक्षेत्रातील रोजगाराचा विनाश – शेतीक्षेत्राला बसलेल्या वादळी तडाख्यामुळे १९९४-२००० च्या दरम्यान ह्या क्षेत्रातील रोजगारवाढीचा दर शून्यावर पोचला आहे. खरंतर प्रतिवर्षी ०.०२% देशातील एकूण रोजगारापैकी दोन तृतीयांश रोजगार ज्या क्षेत्रांत उपलब्ध होतात. त्या क्षेत्राची ही स्थिती. जर पूर्वीप्रमाणे ह्या क्षेत्रांत रोजगार वाढत राहीला असता. तर ह्या क्षेत्रात ह्या काळात २.७ कोटी रोजगार निर्माण झाले असते.

**निष्कर्ष –**

अशाप्रकारे सरकारी आकडेही हे दर्शवतात की जागतिकीकरणाच्या नंतरच्या काळात रोजगार निर्मिती मध्ये परिणामकारक घसरण झाली आहे. NSS च्या १९८३, १९९३-९४ आणि १९९९-२००० च्या अहवालांमध्ये हे स्पष्ट दिसून येतं की रोजगार निर्मितीच्या वाढीमध्ये तीक्ष्ण घट झाली आहे. १९८३ ते १९९३-९४ काळातील २.७% प्रतिवर्षी वरुन ती १९९३-९४ ते १९९९-२००० च्या दरम्यान १.१% इतकी कमी झाली आहे. पहिल्या काळात दरवर्षी ७६ लाख नवीन रोजगार निर्माण होत होते. जे नंतरच्या काळात ३५ लाख प्रतिवर्षी इतके कमी झाले.

## ३.४ – शेतकऱ्यांच्या आत्महत्याः–

शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत शासनाचे धोरण कशा प्रकारचे आहे. याचे विश्लेषण या प्रकरणात केले आहे. १३ व्या विधानसभा निवडणूकीत सत्ताबदल होण्यासाठी हा घटक कशा प्रकारे कारणीभूत ठरला याचे विश्लेषण येथे केले आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही रोजचीच बातमी झाली आहे. गेल्या बारा वर्षात भारतात दीड लाखांहून अधिक शेतकरी आत्महत्येकडे वळले आहेत. आंध्रप्रदेश, कर्नाटक, मराठवाडा, विदर्भ सर्वात जास्त हालाखीची परिस्थिती विदर्भात आहे. १९९६ पासून महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. १९९९ साली २०००, २००१ मध्ये ३००० तर २००४ मध्ये ३८००, २००५ साली ३९२६, २००६ साली ४४५३ आणि २०१० अखेर १२ वर्षात नोंदलेल्या आत्महत्या ५० हजारहून अधिक आहेत.

## आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या

| साल | संख्या |
|---|---|
| १९९९ | २००० |
| २००१ | ३००० |
| २००४ | ३८०० |
| २००५ | ३९२६ |
| २००६ | ४४५३ |
| २०१० | ५० हजाराहून अधिक |

याला केवळ भारताचे राज्यकर्ते जबाबदार आहेत. १९९१ साली जागतिक नाणेनिधीचे कर्ज घेवून काँग्रेस शासनाने नाणेनिधीने बेतलेले लोकविरोधी खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण, धोरण रेटायला आरंभ केला. १९९५ साली बड्या बहूराष्ट्रीय कंपन्यांच्या नफेखोरीसाठी बेतलेला नवा गॅट करार अंमलात आला गॅटच्या अटींच्या अंमलबजावणीसाठी विश्व व्यापार संघटना (डब्ल्यू.टी.ओ) स्थापन करण्यात आली. गॅट कराराच्या अटी पाळण्याचे कारण पुढे करून काँग्रेस शासनाने खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण यांचे हल्ले तीव्र केले. जागतिकीकरणाच्या धोरणाला विरोध करत भाजपने स्वदेशीचा नारा देत सत्ता काबीज केली आणि काँग्रेस शासनापेक्षाही अधिक घातकपद्धतीने खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण केले. २००४ साली भाजपला सत्ता सोडावी लागली. भाजप आघाडी पराभूत झाली. काँग्रेस आघाडी पुन्हा सत्तेवर आली. केंद्रशासन व राज्यशासनातील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना, तेलगू देसम, अण्णा द्रमुख, जनता दल, बहुजन समाज पक्ष, समाजवादी पक्ष, अकाली दल सारेच सत्ताधारी पक्ष जागतिकीकरणाचे, खाजगीकरणाचे, उदारीकरणाचे धोरण लादत आहेत. सत्ताधारी वर्ग ह्यांच्या स्वार्थासाठी जी आर्थिक धोरणे राबवत आहते. ती शेतकऱ्यांची ससेहोलपट वाढवत आहेत. शेती नुकसानकारक करीत आहेत. परिणामी कर्जाचा डोंगर पेलवत नसल्यामुळे शेतकरी आत्महत्येकडे वळत आहेत. विशेष आर्थिक क्षेत्र, खाणपट्टे, औद्योगिक वसाहती, महानगरविस्तार, विमानतळ, महामार्ग, बंदरे उभारण्याच्या नावाने शासन शेतकऱ्यांच्या जमिनी बळजबरीने हिसकावून घेत आहे. आदिवासी शेतकरी, शेतमजूर, कारागीर आदी श्रमिकांना जीवनातून उठवून लावण्यापर्यंत निर्घृण हल्ले शासन करीत आहे. आदिवासी-शेतकरी लाठ्या, गोळ्या झेलत शेती वाचवण्यासाठी लढत आहे. परंतु अन्यत्र जमीन प्रत्यक्ष हिरावून घेतली नाही तरी नवे शेती धोरण शेती आतबट्ट्याची बनवत आहे आणि कर्जापायी जमीन गमावण्याचीही वेळ येत आहे. शासनाच्या जागतिकीकरणाच्या धोरणाचे ते दुष्परिणाम आहेत. नव्या शेती धोरणाखाली भारतातील संपन्न, सुजलाम, सुफलाम भूमी बहुराष्ट्रीय कंपन्या व बड्या भारतीय कंपन्या यांना ताब्यात घेता यावी असे बदल कायद्यात, कर, किंमत आदी धोरणात शासन करीत आहे. परदेशातील व देशातील धनिकांसाठी भारतात बारमाही सहज बहरणारी फळे, फुले सुगंधी वनस्पती, मसाल्याचे पदार्थ पिकविण्यासाठी शेतजमीन वळवली जात आहे. मग त्यापायी देशातील धान्यडाळीचे उत्पादन घटले तरी शासनाला पर्वा नाही. त्याद्वारे अमेरिका, युरोपात मुबलक उत्पन्न होणारा

गहू, सोयाबीन, दूध भूकटी यांच्या उत्पादनासाठी भारतामध्ये बाजारपेठ निर्माण केली जात आहे. शासनाने नवीन आर्थिक धोरणाखाली सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक कमी करुन, शेतीची आदाने महाग करून व आयात खुली करणाने शेतमालाच्या किंमती कमी करून नव्या बियाणांद्वारा फसगत करून शेती आतबट्ट्यांची केली आहे. परिणामी कर्जाच्या डोंगराखाली शेतकरी मोडून गेला आहे. व्यापक संघटनेचा आधार नाही त्यामुळे एकटे पडून अगतिकतेने शेतकरी आत्महत्येकडे ढकलले जात आहेत.

१९९१ पासून खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण विशेषतः १९९५ पासून गॅट कराराच्या अंमलाखाली आयात खुलीकरणामुळे शेतमालाच्या किंमती कोसळून भारतातील शेतकरी मोठ्या अरिष्ठात अडकला आहे.

१९९५ साली महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्येची संख्या ९७८ व स्त्रियांच्या आत्महत्या संख्या १०५ होती. २००० साली ३०२२. २००४ – ४१४७ पुरुष शेतकऱ्यांनी आत्महत्या. १९९५ ते २००४ या दरम्यान महाराष्ट्रामध्ये २८०४८ शेतकऱ्यांच्या आत्महत्या नोंदल्या गेल्या. २००५ साली ३९२६. २००६ साली ४४५३ म्हणजे २००६ सालाअखेर ३६४२८ शेतकऱ्यांच्या आत्महत्येची अधिकृत नोंद आहे.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या (महाराष्ट्र)

| सन | संख्या |
|---|---|
| १९९५ | ९७८ |
| २००० | ३०२२ |
| २००४ | ४१४७ |
| २००५ | ३९२६ |
| २००६ | ४४५३ |

[2] (संदर्भ : शेतकरी जात्यात, लेखिका– सुलभा ब्रह्मे, धनंजयराव गाडगीळ जन्मशताब्दी प्रबोधनमाला)

आत्महत्येच्या कारणांचा शोध घेतला तर कर्जांचा असह्य बोजा, वसुलीसाठी तगादा, जमिनीवर तगादा, जमिनीवर कब्जा इ. तसेच कर्जाचा बोजा वाढण्याची मुख्य कारणे खते, कीटक नाशके यांची वाढती गरज व वाढलेले भाव यामुळे वाढता शेती खर्च आणि घसरलेले शेतमालाचे भाव, खाजगी कर्जावरील वाढते अवलंबन, बी टी कापसाबाबत फसवणूक हे दिसून येते.

शेतकऱ्यांच्या जीवनसाधनांवर होत असलेल्या हल्यामुळे भारतीय शेतकरी उध्वस्त झाला आहे. शेतकरी आणखी कर्जाच्या सापळ्यात अडकत आहेत. २००५ मध्ये केलेल्या शेतकरी कुटूंबाच्या एका अधिकृत अहवालाप्रमाणे ५०% शेतकरी कुटुंब कर्जाच्या विळख्यात होते. यामधील एक तृतियांश शेतकऱ्यांनी खाजगी सावकारांकडून कर्जे घेतली होती. जे २४ ते १००% व्याज आकारतात.

१५ वर्षे विरोधी धोरणाचे आघात सहन केल्यानंतर काटक भारतीय शेतकरी सुद्धा निराशेच्या गर्तेत पोहोचून आत्महत्या करत आहेत. गेल्या १० वर्षांत झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आकडा धक्कादायक आहे. १.५ लाखांपेक्षा जास्त.

भारतीय शेतकरी एका बाजूला पूर्णपण उध्वस्त होत असताना कॉर्पोरेट घराण्यांना मात्र भारतीय शेतीत घुसण्यासाठी हिरवा कंदील दाखवला जात आहे. जागतिक बँक व केंद्र सरकारच्या दबावाखाली

बहुतेक राज्य सरकारांनी कृषी उत्पादन बाजार समिती कायद्यात सुधारणा केली आहे. ह्यामुळे कारगील, पेप्सीको, आयटीसी, रिलायन्स सारख्या कंपन्या शेतकऱ्यांशी थेट करार करू शकतात. त्यांच्याकडून पिकांची थेट खरेदी करू शकतात. ह्याची सुरुवात झाली आहे. ह्या महाकाय शेतकी कंपन्यांनी जागतिक बाजारपेठेसाठी खास फळ, भाज्या, फुलांचे उत्पादन करण्यासाठी हजारो शेतकऱ्यांबरोबर करार केला आहे. १९९१ साली जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाल्यापासून ८० लाख हेक्टर अन्नधान्याचे उत्पादन करणारी जमीन निर्यातप्रवण पिकांसाठी वापरली गेली आहे. नजीकच्या भविष्यात छोटी शेती उध्वस्त झाल्यानंतर, ह्या बड्या कंपन्या आपल्या मालकीचे अत्याधुनिक फार्मस् उभारणार- जसे त्यांनी इतर गरीब देशांमध्ये उभारले आहेत.

साम्राज्यवाद्यांनी भारतीय शेतीला आपल्या पंजात जखडून ठेवले आहे. ते आपल्या योजनांमध्ये कमालीचे यशस्वी झाले आहेत. भारतीय छोट्या शेतकऱ्यांना गरिबीच्या खाईत ढकलण्याच्या, त्यांना आत्महत्या करायला भाग पाडण्याच्या त्यांच्या जमिनी बळकावण्याच्या; भारतीय शेतीक्षेत्राला हळूहळू कॉर्पोरेट स्वरुप देण्याच्या म्हणजे मग जगातील सर्वात सुपीक जमिनी विकसित देशातल्या धनदांडग्यांना पोसण्यासाठी उपलब्ध होतील.

**जागतिकीकरणाच्या परिणामाबाबत -**

'दि इकॉलॉजिस्ट'चे संपादक आणि पर्यावरण चळवळीतील विभूती एडवर्ड गोल्डस्मिथ यांनी असे म्हटलेले आहे. 'टाईम्स ऑफ इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले - ''भारतातील दोन-तीन एकरापेक्षा कमी जमीन असलेले शेतकरी (जागतिकीकरणात) कसे काय टिकू शकतील? ते नाही टिकू शकणार ते सर्व शहरांमधल्या झोपडपट्ट्यांकडे ढकलले जातील. झाडून सारे आणि जेव्हा तुमचा छोटा शेतकरी वर्ग असा आयुष्यातून उठेल. तेव्हा तुमचे छोटे दुकानदार, विक्रेते बलुतेदारही उरणार नाहीत. ते सर्व जण उखडले जातील कारण त्यांचे अस्तित्त्वच मुळी शेतकऱ्यांवर अवलंबून आहे. अशा रीतीने तुम्ही ६० ते ७० कोटी लोकांना देशोधडीला लावाल आणि त्यांना कंगाल बनवाल.''

''सत्तर कोटी लोकांना देशोधडीला लावण्याचे काय परिणाम होतील तुम्हाला कल्पना आहे? जगात आजवरच्या इतिहासात हे कोणीही केलेले नाही! तुमच्या देशाच्या जागतिकीकरणाचे हेच अपरिहार्य परिणाम आहेत ते भारताला उध्वस्त करेल.''

भारताच्या एकूण विकासावर ह्याचा विपरीत परिणाम तर होणारच आहे. पण भारतीय जनतेवरही त्याचा विनाशकारी परिणाम होईल.

२०१४ विधानसभा निवडणुकीत भाजपला सत्ता मिळाली कॉंग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, मनसे इत्यादी पक्ष असताना देखील. २०१४ विधानसभा निवडणूकीपूर्वी, १६ व्या लोकसभेची निवडणूक झाली. त्यामध्ये भाजपला सत्ता प्राप्त झाली. त्यावेळी केंद्रात म्हणजेच दिल्लीत रामदेव बाबांचे काळ्या पैशाविरोधातील भ्रष्टाचाराचे आंदोलन तसेच स्वातंत्र्यसैनिक जेष्ठ अण्णा हजारे यांचे जनलोकपालबाबत पर्यायाने भ्रष्टाचाराबाबत आंदोलने चालू होती. जनलोकपाल विधेयकाला सर्व देशातून प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला. अण्णा हजारे यांचे हे विधेयक सरकारकडून अखेर मान्य करण्यात आले. तसेच स्वीस बँकेत असलेला भारतीयांचा काळा पैसा परत आणावा ह्या मागणीसाठी योगगुरु रामदेवबाबांनी जे

आंदोलन केले त्याला ही जनतेकडून प्रचंड प्रमाणात पाठिंबा मिळाला. परंतु रामदेवबाबांनी उपोषण सोडले अशी खोटी माहिती काँग्रेस नेते कपिल सिब्बल यांनी जनतेला दिली यावर रामदेवबाबांनी आणखी तीव्रपणे आंदोलन उभारले. परंतु सरकारने निर्दयपणे रामदेवबाबांचे आंदोलन मोडीत काढले. पोलिसांनी लाठीमार, अश्रूधूरांचा वापर करुन हे आंदोलन, खूप निर्दयपणाने मोडीत काढले.

या सगळ्यांचा परिणाम प्रसार माध्यमांमुळे भारतीय जनतेवर होत होता. सरकारची प्रतिमा खूप खराब झाली होती. प्रसार माध्यमांद्वारे बातम्या देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचविल्या जात होत्या. त्यामुळे जनतेमध्ये प्रचंड प्रमाणात राग सत्ताधाऱ्यांविषयी होता. त्याचाच परिणाम १६ व्या लोकसभा निवडणूकीत तसेच १३ वी विधानसभा निवडणुकीच्या निकालात दिसून आला.

त्याचप्रमाणे १६ वी लोकसभा निवडणूक होण्यापूर्वी दिल्ली विधानसभेच्या निवडणूका झाल्या, विशेष म्हणजे अरविंद केजरीवाल विरुद्ध १५ वर्षे दिल्लीची सत्ता अनुभवलेल्या शिला दिक्षीत यांचा या निवडणुकीत प्रचंड प्रमाणात पराभव झाला.

अरविंद केजरीवाल हे अण्णा हजारे यांच्या टिममधीलच एक घटक होते. त्यांनी ‘आम आदमी’ नावाचा एक स्वतंत्र पक्ष निर्माण केला. ‘झाडू’ हे या पक्षाचे चिन्ह होते. झाडूने भ्रष्टाचार झाडून काढायचा आहे, असे निवडणूकीमधील त्यांचे घोषवाक्य होते. दिल्लीतील जनतेने या ‘आप’ ला निवडून दिले. खरोखरीच निवडणूकीत दिलेल्या आश्वासनांप्रमाणे अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्री बनल्यावर पाणी मोफत, वीजबिल निम्मे करून दाखविले. काही कारणास्तव ४९ दिवसांतच अरविंद केजरीवालांनी राजीनामा दिला. प्रसारमाध्यमांमुळे जनतेत जागृती भ्रष्टाचाराविरुद्ध होतच होती. अरविंद केजरीवाल मोफत पाणी, निम्मे वीजबिल करून दाखवितात तर इतर राजकारणी सत्ताधारी का करत नाहीत? असा प्रश्न सर्वसाधारण जनतेपुढे निर्माण झाला. ही सर्व पार्श्वभूमी देखील १३ वी विधानसभा निवडणूकीत भाजपचा विजय होण्यास कारणीभूत ठरली आहे. या सर्व घटनांचा घेतलेला आढावा पुढीलप्रमाणे –

## ३.५ भ्रष्टाचारविरोधातील जनआंदोलने –

१३ व्या विधानसभेच्या निवडणूकीत भाजपला यश मिळण्यामागे तसेच आघाडी सरकारवरील असंतोषाचे एक कारण म्हणजे रामदेव बाबांचे काळ्या पैशांविरोधातील आंदोलन, तसेच अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचाराविरोधातील जनआंदोलन. या प्रकरणात रामदेव बाबांचे आंदोलन, काळा पैसा म्हणजे काय? रामदेवबाबांचे आंदोलन काँग्रेस राष्ट्रवादी आघाडी सरकारने कोणत्या पद्धतीने मोडीत काढले, आंदोलन मोडीत काढताना समर्थकांवर, आंदोलनकर्त्यांवर झालेले अत्याचारांचा आढावा घेतलेला आहे. ह्या सगळ्या गोष्टींवरुन सरकारवर झालेली प्रचंड टीका या गोष्टीचा सविस्तर आढावा या प्रकरणात घेतला आहे. काळा पैसा, भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनामुळे लोकांमध्ये काँग्रेस राष्ट्रवादी आघाडी सरकारविरोधात जनजागृती होण्यास मदतच झाली.

रामदेव बाबा व त्यांच्या समर्थकांनी काळा पैसा, भारतात परत आणावा यासाठी हे आंदोलन केले. काळा पैसा म्हणजे बेहिशोबी उत्पन्न, भूमिगत पैसा, अनधिकृत धन, देय असणारा कर चुकवून जमा केलेला पैसा होय. [3] (अभय टिळक, इयर बुक २०१५, पान नं. – २२५)

नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ पब्लिक फायनान्स ॲण्ड पॉलिसी या संस्थेने भारत देशातील काळ्या पैशाच्या संदर्भात १९८५ मध्ये एक शोध अहवाल सादर केला, त्यामधील व्याख्येनुसार, करपात्र असणारे परंतु कर संकलन व्यवस्थेपासून दडवलेले उत्पन्न म्हणजे काळे उत्पन्न अथवा काळा पैसा. [4](अभय टिळक – सकाळ इयर बुक – २०१५, पान नं. २२६)

देशातील काळ्या पैशाची मोजदाद, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स ॲण्ड पॉलिसी या संस्थेने आजवर तीन वेळा केली त्यानुसार –

१) १९७५–१९७६ – ९ हजार ९५८ कोटी ते ११ हजार ८७० कोटी

२) १९८०–८१ – २० हजार ३६२ कोटी ते २३ हजार ६७८ कोटी

३) १९८४–८५ – ३१ हजार ५८४ कोटी ते ३६ हजार ७८४ कोटी

आपल्या देशात एवढा काळा पैसा असावा असा अंदाज त्या संस्थेने मांडला. [5] (अभय टिळक – काळा पैसा – सकाळ इयर बुक – २०१५, पान नं. २२७)

रामदेवबाबांनी परदेशात असलेला (स्विस बँकेत असलेला) काळ्या पैशांच्या विरोधात आंदोलन केले जगामधील काही देश भौगोलिकदृष्ट्या आकाराने अत्यंत छोटे ते देश त्यांच्या अर्थव्यवस्थांमध्ये परकीय पैसा ठेव रुपाने यावा यासाठी असा पैसा तिथे ठेवणाऱ्या ठेवीदारांना गोपनियता पुरवितात. हा पैसा ठेवीदाराने कोठून आणला त्याच्यावरील कर भरला आहे का? इत्यादी प्रश्न ते देश ठेवीदाराला विचारत बसत नाहीत. त्यामुळे भारतातील काळ्या पैशांबाबत पुरेशी माहिती मिळत नाही. ज्या भारतीयांची खाती परदेशी बँकांमध्ये आहेत. त्यांच्याबद्दल भारताने त्या त्या देशांकडे चौकशी करून ती माहिती मागितली तरी ठेवीदारांबरोबर त्या त्या देशांनी गोपनियतेचे काही करार केले असल्याने ती माहिती सामान्य माणसाला मिळू शकत नाही. [6] (लढा लोकपालचा – उद्रेक आम आदमीचा – धनंजय बिजले, मेहता पब्लिशिंग हाऊस, पान नं. ११०,१११)

अण्णा हजारे यांचे आंदोलन एप्रिल २०११ मध्ये झाले. त्यामुळे संपूर्ण भारतभर भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर जनजागृती होत होती. काळा पैसा हीदेखील एक देशापुढील समस्या आहे. ‘काळापैसा परदेशात ठेवण्यात आला आहे हे स्पष्ट बरेचवेळा झाले आहे. स्वामी रामदेवबाबा यांनी हा मुद्दा ऐरणीवर आणला. परदेशात ठेवलेला काळा पैसा देशात परत आणावा या मागणीसाठी स्वामी रामदेवबाबा यांनी दिल्लीतील रामलीला मैदानावर ४ जून २०११ रोजी आमरण उपोषण सुरु केले. त्यांना पाठिंबा देण्यासाठी रामलीला मैदानावर सुमारे ६५ हजार समर्थक गोळा झाले. रामदेवबाबा यांनी उपोषण सोडल्याचे आश्वासन दिल्याचे पत्र केंद्रीय मंत्री कपिल सिब्बल यांनी पत्रकार परिषदेत दिले. यावर रामदेवबाबा यांनी आपली भूमिका अधिक ठामपणे केली. ५ जून २०११ रोजी मध्यरात्री रामलीला मैदानावर निदर्शक झोपले होते त्यावेळी रामदेव बाबा आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करीत असताना पोलीसांनी अचानक मैदानावर धाड टाकली. त्यात लाठी हल्ला आंदोलनकर्त्यांवर केला. अश्रुधूर सोडला, मंडप पेटवून दिला. यामध्ये ५३ जण जखमी झाले. ह्यामध्ये एक महिला मृत्यूमुखी पडली. स्वामी रामदेवबाबा यांच्यावर पंधरा दिवस दिल्लीत प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली. ज्याप्रकारे रामदेवबाबांचे आंदोलन मोडून काढण्यात आले त्यावरुन सरकारवर प्रचंड टीका झाली. [7] (लढा लोकपालचा – उद्रेक आम आदमीचा – धनंजय बिजले, मेहता पब्लिशिंग हाऊस, पान नं. ११०,१११)

## रामलीला मैदानावरील उपोषण : अण्णा हजारे

अण्णा हजारे यांनी रामलीला मैदानावर उपोषण सुरू केले होते. जनलोकपाल विधेयक आणल्याशिवाय हे ठिकाण सोडणार नाही असे त्यांनी जाहीर केले. २० ऑगस्ट २०११ रोजी हजारे यांच्या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी हजारो समर्थक रामलीला मैदानावर आले. त्यावेळी हजारे यांचे हे आंदोलन भारतातील लोकशाही प्रक्रियेतील तडजोडीला विरोध करणारे असल्याची टीका त्यांच्या विरोधकांनी केली. लोकपाल विधेयक संमत करण्यासाठी हजारे यांनी घातलेल्या मुदतीमुळे लोकशाहीचे अवमूल्यन होत आहे अशी टीका 'द नॅशनल कॅम्पेन फॉर पीपल्स राईट टू इन्फरमेशन (एन.सी.पी.आर.आय) या संस्थेने केली. कोणत्याही विषयावर व्यापक, साधक-बाधक चर्चा आणि योग्य प्रकारे चर्चेनंतर एकमत हे लोकशाहीत अभिप्रेत असते.

अण्णा हजारे यांच्याशी चर्चा करून तोडगा काढण्याचे प्रयत्न करण्याची जबाबदारी कॉंग्रेसने महाराष्ट्राचे अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) उमेशचंद्र सरंगी यांच्यावर टाकली. रामलीला मैदानावर उपोषणास बसलेल्या हजारे यांना समर्थन देण्यासाठी २१ ऑगस्टला रामलीला मैदानावर हजारो लोकांची गर्दी झाली होती. उपोषणाला बसलेल्या दिवसापासून २१ ऑगस्टपर्यंत त्यांचे वजन सात पौंडाने कमी झाले होते. असे असताना ते म्हणाले, संसदेत जनलोकपाल विधेयक मंजूर होईपर्यंत मी उपोषण सोडणार नाही. मी मरु शकतो पण कोणापुढे वाकणार नाही. भ्रष्टाचार विरुद्धच्या लढ्याला समर्थन देण्यासाठी रामलीला मैदानावर एक लाख समर्थकांची गर्दी झाली होती. भ्रष्टाचारविरोधी प्रभावी कायदा आणण्याच्या मागणीसाठी मुंबईच्या रस्त्यावर शेकडो समर्थक उतरले. बांद्रा रेल्वे स्थानकापासून सुरु झालेली ही फेरी जुहूमधून काढण्यात आली होती. अण्णा हजारे यांच्या आंदोलनाला दक्षिणेतील रजनीकांतने पाठिंबा जाहीर केला. दक्षिणेतील अभिनेता विजय यानेही रामलीला मैदानाला भेट देत हजारे यांच्यासमवेत एक दिवस उपोषण करीत आंदोलनाला पाठिंबा दिला. सर्व स्तरांतून उपोषणाला पाठिंबा मिळू लागला. केंद्रीय मंत्री पी. चिदंबरम, कपिल सिब्बल यांच्यासह अन्य कोणत्याही मध्यस्थाशी चर्चा करण्यास हजारे यांनी उपोषणाच्या ७ व्या दिवशी नकार दिला. जनलोकपाल विधेयकाबाबत आपण केवळ कॉंग्रेसचे उपाध्यक्ष राहूल गांधी पंतप्रधानांचे कार्यालय किंवा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याशीच चर्चा करू असे अण्णा म्हणाले. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी २३ ऑगस्ट २०११ रोजी अण्णा हजारे यांना उपोषण समाप्त करण्याचे आवाहन केले. त्यांनी हजारे यांना याबाबत पत्रही लिहिले. त्यानंतर डॉ. मनमोहन सिंग यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. अण्णांनी तीन मागण्या संसदेत ठेवल्या. १) प्रत्येक राज्यात लोकपालचे अधिकार असणारे लोकायुक्त असावेत. २) नागरिकांची सनद असावी. ३) लोकपालच्या कक्षेत खालपासून वरपर्यंत सर्व नोकरशाही असावी.

## ३.६ – १६ व्या लोकसभा निवडणूकीचा प्रभाव, भाजपाला मिळलेले बहुमत–

२०१४ च्या विधानसभा निवडणूकीवर त्यापूर्वी झालेल्या १६ व्या लोकसभेच्या (७ एप्रिल ते १२ मे २०१४) ह्या कालावधीत झालेल्या निवडणूकीच्या निकालाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. तसेच मोदी सरकारचे गुजरात मॉडेल, नरेंद्र मोदींचा प्रभाव त्या अनुषंगाने मोदी लाटेचा प्रभाव विधानसभेच्या निवडणुकीवर पडलेला दिसून येतो. मोदी लाट कशी निर्माण झाली व ती लाट निर्माण करण्यात

प्रसारमाध्यमांनी कशाप्रकारे भूमिका बजावली त्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचे योगदान कशाप्रकारे होते. आधुनिक तंत्रज्ञानामुळे मोदींच्या प्रचाराला योग्य वेग मिळाला तो कसा? तसेच नरेंद्र मोदींचा परिचय या प्रकरणांमध्ये करून दिलेला आहे.

नरेंद्र मोदींची प्रचार यंत्रणा तसेच इतर पक्षांची प्रचारयंत्रणा कशा प्रकारे होती, नरेंद्र मोदींच्या विरोधात उभे राहिलेले राहुल गांधी यांचे निवडणूक काळातील धोरण कसे होते व शेवटी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या वेळी मोदींची उपस्थिती असलेल्या प्रचारसभा व त्यांनी दिलेली आश्वासने, जाहिरनामा व भाजपच्या प्रचारसभांना नरेंद्र मोदींची उपस्थिती व त्यामुळे भाजपला मिळालेला विजय कसा कारणीभूत झाला त्याचे विश्लेषण या प्रकरणामध्ये केलेले आहे.

भारतात दर ५ वर्षांनी लोकसभेच्या निवडणुका होत असतात. भारतीय राज्यघटनेतील ३२४ व्या कलमान्वये त्यानुसार ५ मार्च २०१४ रोजी भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त व्ही. एन. संपत यांनी १६ व्या लोकसभेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. १ एप्रिल २०१४ ते १२ मे २०१४ एकूण ३४ दिवसांचा निवडणूकीचा कालावधी होता. एकूण ९ टप्प्यांमध्ये ही निवडणूक पार पाडली गेली. एकूण ८१ कोटी ४० लाख मतदारांनी मतदान केले. महाराष्ट्रातदेखील ३ टप्प्यांमध्ये ही निवडणूक दिनांक १०, १७ व २४ एप्रिल २०१४ ह्या कालावधीत पार पाडली गेली. १६ मे रोजी निकाल जाहीर झाला व त्यानुसार–

| | |
|---|---|
| भाजपाला – २८२ | काँग्रेसला – ४४ |
| अण्णाद्रमुक – ३७ | तृणमूल काँग्रेसला – ३४ |
| बिजु जनतादल – २० | शिवसेना – १८ |
| तेलगू देसम – १६ | तेलंगण राष्ट्रसमिती – ११ |
| वायएसआर काँग्रेस पार्टी – ९ | सीपीआयएम – ०९ |
| लोकजनशक्तीपार्टी –०६ | राष्ट्रवादी काँग्रेस – ०५ |
| समाजवादी पार्टी – ०९ | आम आदमी पार्टी – ०४ |
| इतर – ४२ | एकूण = ५४३ |

या निवडणूकांमध्ये यु. पी. ए. आघाडीला ५८ जागा मिळाल्या. या लोकसभा निवडणुकीमध्ये नरेंद्र मोदी हे भाजप पक्षाचे उमेदवार होते तर त्यांच्या विरोधात काँग्रेसचे राहुल गांधी उभे होते या निवडणुकीमध्ये नरेंद्र मोदी भाजप या पक्षाचे उमेदवार प्रचंड मतांनी निवडून आले. लोकसभेत ज्या पक्षाला बहुमत प्राप्त होते त्या पक्षाच्या नेत्यांची पंतप्रधान म्हणून निवड केली जाते. त्यानुसार नरेंद्र मोदींनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. नरेंद्र मोदी यांना एकूण मते ५,७०,१२८ वडोदरा मतदारसंघातून मिळाली.

खालील काही राज्यातील सर्वच्या सर्व लोकसभेच्या जागा जिंकण्याचा विक्रम भाजपाने केला.

| | | |
|---|---|---|
| राजस्थान २५ पैकी २५ | गुजरात २६ पैकी २६ | दिल्ली ७ पैकी ७ |
| उत्तराखंड – ०५ पैकी ०५ | हिमाचल प्रदेश – ४ पैकी ४ | |

**मतदानाची टक्केवारी**

| | | |
|---|---|---|
| भाजपा – ३१% | काँग्रेस – १९.३% | बसपा – ४.१% |
| आप – २% | इतर – १६.३% | |

या लोकसभेच्या निवडणुकांच्या निकालाचा प्रभाव त्यानंतर झालेल्या विधानसभांच्या निवडणुकांवर पडलेला दिसून येतो. [8] (सकाळ इयर बुक – २०१५, पान नं. १४)

## लोकसभा निवडणूक – २०१४ मध्ये निवडून आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदींचा परिचय व राजकीय कारकिर्द.

## मोदी लाटेचा प्रभाव मल्टिमिडीयाचा प्रभावी वापर सत्तेवर आल्यावर मोदींनी राबविलेली धोरणे –

नरेंद्र मोदी यांचा जन्म १७ सप्टेंबर १९५० रोजी वड्नगर गुजरात येथे झाला. आईचे नाव हिराबेन. नरेंद्र मोदी हे भारतीय जनता पक्षाचे आहेत.

## नरेंद्र मोदींची राजकीय कारकिर्द –

९ ऑक्टोबर २००१, गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी पहिल्यांदा निवड करण्यात आली. १९८३ मध्ये गुजरातचे भाजपा महासचिव पद त्यांना मिळाले. त्यानंतर १९९० लालकृष्ण अडवाणी यांच्या सोमनाथ-अयोध्या यात्रेत महत्त्वपूर्ण भूमिका त्यांनी बजावली. १९९५ साली केंद्रात महत्त्वपूर्ण जबाबदारी बजावून ते पाच राज्याचे प्रभारी बनले. ७ ऑक्टोबर २००१ रोजी पहिल्यांदाच गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. २००२, गुजरातमध्ये गोध्रा दंगल झाली त्यामुळे नरेंद्र मोदी सरकारवर खूप टीका झाली. २००२ ते २००७, नरेंद्र मोदीजी दुसऱ्यांदा गुजरातचे मुख्यमंत्री झाले. २००७ ते २०१२, तिसऱ्यांदा गुजरातचे मुख्यमंत्री झाले. २०१२ ते २०१४, चौथ्यांदा गुजरातचे मुख्यमंत्री झाले.

गुजरातच्या मुख्यमंत्री पदाचा कार्यभार जवळजवळ १२ वर्षे त्यांनी सांभाळला. ते वाराणसी, वडोदरा दोन्ही मतदारसंघातून प्रचंड बहुमताने निवडून आले. २९ मे २०१४ रोजी नरेंद्र मोदींनी आपल्या साऊथ ब्लॉक कार्यालयाचा पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला. मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या कमी ठेवणे यावर मोदी सरकारचा भर दिसून येत आहे. नरेंद्र मोदी भारताचे १५ वे पंतप्रधान आहेत. त्यांच्या शपथविधीच्या सोहळ्यासाठी पाकिस्तानचे – नवाझ शरिफ (पंतप्रधान), अफगाणिस्तानचे अध्यक्ष – हमीद करझई (अध्यक्ष), मॉरिशसचे पंतप्रधान – नवीन राम गुलाम, श्रीलंकेचे अध्यक्ष – महिंद्र

राजाध्यक्षे, भुतानचे पंतप्रधान – सुशिल कोईराला, मालदीवचे अध्यक्ष – अब्दूला यामिन अब्दूल गयुम ह्यांची उपस्थिती होती. [9] (सकाळ इयर बुक २०१५, पान नं. १६)

नरेंद्र मोदी लोकसभेची निवडणूक जिंकले यापाठीमागे त्यांनी केलेला प्रचार, मल्टिमिडीयाचे योगदान खूप महत्त्वपूर्ण आहे. मोदींजींना सत्तेवर येण्यास मल्टिमिडीया प्रचाराचा खूप मोठ्या प्रमाणावर उपयोग झालेला आहे. लोकसभा निवडणूक – २०१४ भारतातील या निवडणुकीमध्ये पहिल्यांदाच टेलिव्हिजनला व्यासपीठाचा दर्जा दिला होता.

मागील निवडणूकांचा आढावा घेतला तर १९८९ च्या निवडणुकीच्या वेळी देशामध्ये फक्त दूरदर्शन होते. २००४ मध्ये अर्धा डझन नॅशनल चॅनेल्स व फक्त १२ प्रादेशिक चॅनेल्स होती. माहिती आणि प्रसारण खात्याच्या यादीनुसार २०१४ मध्ये चोवीस तास बातम्या देणारी सुमारे ४०० चॅनेल्स भारतात प्रसारण करीत होती. [10] (राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर पब्लिकेशन्स पान. १९६)

‘या लोकसभा निवडणुकीचं वैशिष्ट्चे म्हणजे नरेंद्र मोदींना महाराष्ट्रातून शेतकरी नेते राजू शेट्टी, रामदास आठवले, दिल्ली मधून उदीतराज, कर्नाटकातून माजी मुख्यमंत्री बी.एस. येडूरप्पा, आंध्रप्रदेश मधून माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू अनेक उद्योगपतींचा तसेच फिल्मस्टार विजयकांत, तामिळनाडूचा आघाडीचा नेता. डी.एम.डी.के. देसीया मुरपोक्कू द्रविड कळघम या सर्वांचा भाजपाला पाठिंबा मिळाला.

नरेंद्र मोदींचा निवडणूक प्रचारामागचा दृष्टीकोनच परिपूर्ण होता. मोदीजींच्या निवडणूकीच्या जाहिरनाम्याचं थेट प्रक्षेपण टिव्हीवरुन होत होतच शिवाय भाजप पक्षाची वेबसाईट, यु ट्यूब, ट्विटर, फेसबुक, मोबाईल, डायल इन्स, वॉटस् ॲप यावरुन त्यांचा प्रचार चालू होता. भारतातील प्रत्येक राज्याच्या बोलीभाषेत जाहिराती फिल्मस् आणि गाणीही भोजपुरी किंवा मैथिली सारख्या स्थानिक बोली भाषेत बनवलेली होती. उत्तर प्रदेशाच्या पाच विभागांसाठी वेगवेगळ्या जाहिराती तयार केल्या होत्या, त्या उर्दू भाषेमधील होत्या. काश्मिरच्या खोऱ्यासाठी असलेल्या जाहिरातीमध्ये म्हटले होते, ‘जन्नतु यहाँ, तरक्की कहाँ बंगालमधल्या जाहिरातींमध्ये चिटफंड घोटाळ्यांवर भाष्य केली होती. तर उत्तराखंडमध्ये पुराच्या आपत्तीनंतर आलेल्या अपुऱ्या मदत कार्यावर भर दिलेला असे. सौगंध मुझे इस मिट्टी की देश नही मिटने दूँगा, मोदींनी, त्यांच्या भाषणात ते वापरले. या गाण्यात मोदीही स्वत: मुठी आवळलेले दिसतात हे गाणं मनोरंजनाच्या चॅनेल्सवर दाखवलं गेलं. पंजाब मधल्या प्रेक्षकांसाठी या गाण्याचं भाषांतर पंजाबमध्ये करण्यात आलं होतं. वाराणसीमध्ये ‘मां गंगा ने बुलाया है’ हे वाक्य वापरुन नवीन जाहिरात तयार करण्यात आली होती. भाजपची जाहिरात मोहिम मोदींभोवती फिरणारी होती. भाजपच्या जाहिरातींमध्ये मोदींना केंद्रस्थानी ठेवले होते. भाजपची प्रचार मोहिम नरेंद्र मोदींचीच प्रतिमानिर्मिती करणारी होती.

काँग्रेस पक्षाच्या जाहिरातीत मोठा फरक होता. भाजपच्या जाहिराती साध्या, सोप्या होत्या, त्यातला संदेशही स्पष्ट होता. याउलट काँग्रेस या पक्षाच्या जाहिराती जुनाट कल्पना आणि शब्दजंजाळात अडकल्या होत्या. विशेषत: हिंदीमध्ये, अराजकता, काजनीती, सशक्तीकरण असे जडजड शब्द या जाहिरातीमध्ये वापरण्यात आले होते. हल्ली कोणीही अशी भाषा वापरत नाही. तसेच काँग्रेसमधे कुठल्याही बाबतीत स्पष्टता नव्हती. मोदींच्या प्रचारातील काही जाहिरातींमध्यें ॲनिमेशनच्या वापर करण्यात आला

होता. ह्या आधीच्या निवडणूकांमध्ये राजकीय प्रचारासाठी ॲनिमेशनचा उपयोग कधी कोणी केला नाही. जाहिरातींचा पहिला टप्पा रागाविषयी होता, तर दुसऱ्या टप्प्यात आशेवर भर दिला होता. 'अच्छे दिन आनेवाले है या ओळीनेच लाखो लोकांच्या हृदयाचा ठाव घेतला. मोदी प्रचारात ॲनिमेशनमध्ये अनेक जाहिराती केल्या ज्यात क्रिकेट आणि राजकारण एकमेकांमध्ये गुंफलेलं होतं. एका जाहिरातीत कप्तानाबरोबर अंपायर टॉससाठी जातो आणि आपल्याबरोबर एकच कप्तान आहे हे त्याच्या लक्षात येतं. त्याबरोबर घोष वाक्य येतं, 'बिना कप्तान की टीम खायी मार, अब की बार मोदी सरकार.' भाजपच्या प्रचारामध्ये प्रचारातील तीव्रता प्रकर्षाने जाणवते. ९ आठवड्यांच्या काळात १६ स्केअरने खास टिव्हीसाठी २०० जाहिराती, रेडिओवर ३०० स्पॉटस् आणि १००० हून जास्त वृत्तपत्र तसेच रस्त्यावर लावण्यासाठी जाहिराती बनवल्या होत्या. मतदानाच्या प्रत्येक दिवशी त्या त्या विभागातल्या वर्तमानपत्रापर्यंत वेगवेगळ्या व्हिडीओज् तयार करण्यात करण्यात आले होते. डिजीटल प्रचारामुळे मोदींच्या प्रचाराची ताकद वाढली. मोदींनी तंत्रज्ञानाचा वापर निवडणुकसाठी केल्यामुळे तंत्रकुशल प्रशासक अशी मोदींची प्रतिमा तयार झाली. मोदींबद्दल टीव्हीवर जाहिराती दाखवल्या होत्या. त्यामध्ये युपीए-२ सरकारविरोधात असलेल्या लोकांमधल्या रागाला देखील खतपाणी घातलं गेलं होतं. यात केवळ मोदीच बदल घडवून आणू शकतात. [11] (डॉ. शैलेंद्र देवळाणकर, नरेंद्र मोदींचे परराष्ट्र धोरण, सकाळ इयर बुक - २०१५, सकाळ पब्लिकेशन्स, पान १९९)

नरेंद्र मोदीजी यांनी सत्तासुत्रे हाती घेतल्यानंतर भारताच्या शेजारील राष्ट्रांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित करण्यासाठी पाऊले उचलली. त्यांनी शपथविधी सोहळ्यासाठी सार्क देशांच्या प्रमुखांना निमंत्रित केले. शेजारील राष्ट्रांशी देशांशी भारताचे संबंध अधिक घनिष्ठ होण्यासाठी सत्तेवर आल्यानंतर १६ महिन्यांच्या कालावधीत भूतान, नेपाळ, ऑस्ट्रेलिया, जपान ह्या देशांचे दौरे केले. त्यांचा भूतान व नेपाळ दौरा अनेक दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण ठरला. या दौऱ्यादरम्यांन महत्त्वाच्या जलविद्युत करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या जलविद्युत निर्मितीचा फायदा भविष्यात नेपाळ व भूतानबरोबरच भारतालाही होणार आहे. मागील काही वर्षांपासून भारताने नेपाळ व भूतान बाबत अलिप्तता बाळगली होती. तसेच नेपाळ या देशाला पंतप्रधानांनी, नरेंद्र मोदींनी भेट दिली. मागील १७ वर्षापासून भारताच्या एकाही पंतप्रधानांनी नेपाळला भेट दिली नव्हती. मोदींनी आपल्या भाषणातून नेपाळी नागरिकांची मने जिंकली. त्यामुळे भारत आणि नेपाळ यांच्यामध्ये मैत्रीचे एक नवे पर्व सुरु होण्यास मदत झाली आहे. [12] (डॉ. शैलेंद्र देवळाणकर, नरेंद्र मोदींचे परराष्ट्र धोरण, सकाळ इयर बुक - २०१५, सकाळ पब्लिकेशन्स, पान १९९)

१५ व १६ जून २०१४ या दोन दिवसीय दौऱ्यांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी भूतानला गेले. तेथे भारताने मदत केल्यामुळे मदतीतून बांधलेल्या भूतानच्या उच्च न्यायालयाच्या इमारतीचे उद्घाटन केले. ४ ऑगस्ट २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसीय नेपाळ दौऱ्यावर १९५० भारत नेपाळच्या मैत्री कराराचे फेरमूल्यांकन करण्यात आले.५६०० मेगावॅट क्षमतेच्या पंचेश्वर बहुद्देशीय प्रकल्पावर स्वाक्षरी करण्यात आली. जवळपास १७ वर्षानंतर भारतीय पंतप्रधान नेपाळ दौऱ्यावर गेले आणि फक्त दोन दिवसांसाठी हा दौरा होता. राजीव गांधी यांच्यानंतर २८ वर्षांनी ऑस्ट्रेलियाला भेट देणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान आहेत. नोव्हेंबर २०१४ मध्ये नरेंद्र मोदी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेले. जी-२० राष्ट्रगटाच्या बैठकीला उपस्थिती लावली. त्यांनी तेथे पाच महत्त्वपूर्ण करार केले.

३० ऑगस्ट ते ३ सप्टेंबर या कालावधीत पाच दिवसांच्या जपान दौऱ्यावर अनेक महत्त्वाचे करार केले. अशा प्रकारे सत्ता सुत्रे हाती घेतल्यानंतर नरेंद्र मोदीजींनी भारताचे परराष्ट्रीय धोरणात सुधारणा करण्यास सुरुवात केली. त्यादृष्टीने शेजारील राष्ट्रांशी सार्क मधील राष्ट्रांशी काही करार केले. प्रचार माध्यमांमुळे जनतेला सर्व कळत होते.

निवडणूकीत नरेंद्र मोदींच्या विरोधात उभे राहिलेले राहूल गांधी यांच्या मुलाखतीत त्यांनी वारंवार महिला सबलीकरण, माहितीचा अधिकार, व्यवस्था परिवर्तन हे मुद्दे मांडले. प्रश्न कोणताही विचारला तरी ते याबद्दलच बोलायचे २००२ च्या गुजरात दंगलीबद्दलच्या थेट प्रश्नांना उत्तर देताना ते माहितीचा अधिकार, महिला सबलीकरण आणि लोकशाहीवर बोलू लागले. या मुलाखतीवरुन राहूल गांधीमध्ये स्पष्टपणा प्रगल्भपणा, ठामपणा दिसून आला नाही. [13] (राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन – पान १९८)

मे महिन्यात निवडणुका पार पाडल्या तेव्हा मोदींच्या फेसबुक पेजवर १५ लाख फॉलोअर्स होते. नरेंद्र मोदींचा सोशल मीडियावरचा प्रचार फेसबुकवरुनच चालायचा. [14] (राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन – पान २०)

अनेकांनी स्वत:ची ‘मोदी फेसबुक’ पेजेस तयार केली. उदा. विकास पांडे या कार्यकर्त्याने ‘आय सपोर्ट मोदी’ नावाचं तर दुसऱ्या एकाने ‘नमो फॉर पीएम’ असं पेज तयार केलं. ही सगळी पेजेस अंतिमत: मोदींच्या सोशल मिडिया यंत्रणेचा भाग बनली. [15] (राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन – पान २०९)

ह्या निवडणूकीत ट्विटरवरही मोदींचे समर्थक वाढलेले दिसून आले. निवडणूक संपल्या तेव्हा मोदींच्या फॉलोअर्सची संख्या ४२ लाख ७० हजार एवढी होती. ट्विटर इंडियाच्या म्हणण्यानुसार दहापैकी पाच टॉप इलेक्शन ट्विटस् मोदींच्या अकाऊंटवरुन पाठवले गेले होते. यात मोदींची आपल्या आईबरोबरची सेल्फी आणि विजयानंतरचे ट्विटही होते. याउलट राहूल गांधी हा युवा नेता तरुणांशी संवाद साधण्यासाठी जगातल्या या दोन लोकप्रिय सोशल मिडिया साईटवर नव्हता. तसेच ते ट्विटरवरदेखील नव्हते.

सोशल मीडियामुळे राजकारणी आणि मतदारांमधलं अंतर मोडून पडलं होतं. मतदान केल्यानंतर मोदींची सेल्फी हे याचं दुसरं उदाहरण ‘सेल्फी काढणारा पंतप्रधानपदाचा उमेदवार – तंत्रज्ञानाला आपलंस करणाऱ्या नेत्याचं यापेक्षा चांगलं प्रतीक ते कोणतं!’[16] (राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन – पान २१०)

इतर राजकारणी इंटरनेटकडे बघायलाही तयार नव्हते तेव्हा २००२ साली मोदींनी आपली वेबसाईट सुरु केली. नरेंद्र मोदींनी २०१४ ची निवडणूक जिंकण्यासाठी डिजीटल टेक्नॉलॉजीचा उपयोग केला. मोदींच्या प्रचारात स्वयंसेवक व्हायचे असेल तर त्याने ७८ २००७ ८२०० हा नंबर फिरवायचा आणि आपला मतदार ओळखपत्र क्रमांक ह्यावर पंच करायचा. सप्टेंबर २०१३ मध्ये भाजपचे पंतप्रधान उमेदवार म्हणून मोदींचं नाव जाहीर झाल्यावर ‘नमो व्हॉलेंटिअर प्रोग्रॅम’ सुरु करण्यात आला. मोदींची समर्थक असलेली उजव्या विचाराची ‘नीती सेंट्रल डॉट कॉम’ ह्या नावाची वेबसाईटही होती. [17] (राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन – पान २१८)

नरेंद्र मोदींना मीडियात मिळालेल्या अतिरेकी कव्हरेजमुळे त्यांच्या मतांमध्ये वाढ झाली. तसेच मोदींच्या जवळजवळ प्रत्येक सभेचं किंवा कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण करण्यात आलं. एका चॅनेलने एखाद्या गोष्टीचं प्रसारण केलं की इतर त्याचं अनुकरण करतात. मोदींच्या सभांमध्ये प्रेक्षकांना रस होता. प्रत्येक माध्यम मोदींनी व्यापलेलं होतं. त्याचाच परिणाम म्हणून अधिकाधिक प्रसिद्धी मिळत होती. मिडियानेसुद्धा काही प्रमाणात मोदी लाट निर्माण केली. [18] (राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन – पान २१९)

२०१४ विधानसभा निवडणुकीत भाजपला सत्ता मिळाली कॉंग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, मनसे इत्यादी पक्ष असताना देखील. २०१४ विधानसभा निवडणूकीपूर्वी, १६ व्या लोकसभेची निवडणूक झाली. त्यामध्ये भाजपला सत्ता प्राप्त झाली. त्यावेळी केंद्रात म्हणजेच दिल्लीत रामदेव बाबांचे काळ्या पैशाविरोधातील भ्रष्टाचाराचे आंदोलन तसेच स्वातंत्र्यसैनिक जेष्ठ अण्णा हजारे यांचे जनलोकपालबाबत पर्यायाने भ्रष्टाचाराबाबत आंदोलने चालू होती. जनलोकपाल विधेयकाला सर्व देशातून प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला. अण्णा हजारे यांचे हे विधेयक सरकारकडून अखेर मान्य करण्यात आले. तसेच स्वीस बँकेत असलेला भारतीयांचा काळा पैसा परत आणावा ह्या मागणीसाठी योगगुरु रामदेवबाबांनी जे आंदोलन केले त्याला ही जनतेकडून प्रचंड प्रमाणात पाठिंबा मिळाला. परंतु रामदेवबाबांनी उपोषण सोडले अशी खोटी माहिती कॉंग्रेस नेते कपिल सिब्बल यांनी जनतेला दिली. यावर रामदेवबाबांनी आणखी तीव्रपणे आंदोलन उभारले. परंतु सरकारने निर्दयपणे रामदेवबाबांचे आंदोलन मोडीत काढले. पोलिसांनी लाठीमार, अश्रूधूरांचा वापर करून हे आंदोलन, खूप निर्दयपणाने मोडीत काढले.

या सगळ्या गोष्टींचा परिणाम २०१४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झाला काय हा संशोधनासाठी महत्त्वाचा मुद्दा म्हणून समोर आला. या शोधप्रबंधातून सन २०१४ पुणे शहर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीचा आढावा घेतला आहे. तसेच राजकीय सत्तांतराची कारणे देखील अभ्यासली आहेत. पुणे विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकांचा आढावा घेत असताना पुणे शहराची ओळख, विधानसभा मतदारसंघांची ओळख, हद्दीचा परिसर, विधानसभांच्या पुणे शहरातील मतदारसंघाच्या मागील वर्षीच्या निवडणुकांचा तसेच निवडून आलेले उमेदवार, निवडणूक यंत्रणा, प्रचारसभा इत्यादींचा आढावा घेतला आहे. मतदारांकडूनसत्ताबदलाची कारणे शोधली आहेत.

**संदर्भ :**


संदर्भ क्र. १ – शिदोरी, महाराष्ट्र शासनाचे मासिक, नोव्हेंबर २०१४ चा अंक

संदर्भ क्र. २ – शेतकरी जात्यात, लेखिका– सुलभा ब्रह्मे, धनंजयराव गाडगीळ जन्मशताब्दी प्रबोधनमाला

संदर्भ क्र. ३ – अभय टिळक, इयर बुक २०१५, पान नं. २२५

संदर्भ क्र. ४ – अभय टिळक – इयर बुक – २०१५, पान नं. २२६

संदर्भ क्र. ५ – अभय टिळक – काळा पैसा – इयर बुक – २०१५, पान नं. २२७

संदर्भ क्र. ६ – लढा लोकपालचा – उद्रेक आम आदमीचा – धनंजय बिजले, मेहता पब्लिशिंग हाऊस, पान नं. ११०,१११

संदर्भ क्र. ७ – लढा लोकपालचा – उद्रेक आम आदमीचा – धनंजय बिजले, मेहता पब्लिशिंग हाऊस, पान नं. ११०,१११

संदर्भ क्र. ८ – सकाळ इयर बुक – २०१५, पान नं. १४

संदर्भ क्र. ९ – सकाळ इयर बुक २०१५, पान नं. १६

संदर्भ क्र. १० – राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर पब्लिकेशन्स पान. १९६

संदर्भ क्र. ११ – डॉ. शैलेंद्र देवळाणकर, नरेंद्र मोदींचे परराष्ट्र धोरण, सकाळ इयर बुक – २०१५, सकाळ पब्लिकेशन्स, पान १९९

संदर्भ क्र. १२ – डॉ. शैलेंद्र देवळाणकर, नरेंद्र मोदींचे परराष्ट्र धोरण, सकाळ इयर बुक – २०१५, सकाळ पब्लिकेशन्स, पान १९९

संदर्भ क्र. १३ – राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन – पान १९८

संदर्भ क्र. १४ – राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन – पान २०

संदर्भ क्र. १५ – राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन – पान २०९

संदर्भ क्र. १६ – राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन – पान २१०

संदर्भ क्र. १७ – राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन – पान २१८

संदर्भ क्र. १८ – राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन – पान २१९

# प्रकरण ४ थे

# पुणे शहर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीचा आढावा

## प्रकरण ४ थे

# पुणे शहर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीचाआढावा

**प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रकरणात पुणे शहर व आसपासचा परिसर यांची थोडक्यात ओळख करून देण्यात आली आहे. पुणे शहरात विधानसभेचे आठ मतदारसंघ येतात. कसबा पेठ, पर्वती, शिवाजीनगर, कन्टोन्मेंट, हडपसर, कोथरुड, पर्वती, खडकवासला, या मतदारसंघात येणारे विविध विभाग, तसेच हद्द यांची ओळख करून देण्यात आली आहे. तसेच २०१४ विधानसभेच्या निवडणुकीवरील निवडणुकीस उभे राहिलेले उमेदवार विविध पक्षांचे उमेदवार यांची ओळख करून देण्यात आलेली आहे. तसेच निवडणुकीवरील जातीचा प्रभाव, तसेच निवडणूक यंत्रणेने राबविलेल्या विविध योजना पुण्यातील प्रचारसभा तसेच २०१४ विधानसभा निवडणुकीचा निकाल याबाबत विवेचन करण्यात आले आहे.

## ४. १ पुणे शहर व परिसराची ओळख :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये पुणे जिल्ह्याची ओळख करून देण्यात आली आहे. पुणे शहराची ओळख करून देताना पुण्याचे क्षेत्रफळ, लोकसंख्या, पुण्यातील तालुके, सीमा, पुणे जिल्हा विशेष, आजूबाजूचा परिसर, पिंपरी चिंचवड, जुन्नर, आळंदी, देहू, चाकण, लोणावळा, आर्वी, उरूळीकांचन इ.. तेथील प्रेक्षणीय स्थळे, विविध उद्योगधंदे, खनिजे, धरणे व नद्या संदर्भाने भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक, परिस्थितीचा या प्रकरणातून परिचय करून देण्यात आलेला आहे.

शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्रातील प्रमुख शहर अर्थात पुणे हा जिल्हा हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून ओळखले जाणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म जिल्हा म्हणून साक्ष देतो. याशिवाय संत ज्ञानेश्वर माऊलींची संजीवन समाधी याच जिल्ह्यात आहे. दरवर्षी आषाढी एकादशीला पंढरीच्या विठोबाचे दर्शन घेण्यासाठी याच जिल्ह्यातून अर्थात देहू आळंदीतून प्रस्थान करतात. इतिहासामध्ये हा जिल्हा एक इतिहासप्रसिद्ध जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यामध्ये सांस्कृतिक वारसासोबत औद्योगिक विकास देखील तेवढ्याच ताकदीने रुजलेला आहे. लष्करीदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र म्हणून या शहराला ओळखले जाते. पेशवेकालीन इतिहास सांगणारा शनिवारवाडा या जिल्ह्यामध्येच आहे. एवढेच नव्हे तर 'सत्यमेव जयते' हा मोलाचा संदेश देणारे स्त्री शिक्षणाचे अग्रदूत म्हणून ओळखले जाणारे महात्मा ज्योतिबा फुले यांची कर्मभूमी हाच जिल्हा होय. 'सिंहासारखी गर्जना' करणारे लोकमान्य टिळक, आधुनिक विचाराचे समाजसुधारक गो. ग. आगरकर यांचीदेखील कर्मभूमी म्हणून याच जिल्ह्याला ओळखले जाते. पुणे तेथे कशाची उणे हे गंमतीने का होईना म्हटले जाते. याचा सारासार या जिल्ह्याच्या परिचयामध्ये दिसून येतो अशा जिल्ह्याचा परिचय पुढीलप्रमाणे -

- जिल्ह्याचे मुख्य ठिकाण : पुणे
- क्षेत्रफळ : १५,६३७ चौ. कि. मी.

- लोकसंख्या : ९४,२६,९५९ (सन २०११ च्या जनगणनेनुसार)

- तालुके : १४ जुन्नर, आंबेगाव, खेड (राजगुरुनगर), इंदापूर, शिरुर, मावळ (वडगाव), वेल्हे, पुणे शहर, दौंड, भोर, हवेली (पुणे), मुळशी (पौड), पुरंदर (सासवड), बारामती

- सिमा : उत्तरेस व पूर्वेस अहमदनगर जिल्हा, पश्चिमेस रायगड जिल्हा, दक्षिणेस सातारा जिल्हा आहे. आग्नेयेस सोलापूर तर वायव्येस ठाणे जिल्हा आहे.

- जिल्हा विशेष : 'विद्येचे माहेरघर' असे पुणे शहरास म्हणतात. याच ठिकाणी महात्मा ज्योतीबा फुल्यांच्या समाज-परिवर्तनाच्या कार्यास सुरुवात झाली. आगरकर, गोपाळ कृष्ण गोखले, महर्षी धोंडो केशव कर्वे यांसारख्या नररत्नाचे कर्तृत्व याच पुण्याने फुलविले. लोकमान्य टिळकांची ही कर्मभूमी होय. राष्ट्रकूट राजवटीत या गावाचा पुनवडी या नावाने उल्लेख केला जाई. पुण्य या शब्दावरुन पुणे हे नाव पडले असावे अशी एक उपपत्ती मांडली जाते. पुणे जिल्ह्यात देशातील सर्वात पहिले उपग्रह दळणवळण केंद्र जुन्नर तालुक्यात आर्वी येथे १९७१ पासून कार्यरत. अष्टविनायकापैकी (१) श्री विघ्नेश्वर ओझर, (२) श्रीगणपती, रांजणगाव (३) गिरजात्मक लेण्याद्री, (४) चिंतामणी थेऊर, (५) मोरेश्वर, मोरगाव या पाच अष्टविनायकाचे स्थान या जिल्ह्यामध्ये आहे.

- पुणे शहर : मुळा-मुठा नद्यांच्या संगमावर पुणे शहर आहे. शिवाजी महाराजांचे बालपण, पेशव्यांची राजधानी, शनिवारवाडा यामुळे पुण्यास ऐतिहासिक महत्त्व आहे. पुण्यात शिक्षण विभागाचे संचालनालय, महाराष्ट्र राज्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तकनिर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुण्याजवळच्या भोसरी येथे राष्ट्रीय एड्स अनुसंधान संस्था तसेच निगडी येथे अप्पूघर हे करमणुकीचे केंद्र आहे.

- पिंपरी-चिंचवड : या ठिकाणी पिंपरी-चिंचवड परिसरात अनेक उद्योगधंदे आहेत. चिंचवड येथे श्री मोरया गोसावी या सत्पुरुषांची समाधी आहे. स्कूटर, रिक्षा, मोटार, कृत्रिम धागा, पेनिसिलीन, रसायने इत्यादीचे कारखाने येथे आहेत.

- जुन्नर : हे ठिकाण जुन्नर जवळच सातवाहन काळातील शिवनेरी हा किल्ला आहे. येथेच शिवाजी महाराजांचा जन्म झाला. किल्ल्यावर शिवाईदेवीचे मंदिर आहे. जुन्नर गावात दादोजी कोंडदेवांचा वाडा होता.

- आळंदी : हे ठिकाण इंद्रायणीकाठी असून येथे श्री. ज्ञानेश्वर महाराजांची समाधी आहे.

- देहू : हे गाव इंद्रायणी नदीच्या काठावर असून संत तुकाराम महाराजांचे जन्मस्थान म्हणून ओळखले जाते.

- चाकण : या ठिकाणी भुईकोट किल्ला प्रसिद्ध आहे. कांद्याची बाजारपेठ म्हणूनही चाकण प्रसिद्ध आहे.

- लोणावळा : हे थंड हवेचे ठिकाण आहे. येथून जवळच वळवण धरण, कार्ले-भाजे येथील कोरीव लेणी प्रेक्षणीय आहे. नाविक प्रशिक्षण केंद्र व अनेक कारखाने येथे आहे.

- जेजूरी : हे धार्मिक ठिकाण महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबाचे देवस्थान आहे.
- आर्वी : हे गाव जुन्नर तालुक्यात असून येथे विक्रम हे उपग्रह दळणवळण केंद्र आहे.
- राजगुरुनगर : हे गाव हुतात्मा राजगुरुंचे आहे.
- भीमाशंकर : या ठिकाणी शंकराचे मंदिर प्रसिद्ध आहे. येथे अभयारण्य सुद्धा आहे.
- उरुळी कांचन : या ठिकाणी निसर्गोपचार केंद्र आहे. येथून जवळच भुलेश्वर हे यात्रेचे ठिकाण आहे.
- दौंड : हे गाव तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. येथे रेल्वे जंक्शन असल्यामुळे येथून लोहमार्गाने वेगवेगळ्या ठिकाणी जाता येते.
- पौड : हे गाव मुळशी तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे येथून जवळच मुळशी धरण आहे.
- सासवड : हे गाव पुरंदर तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. येथे संत सोपानदेवाची समाधी आहे. जवळच पुरंदर किल्ला आहे. सासवडचा परिसर अंजीर, सीताफळ, डाळींब, पेरू इत्यादीच्या बागासाठी प्रसिद्ध आहे.
- वेल्हे : या ठिकाणी जवळच राजगड व तोरणा हे किल्ले आहेत.
- वालचंदनगर : या ठिकाणी साखर कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री तयार केली जाते. तसेच प्लॅस्टिकचा व वनस्पती तुपाचा कारखानाही येथे आहे.
- वढू : या गावी संभाजी महाराजांची समाधी आहे.
- भोर : हे तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. येथे रंग, मेणकापड इत्यादीचे कारखाने आहेत. येथून जवळच भाटघर धरण व बनेश्वर ही सहलीची ठिकाणे आहेत.
- प्राकृतिक रचना : पश्चिमेकडील सीमेवर सह्याद्रीची मुख्य रांग. या रांगेतून निघालेले अनेक डोंगरफाटे जिल्ह्याच्या पूर्वेपर्यंत जातात. सह्याद्रीच्या पूर्व उताराच्या डोंगराळ भागास ‘मावळ’ असे म्हणतात.
- प्रमुख नद्या : बहुतेक नद्या सह्याद्रीत उगम पावून पूर्वेकडे या आग्नेयेकडे वाहत जातात. प्रमुख नद्या (उत्तरेकडे दक्षिणेकडे) मांडवी, कुकडी, मीना, घोडे, भीमा (जिल्ह्यातील सर्वात मोठी व प्रमुख नदी. उगम भीमाशंकर येथे) भामा, इंद्रायणी, पवना, मुळा, मुठा, कऱ्हा, नीरा.
- खनिजे : बांधकामाचा दगड सोडल्यास फारशी महत्वाची खनिजे नाहीत
- शेती : शेती हा प्रमुख व्यवसाय. पश्चिमेकडे मावळ भागात भात पिकवला जातो. पूर्वेकडील कमी पावसाच्या भागात ज्वारीचे पीक घेतले जाते. बारामती-इंदापूर भागात कालव्याच्या पाण्यावर उसाचे उत्पादन. पुण्याच्या आसपास भाजीपाला मोठ्या प्रमाणावर पिकतो.
- धरणे : खडकवासला, पानशेत, वरसगाव, भाटघर, डिंभे व चासकमान.

● कारखानदारी : मुंबई–ठाणेपाठोपाठ राज्यातील महत्त्वाचा औद्योगिक जिल्हा. भोसरी, पिंपरी–चिंचवड ही प्रमुख औद्योगिक केंद्रे. याशिवाय खडकी, हडपसर, पर्वती, गुलटेकडी, नगररस्ता, पिरंगुट, जेजुरी, कुरकुंभ इत्यादी अन्य औद्योगिक क्षेत्रे, मोटारी, स्कूटर्स, विविध यंत्रे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, दारुगोळा, काचसामान, रंग, कापड, कागद, साखर, खाद्यतेल, अन्नप्रक्रिया, नायलॉन, पेनिसिलीन इत्यादी प्रमुख उद्योग येथे आहेत.

● प्रमुख स्थळे : पुणे (महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी, ऐतिहासिक–शैक्षणिक–औद्योगिक–व्यापारी पेठ); लोणावळा–खंडाळा (थंड हवेची ठिकाणे); कार्ले–भाजे (प्राचीन लेणी); भीमाशंकर (ज्योतिर्लिंग), लेण्याद्री, थेऊर, रांजणगाव, मोरगाव, ओझर (अष्टविनायकाची स्थाने) ; आळंदी, चिंचवड, देहू (धार्मिक स्थळे); शिवनेरी (शिवरायांचे जन्मस्थान); सिंहगड, रायगड, तोरणा, पुरंदर इत्यादी किल्ले.

● अदिम जाती–जमाती : जिल्ह्याच्या पश्चिम–वायव्य डोंगराळ भागात महादेव कोळी, ठाकर व अल्प प्रमाणात कातकरी या आदिवासी जमाती आढळतात. कोळी व ठाकरांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. शेतीबरोबरच हे लोक शिकार करून व वनोत्पादने गोळा करून उपजीविका करतात. कातकरी लोक भटके जीवन जगतात. शिकार करणे व वनोत्पादने गोळा करणे हा यांचा प्रमुख उद्योग होय.

● वाहतूकव्यवस्था : मुंबई–पुणे–बंगलोर (राष्ट्रीय महामार्ग क्र. ४), पुणे–नाशिक (राष्ट्रीय महामार्ग क्र. ५०), पुणे–सोलापूर–हैद्राबाद (राष्ट्रीय महामार्ग क्र. ९) हे राष्ट्रीय महामार्ग. मुंबई–पुणे–सोलापूर (ब्रॉड गेज); पुणे–मिरज–कोल्हापूर (ब्रॉड गेज), दौंड–बारामती (ब्रॉड गेज) हे लोहमार्ग. दौंडवरुन मनमाडकडे फाटा. पुणे (लोहगाव) येथे विमानतळ.

● हवामान : उष्ण व कोरडे. आल्हाददायक. पावसाचे प्रमाण सह्याद्रीकडून पूर्वेला कमी होत जाते.

## ४.२ राजकीय पक्ष व राजकीय पक्षांची सद्यस्थितीतील परिस्थिती

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात पाच राष्ट्रीय राजकीय पक्ष आणि चार प्रादेशिक राजकीय पक्ष कार्यरत आहेत. त्यांचे राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्ष असे दोन प्रकार कल्पून अध्ययन करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भारतीय जनता पार्टी, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) व भारतीय कम्युनिस्ट पक्ष असे पाच राष्ट्रीय राजकीय पक्ष असून, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया, भारिप बहुजन महासंघ असे चार प्रादेशिक राजकीय पक्ष आहेत याचा अर्थ महाराष्ट्रात बहुपक्ष पद्धती अस्तित्वात आहे.

राष्ट्रीय पक्ष – महाराष्ट्रात राष्ट्रीय राजकीय पक्ष म्हणून मान्यता असणारे एकूण पाच राजकीय पक्ष आहेत. त्यापैकी आपण येथे फक्त भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि भारतीय जनता पार्टी यांची थोडक्यात ओळख करून दिली आहे.

१)	भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) :-

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आय हा भारतातील सर्वात जुना राजकीय पक्ष आहे. या पक्षाची स्थापना २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबई येथे ए.ओ.ह्यूम या ब्रिटीश सनदी अधिकाऱ्याच्या पुढाकाराने झाली होती. भारतीय जनतेची गाऱ्हाणी सनदशीर मार्गाने ब्रिटीश शासनासमोर मांडणे हे या पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट्य होते. कालांतराने काँग्रेसने भारतीय स्वातंत्र्य आंदोलन तीव्र करून भारतातील ब्रिटीश राजवटीचा प्रखर विरोध केला. परिणामी काँग्रेसमध्ये श्रीमंत, गरीब, कामगार, उद्योगपती, बुद्धीवंत, अल्पसंख्य समाज एकत्र आले. त्यामुळे काँग्रेस हा एक सर्वसमावेशक विचारप्रवाह बनला व भारताचे स्वातंत्र्य हे त्याचे ध्येय बनले होते. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष अशा चार पक्षांचे मिळून चौकोनी किंवा दोन आघाड्यांचे राजकारण १९९९ पासून महाराष्ट्रात सुरू झाले. २००९ पासून च्या निवडणूकीत 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना' मैदानात उतरल्यामुळे चौकोनी राजकारण पंचकोनी बनले. काँग्रेस पक्षाकडे महाराष्ट्रात सक्षम नेतृत्त्व नाही. विलासराव देशमुख यांच्या निधनामुळे संपूर्ण राज्यभर प्रभाव असलेला नेता काँग्रेसने गमावला आहे. आदर्श गृहनिर्माण सोसायटी प्रकरणात अशोक चव्हाण अडचणीत आल्यामुळे नजीकच्या काळात त्यांचे पुनर्वसन होण्याची शक्यता नाही आणि ते आले तरी त्यांच्याकडे नेतृत्व येण्याची शक्यता कमी आहे. पृथ्वीराज चव्हाण यांनी सरकारला नेतृत्व दिले असले तरी ते मास लिडर नाहीत त्यामुळे त्यांच्या मर्यादा स्पष्ट आहेत. नारायण राणे हे तुलनेने अधिक प्रभावी नेतृत्व आहे. परंतु राणे यांची जी बलस्थाने आहेत, त्याच त्यांच्या मर्यादा बनून अधिक ठळकपणे पुढे येतात. राणे यांचे नेतृत्व शिवसेनेसाठी अधिक नुकसानकारक ठरू शकते. काँग्रेस अंतर्गतही अनेकांचा त्यांना विरोध आहे. त्यामुळे राणे नेतृत्वाच्या जवळपास आले असताना त्यांचे विरोधक त्यांच्यासाठी सापळा लावतात आणि राणे त्यात अलगद सापडून मागे फेकले जातात. नव्या पिढीतही तालुक्याबाहेर प्रभाव असलेले नेतृत्व काँग्रेसकडे नाही. असे असले तरी काँग्रेसपक्ष कधीही नेतृत्वावर अवलंबून नसतो. तळागाळातले कार्यकर्ते हीच काँग्रेसची ताकद आहे आणि याच ताकदीने विविध परिस्थितीतही तो तग धरुन उभा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर सगळे महत्त्वाचे नेते पक्ष सोडून गेले असतानाही काँग्रेस पक्ष हा सर्वाधीक जागा मिळविणारा पक्ष होता.

२)	राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष:

पूर्वाश्रमीच्या (एस) चा आधुनिक अवतार म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी होय. शरद पवार हे या दोन्ही पक्षाचे संस्थापक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना १० जून १९९९ रोजी झाली. काँग्रेस अंतर्गत चालू असणाऱ्या कुरबुरी, पक्षश्रेष्ठींकडून वेळोवेळी पक्षांतर्गत विरोधकांना दिले जाणारे राजकीय बळ यामुळे शरद पवार काँग्रेसच्या कार्यपध्दतीवर नाराज होते. त्यातच १९९९ मध्ये काँग्रेस नेतृत्वाचा वाद उफाळून आला. शरद पवार, तारिक अन्वर आणि पी.ए. संगमा या काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यांनी भारताचे पंतप्रधान, राष्ट्रपती व उपराष्ट्रपती ही सर्वोच्च पदे फक्त जन्माने भारतीय असणाऱ्या नागरिकांनाच मिळाली पाहिजेत अशी जाहीर भूमिका घेऊन एक प्रकारे सोनिया गांधीच्या नेतृत्त्वाला विरोध केला. दरम्यान सोनिया गांधींनी काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिला तर काँग्रेस कार्यकारिणीने या तिघांना (संगमा, तारिक अन्वर, पवार) पक्षांतून काढून टाकले. त्यामुळे शरद पवार यांनी आपल्या सहकाऱ्यांना

बरोबर घेऊन १० जून १९९९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या नावाचा नवा पक्ष स्थापन केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्व शरद पवार यांच्याकडे निर्विवादपणे असले तरीही अजित पवार हे पक्षाचे भविष्यातील नेते आहेत. अजित पवार की सुप्रिया सुळे असा वाद प्रसारमाध्यमे रंगवत असली तरीही सुप्रिया सुळे यांचे राजकारण वेगळ्या पठडीतले आहे आणि त्याची दिशाही स्पष्ट आहे. गेल्या काही वर्षात अजित पवार यांनी अनेक पातळ्यांवर स्वत:च्या क्षमता सिद्ध केल्या आहेत. ह्यावरुन त्यांच्या नेतृत्त्वाला आव्हान देण्याची क्षमता पक्षातील अन्य कोणत्याही नेत्याकडे नाही. अजित पवारांकडे राजकारणातल्या लोकांकडे दुर्मिळ असलेला स्पष्टवक्तेपणा हा गुण आहे. ती त्यांची ताकद आहे. परंतु काहीवेळा त्यामुळे त्यांना नुकसानही सोसावे लागते. सार्वजनिक ठिकाणी जे सभासंकेत आणि तारतम्य असावे लागते. त्याचा अभाव असल्यामुळे त्यांची कधीकधी पिछेहाट झालेली दिसते. असे असले तरीही पक्षनेतृत्त्वासाठी आवश्यक असलेले सगळे गुण अजित पवार यांच्याकडे आहेत. सर्व समाजघटकांकडे सोबत घेण्याबाबतचा व्यापक आवाका अद्याप त्यांनी दाखवलेला नाही. पक्षातील ज्येष्ठ समकालीन आणि नव्या अशा तिन्ही पातळीवरील नेत्यांना बरोबर घेतले तर पक्षाची वाढ आणि विकास होतो. त्याबाबतीतही आवश्यक ती समज अद्याप अजित पवार यांना दाखवलेली नाही. नेतृत्त्वासाठी लागणारे आवश्यक गुण त्यांनी आत्मसात केले तर ते चांगले नेतृत्व देवू शकतील. त्यांच्या नेतृत्वाच्या क्षमतेवरच राष्ट्रवादी काँग्रेसचे भविष्यातील राजकारण अवलंबून राहिल.

३) भारतीय जनता पक्ष :-

पूर्वाश्रमीच्या जनसंघाचा आधुनिक अवतार म्हणजे भारतीय जनता पक्ष होय. श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी २१ ऑक्टोबर १९५१ मध्ये 'जनसंघ' या हिंदुत्ववादी पक्षाची स्थापना केली. तत्पूर्वी म्हणजे १९२५ मध्ये डॉ. हेडगेवार यांनी 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या हिंदुत्ववादी संघटनेची स्थापना केली होती. संघाची राजकीय आघाडी म्हणून जनसंघ कार्यरत झाला. प्रारंभी हा पक्ष शहरी पांढरपेशा मध्यमवर्गियांचा पक्ष किंवा शेठजी भटजींचा पक्ष म्हणून ओळखला जात होता. त्यामुळे पक्षाला लोकसभा वा राज्य विधानसभेच्या कोणत्याही निवडणुकीत हाताच्या बोटावर मोजण्याइतपतही जागा मिळाल्या नाहीत. पक्षाची ही स्थिती साधारण १९७७ पर्यंत कायम होती.

१९७७ मध्ये पक्षाने कात टाकली. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी २६ जून १९७५ मध्ये देशात राष्ट्रीय आणीबाणी लागू केली. काँग्रेसविरोधी सर्व राजकीय पक्षांनी आणीबाणीला कडाडून विरोध केला म्हणून सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना तुरुंगात डांबले. जनसंघ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अनेक नेते व कार्यकर्त्यांचा त्यात समावेश होता. अशाप्रकारे देशातील काँग्रेस विरोधी अनेक राजकीय पक्षाचे पुढारी तुरुंगात टाकण्यात आले. तुरुंगात त्यांनी आपापसात विचार विनिमय करून काँग्रेसची सत्ता उलथून टाकण्यासाठी एकत्र येऊन निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला. शिवसेनेबरोबर युती करून भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्रात हातपाय पसरले. प्रमोद महाजन यांचे निर्विवाद वर्चस्व असल्याच्या काळात पक्षाची सुत्रे गोपीनाथ मुंडे यांच्याकडे होती. संपूर्ण देशभर भाजप राममंदिर आणि कमंडलूचे राजकारण करीत असताना महाराष्ट्रात भाजपने मात्र मंडल आयोगाच्या समर्थनाची भूमिका घेतली होती. उच्चजातींचा पक्ष म्हणून ओळख असलेल्या भाजपने त्यानंतरच इतर मागासवर्गीयांमधेही स्थान निर्माण केले. महाजन

यांच्या वरदहस्ताखाली मुंडे यांचे निर्विवाद नेतृत्व होते. तोपर्यंत महाराष्ट्रात भाजपची वाटचाल एकमार्गी सुरू होती. महाजन यांच्या मृत्यूनंतर चित्र बदलले. नितीन गडकरी यांनी पक्षावर कब्जा मिळविल्यामुळे मुंडेनाही छोट्या छोट्या गोष्टींसाठी पक्षात संघर्ष करावा लागला. गोपीनाथ मुंडे-गडकरी यांच्यानंतर देवेंद्र फडणवीस, विनोद तावडे, पंकजा पालवे मुंडे या नव्या पिढीकडे पक्षाची सूत्रे विधानसभेच्या निवडणूकीत विजय मिळविल्यामुळे आहेत. केंद्रातील वर्चस्वाच्या आधारे शिवसेनेशी असलेली युती तोडून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेशी युती होणार की महायुतीत मनसे सहभागी होणार अशा अनेक शक्यता निर्माण झाल्या.

## ४) शिवसेना

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. मराठी भाषिकांची फार दिवसांची मनोकामना पूर्ण झाली. मात्र या नव्या राज्यात विशेषत: मुंबई शहरात मराठी माणसांची परवड काही थांबली नाही. मुंबईतील उद्योग, व्यवसाय, व्यापार आणि नोकऱ्यात परप्रांतीयांचे प्राबल्य वाढतच होते, तर मराठी युवकांना जाणीवपूर्वक डावलले जात होते. मराठी भाषिकांचे हितरक्षण करण्यासाठी श्री. बाळ ठाकरे पुढे सरसावले. त्यांनी १९ जून १९६६ रोजी मुंबई येथे शिवसेनेची स्थापना केली. मराठी अस्मिता, मराठी माणसांचे हितरक्षण, मुंबईत येणाऱ्या परप्रांतियांना विरोध आणि ८०% समाजकारण व २०% राजकारण असे शिवसेनेच्या राजकारणांचे प्रारंभीचे विचारसूत्र होते. म्हणून मुंबईतील मराठी माणूस शिवसेनेकडे आकर्षित झाला होता.

बाळ ठाकरे हे शिवसेनेचे सरसेनापती. पक्षसंघटनेत त्यांचा आदेश व शब्द अखेरचा मानला जातो. त्यांच्या नावामागे 'हिंदुहृदयसम्राट' असे बिरुद लावून त्यांचा गौरव केला जातो. शिवसेना महिला आघाडी, भारतीय विद्यार्थी सेना, भारतीय कामगारसेना, भारतीय किसान सेना, लोकाधिकार समिती, शिवउद्योग ट्रस्ट अशा वेगळवेगळ्या संघटनांच्या माध्यमातून लोकसंघटन वाढवित आहे.

शिवसेना ही फक्त मुंबई-ठाणे-औरंगाबाद शहरांपुरती मर्यादित होती. परंतु आता सर्व महाराष्ट्रभर ती विस्तारलेली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील विरोधी पक्षाची जागा शिवसेनेने घेतली. शिवसेना म्हणजे बाळासाहेब ठाकरे असे समीकरण होते. परंतु आताची शिवसेना बाळासाहेब ठाकरे यांच्याशिवायची आहे. तिच्यावर पूर्णपणे उद्धव ठाकरे यांचे नियंत्रण आहे. गेली १० वर्षे सगळी सुत्रे उद्धव ठाकरे यांच्याकडे आहेत. ही वस्तुस्थिती असली तरी त्यामागे बाळासाहेब ठाकरे यांचा आधार होता. शिवसेनेच्या तळागाळातील कार्यकर्त्यांना बांधून ठेवणारा शिवसेनाप्रमुखांचा भावनिक धागा होता. काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्रपणे लढू शकतात तशी स्थिती शिवसेनेची नाही. शिवसेनेसाठी युतीचा आधार आवश्यक आहे. उद्धव ठाकरे यांच्याकडे नेतृत्वगुण आहेत. परंतु प्रत्यक्ष रणमैदानात त्यांच्या मर्यादा वारंवार उठून दिसतात. आदित्य ठाकरे यांच्यातील नेतृत्त्वगुण अजुनही दिसून आलेले नाहीत. मराठीचा मुद्दा आक्रमकपणे मांडायचा की हिंदुत्वाचा याबद्दल संभ्रमही शिवसेनेच्या नेतृत्त्वामध्ये जाणवतो. तळागाळात गावपातळीपर्यंत काम करणारे कार्यकर्त्यांचे जाळे आहे. परंतु त्यांना ठोस कार्यक्रम देणारे प्रभावी नेतृत्व नाही. शब्दांच्या आधारे संमोहित करण्याची कलाही शिवसेनेच्या विद्यमान नेतृत्त्वाकडे नाही. भाजपा युतीला रिपब्लिकन पक्षाचा रामदास आठवले गट आणि स्वाभिमानी शेतकरी

संघटना असे दोन नवे साथीदार मिळाले होते. शिवसेना-भाजपा युती तुटल्यामुळे हे दोन पक्ष भाजपबरोबर गेले.

### ५) शेतकरी कामगार पक्ष:

स्थापना एप्रिल १९४८ साली ब्राह्मणेत्तर चळवळीतील कार्यकर्ते केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, काकासाहेब वाघ, नाना पाटील या नेत्यांनी केली. हे नेते प्रारंभी काँग्रेस मध्ये कार्यरत होते. मात्र ते काँग्रेसच्या कार्यक्रम व ध्येयधोरणाबाबत नाराज होते. काँग्रेसने शेतकरी, कष्टकरी कामगारांचे हित जोपासण्यासाठी अधिक क्रांतिकारक पाऊले उचलावीत अशी त्यांची अपेक्षा होती. त्यासाठी या नेत्यांनी १९४७ साली काँग्रेस अंतर्गत ''शेतकरी कामगार संघाची'' स्थापना केली होती.

शेतकरी कामगार पक्ष डाव्या विचारसणीचा मार्क्स आणि लेनिनच्या 'साम्यवादी' तत्त्वज्ञानावर श्रद्धा ठेवणारा पक्ष आहे. तो समाजातील 'नाहिरे' वर्गाचे प्रतिनिधित्व करतो पक्षाची विचारप्रणाली विषद करणारा दाभाडी प्रबंध पक्षाच्या दुसऱ्या अधिवेशनात (१९५०) स्वीकारण्यात आला होता. त्यामध्ये सत्तेच्या केंद्रीकरणाला विरोध, शहरी मालमत्तेला कमाल मर्यादा घालणे, नुकसान भरपाई न देता जमीनदारीचे उच्चाटन करणे, शेतीमालाला रास्त भाव, शेत जमिनीचे फेरवाटप, प्रमुख उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, रोजगाराची हमी, जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाला विरोध, सेझ प्रकल्पाला विरोध इ. मुद्यांचा समावेश आहे.

### **६) रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया**

हा महाराष्ट्रातील 'दलितांचा राजकीय पक्ष' आहे. या पक्षाचा विचार समजून घेण्यासाठी इतिहासात डोकावणे आवश्यक आहे.

### ७) स्वतंत्र मजूर पक्ष

भारतात १९३५ च्या कायद्याने प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुका घेण्याचा मार्ग खुला झाला होता. या निवडणुकीत अस्पृश्य समाजाला सहभागी होता यावे म्हणून डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी १९३६ साली 'स्वतंत्र मजूर' पक्षाची स्थापना केली होती. स्वतंत्र मजूर पक्षाने १९३७ च्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत भाग घेऊन १३ जागा जिंकल्या पुढे चालून आंबेडकरांच्या सहकाऱ्यांना केवळ अनुसूचित जातीच्या लोकांसाठी वेगळा राजकीय पक्ष स्थापन करण्याची आवश्यकता वाटू लागली. त्यातून मजूर पक्षाचे विसर्जन होऊन १९४२ साली 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' या पक्षाची स्थापना करण्यात आली.

८) बहुजन महासंघ

महाराष्ट्रात १९९० च्या दशकात प्रस्थापित राजकारणाला शह देऊन 'अकोला पॅटर्नच्या' माध्यमातून पुढे आलेला राजकीय पक्ष म्हणजे बहुजन महासंघ होय. बहुजन समाजातील अंग मेहनतीचे काम करणारे, अन्य मागासवर्गातील शेतकरी, कामगार, स्त्रिया, दलित व मुस्लीम या उपेक्षित समाज घटकांना केंद्रस्थानी ठेऊन राजकारणाची सुरुवात करणारा हा पक्ष श्री. मखराम पवार यांनी १५ फेब्रुवारी १९९३ राजी स्थापन केला आहे. पक्षाच्या स्थापनेत त्यांच्याबरोबर बी.आर. शिरसाट, सूर्यभान ढोमणे, दशरथ भांडे इ. बहुजन नेते सहभागी होते. पक्षाच्या उभारणीत ॲड. प्रकाश आंबेडकरांचा मोठा वाटा होता म्हणूनच पुढे चालून भारतीय रिपब्लीकन पक्ष आणि बहुजन महासंघ अशी राजकीय आघाडी अस्तित्वात आली.

दलित संघटना भाजप-शिवसेनेपासून फटकून होत्या. परंतु नामदेव ढसाळ यांनी निर्माण केलेल्या वाटेने जाऊन रामदास आठवले यांच्यासारख्या दलित समाजात चांगले पाठबळ असलेल्या नेत्यानेही युतीमध्ये प्रवेश केला. त्यामुळे युतीचे नामकरण महायुती असे करण्यात आले.

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्रात प्रभावक्षेत्र असलेल्या राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेनेही महायुतीशी जमवून घेतले.

**९) आम आदमी पक्ष :**

दिल्ली विधानसभेच्या डिसेंबर २०१३ मध्ये झालेल्या निवडणूकीत आम आदमी पार्टीला मिळालेल्या यशामुळे महाराष्ट्रातही त्या पक्षाची चर्चा सुरु आहे. मात्र या पक्षाचे महाराष्ट्रात काहीही कार्य नसल्यामुळे निवडणुकीत फारशी संधी मिळण्याची सध्या तरी शक्यता नाही.

## ४.३ – पुणे शहरातील विधानसभा मतदारसंघ हद्दीचा परिसर

प्रस्तुत प्रकरणामध्ये पुणे शहरातील विधानसभा मतदारसंघाच्या हद्दीचा परिसर त्यामध्ये समाविष्ट असलेल्या प्रभागांचा परिचय करून देण्यात आलेला आहे. तसेच या मतदारसंघातील राजकीय, सामाजिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला आहे.

पुणे शहर विधानसभा मतदार संघामध्ये वडगांव शेरी, शिवाजीनगर, कोथरुड, पर्वती, पुणे कॅन्टोन्मेंट, कसबा, खडकवासला, हडपसर या मतदारसंघांचा समावेश होतो. पुणे जिल्ह्यातील एका विधानसभेच्या मतदारसंघामधील लोकसंख्या तीन लाख चव्वेचाळीस हजार राहिल असे या मतदारसंघातील प्रमुख सुत्र आहे.[1] (डॉ. प्रकाश पवार 'महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुर्नरचना (मतदारसंघाची पुनर्रचना)', प्रकरण क्र. ८, पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघाची पुनर्रचना पान क्र. २१८)

**कसबा मतदारसंघ – हद्दीचा परिसर**

कसबा विधानसभा मतदारसंघात कसबा गणपती, गावकोस मारुती, विश्रामबागवाडा, म. फुले मंडई, भरत नाट्य मंदीर, केसरीवाडा, एस. पी. कॉलेज, राजा केळकर संग्रहालय, सिटीपोस्ट, डॉ.

कोटणीस दवाखाना, शिवाजी मराठा, सोन्या मारुती, गुरुद्वारा, जैन मंदीर, सिमला भूमी व बुरुड पुल या भागाचा समावेश केला आहे. या मतदारसंघाची सीमारेषा सारसबाग, संत तुकडोबा महाराज चौक, खडकमाळआळी रस्ता, पंचहौद मिशन, म. गांधी विद्यालय, घोरपडे पेठ, एकबोटे कॉलनी, टिंबर मार्केट, लक्ष्मी बाजार, पारसी अग्यारी, गणेशपेठ, गावकोस मारुती, शनिवारवाडा, ओंकारेश्वर मंदिर, नारायणपेठ, ज्ञानप्रबोधिनी, पूना हॉस्पीटल, ठोसरपागा, निवारा वृद्धाश्रम, राजेंद्रनगर, मदर तेरेसा उद्यान, दांडेकर पुल व पानमळ्यापर्यंत आहे. शिवाजीनगर मतदार संघातील पेठांचा भाग कसब्यात नव्याने सामील केला आहे. [2] (डॉ. प्रकाश पवार 'महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुर्नरचना (मतदारसंघाची पुनर्रचना), प्रकरण क्र. ८, पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघाची पुनर्रचना पान क्र. २१८)

जाजू सदन जवळचा परिसर, कसबा पेठ पुणे ते पवळे चौक ते कुंभार वेस रस्ता, मटन मार्केट मागे निराजी स्मृती बिल्डींग पवळे चौक ते कुंभार वेस रस्ता, शेख सल्ला दर्ग्यासमोर (पूर्वेला), मानकर बिल्डींग परिसर, भोईवाडा, जाचक वाडा, जुनाकाळ भैरवनाथ मंदिराजवळ कुंभारवाडा, गणपती मंदिरा शेजारी तांबट आळी, वाघचौरे वाडा, तांबोळी गल्ली, तांबट आळी, सुपेकर वाडा, भागवत वाडा, रुईकर वाडा, आत्तार वाडा, राममंदीर, चांभार आळी पाचारणे वाडा, कसबा पेठ, अशोक नगर, कागदीपुरा पंपिंग स्टेशन.

**वडगाव शेरी मतदारसंघाच्या हद्दीमध्ये खालील परिसर समाविष्ट आहे.**

येरवडा, गुरुद्वारा, रामाकुट्टी, गुंजन सिनेमा, गणेशनगर, फुलेनगर, प्रिझन प्रेस, सिद्धार्थ डिस्पेन्सरी, विश्रांतवाडी, हुसेन शा बाबानगर, कळस, धानोरी, दिघी, मिलिटरी कॅम्प, लोहगाव विमानतळ, वडगाव, शिंदे, निरगुडी, खराडी व वडगाव शेरी समाविष्ट भाग.

**शिवाजीनगर मतदारसंघाच्या हद्दीमध्ये खालील परिसर समाविष्ट आहे.**

शहरी उपनगरी दोन प्रकारचे भाग एकत्र. डेक्कन जिमखाना, खडकी, बी एम सी सी महाविद्यालय, पत्रकारनगर, जानवाडी, वैदूवाडी, वडारवाडी, मॉडेल कॉलनी, गव्हर्न्मेंट पॉलिटेक्निक, जंगली महाराज मंदीर, बालगंधर्व रंगमंदिर, शेती महाविद्यालय, शासकीय दूध डेअरी, इंजिनिअरींग कॉलेज, औंधगाव, औंध आयटीआय हा भाग समाविष्ट आहे.

**कोथरूड मतदारसंघाच्या हद्दीमध्ये खालील परिसर समाविष्ट आहे.**

हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, नवसह्याद्री, एरंडवणे गावठाण, एस.एन.डी.टी., मोरे विद्यालय, राजभवन, एन.सी.एल., बाणेर, बालेवाडी, सुतारवाडी, गुरुजन सोसायटी, गांधीभवन, कोथरुड गावठाण, भवानीनगर, थोरात उद्यान, शीलाविहार, दीनदयाल उपाध्याय विद्यालय यांचा समावेश.

**पर्वती मतदारसंघाच्या हद्दीमध्ये खालील परिसर समाविष्ट आहे.**

हिंगणे खुर्द ते कोंढवा आणि जयदेवनगर ते बिबवेवाडी, मतदारसंघाची पूनर्रचना, पर्वती गावठाण, लक्ष्मीनगर, जनता वसाहत, पर्वती जलकेंद्र, जयदेवनगर, हिंगणे खुर्द, अरणेश्वर, चव्हाणनगर, शंकर महाराज मठ, बिबवेवाडी गावठाण, लुल्लानगर, मार्केटयार्ड, पीए.टी डेपो, मुकुंदनगर, महर्षीनगर, स्वारगेट पोलिसलाईन, मित्रमंडळ कॉलनी, पर्वती दर्शन या भागांचा समावेश होतो.

**पुणे कॅन्टोंन्मेंट  मतदारसंघाच्या हद्दीमध्ये खालील परिसर समाविष्ट आहे.**

मीरा हाऊसिंग सोसायटी, गुलटेकडी, रास्तापेठ, केईएम हॉस्पिटल, कोरेगाव पार्क, विकासनगर, कवडेवाडी, वानवडी यांचा समावेश.

**हडपसर मतदारसंघाच्या हद्दीमध्ये खालील परिसर समाविष्ट आहे.**

जुन्या पुणे कॅन्टोंन्मेंट विधानसभा मतदारसंघाची फोड करण्यातून हडपसर विधानसभा मतदार संघाची निर्मिती झाली.कोंढवा खुर्द, महंमदवाडी, हडपसर, हडपसर गाव, रामटेकडी, वैदूवाडी, साधना विद्यालय, विठानगर, सातववाडी, गोंधळेनगर, मगरपट्टा, मुंढवा, मांजरी बुद्रुकचा भाग समाविष्ट आहे.या मतदारसंघाची मतदार संख्या २ लाख ७० हजार एवढी आहे.

**खडकवासला (२११) मतदारसंघाच्या हद्दीमध्ये खालील परिसर समाविष्ट आहे.**

जुन्या मुळशी व पुणे कॅन्टोंमेन्ट मधील भाग या मतदारसंघाला जोडला आहे. शहरी भाग - कोथरूड मधील भुसारी कॉलनी, बावधन खुर्द, वारजे माळवाडी, शिवणे, उत्तमनगर, कोंढवे-धावडे, कोपरे, उत्तमनगर, हिंगणे, आनंदनगर, माणिकबाग, वडगाव बुद्रुक, वडगाव खुर्द, धायरी, धनकवडी, कात्रज, नऱ्हे आंबेगाव हा शहरी भाग या मतदारसंघात येतात.ग्रामीण भाग- कात्रज घाटापलीकडील शिवापूर, आर्वी, कोंढणपूर, रामनगर, खेड, गौडदरा, गोगलेवाडी, कल्याण, रहाटवडे, मोगरवाडी, खामगाव, वरदाडे, भालखेड, सोनापूर, सिंहगड किल्ला व परिसरातील वाड्या यांचा समावेश या मतदारसंघात होतो. तसेच या मतदारसंघात - खडकवासला धरण परिसरातील नांदेड, खडकवासला, डोणजे, गोऱ्हे बुद्रुक, खानापूर, कुडजे, आगळंबे, मांडवी सांगराण, बहूली, जांभळी व आंबी यांचा समावेश होतो.ग्रामीण भागातील ३७ प्रमुख गावे या मतदारसंघात येतात. अशाप्रकारे नीम शहरी निमग्रामीण स्वरुपाचा हा नवा मतदारसंघ आहे.

## ४.४ – मतदारसंघातील परिस्थिती

शहराचे उपनगर आणि झपाट्याने वाढलेल्या कोथरूड विधानसभा मतदारसंघात आजही अनेक समस्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. बहुतांश उच्च मध्यमवर्गीय आणि उच्चवर्गीय नागरिकांची लोकवस्ती या मतदारसंघात राहते. 'एमआयटी' सारख्या अनेक मोठ्या शैक्षणिक संस्था, मॉल, बाजारपेठा या भागात असल्याने पाणी, रस्ते अशा पायाभूत सुविधांवर ताण वाढत आहे. 'मुंबई बेंगळुरु हायवे' मुळे चांदणी चौकासह आजुबाजूच्या परिसरात वाहतुकीचे सतत तीन तेरा वाजल्याचे दृश्य

सदैव पहायला मिळते. वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी या भागात उड्डाणपूल उभारण्याचा प्रस्ताव गेली अनेक वर्षे पडून आहे. महापालिकेच्या माध्यमातून येथे उड्डाणपूल उभारला जाणार आहे. 'पीएमपीएमएल'ची सेवा सुधारावी, यासाठी लोकप्रतिनिधींनी फारसा आवाज उठविला नसल्याचे नागरिकांनी सांगितले. ससूनच्या धर्तीवर आमदार निधीतून कोथरुड भागासाठी नवीन हॉस्पिटल उभारण्याची घोषणा विद्यमान आमदार चंद्रकांत मोकाटे यांनी केली होती. अद्यापही हॉस्पिटलसाठी जागा मिळविण्यास यश आलेले नाही. आमदार होण्यापूर्वी मोकाटे यांनी महापालिकेत उपमहापौर म्हणून देखील काम केले आहे.

शहराचा मध्यवर्ती भाग आणि बाजारपेठ असलेल्या सर्व पेठा आणि कसबा विधानसभा मतदारसंघात येतात. वाढत्या शहरीकरणामुळे या भागातील रस्ते कमी पडत आहेत. संपूर्ण दिवस आणि रात्र हा परिसर अत्यंत गजबजलेला असतो. शहरातील उपनगरांसह बाहेर गावावरुन देखील अनेक मंडळी या भागात खरेदीसाठी येत असल्याचे या भागात नेहमी गर्दी होते. स्थानिक नागरिकांनाच येथे वाहने लावण्यासाठी जागा मिळत नाही. तर, खरेदीसाठी आलेल्या नागरिकांच्या गाड्यांना जागा मिळविण्यासाठी कसरत करावी लागते. मतदारसंघात असलेली वाहतुकीची समस्या, जुन्या वाड्यांचे पुनर्वसन, हेरिटेज इमारतीच्या शंभर मीटर परिसरात बांधकाम करण्यासाठी घातले जाणारे निर्बंध यासाठी पाठपुरावा करून नागरिकांचे प्रश्न सोडविले जातील, असे आश्वासन प्रत्येक निवडणुकीत मतदारांना दिले जाते. आजवर अनेक निवडणुका झाल्या. अनेक लोकप्रतिनिधी विजयी झाले मात्र, वर्षानुवर्षे येथील प्रश्न तसेच कायम आहेत. विद्यमान आमदार गिरीश बापट हे या मतदारसंघातून अनेक वर्षे प्रतिनिधीत्व करत आहेत.

कसबा मतदारसंघात अनेक जुने वाडे आहेत. भाडेकरू जागा देत नसल्याने वाडे पाडून रिडेव्हलेपमेंट झालेली नाही. जागा मालक भाडेकरूंना पर्यायी जागा उपलब्ध करून देत नसल्याने अनेक नागरिक आजही या वाड्यांमध्येच राहत आहेत. यातील बहुतांश वाडे जीर्ण झाल्याने अतिशय धोकादायक झालेले आहेत. जागा सोडली, तर परत जागा मिळणार नाही, या भीतीने भाडेकरू जागा खाली करत नाहीत. जुन्या वाड्यांच्या पुनर्विकासाबरोबरच हेरिटेज इमारतीच्या आजूबाजुच्या इमारतींचा पुनर्विकासाचा प्रश्न आजही रखडलेला असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

पर्वती विधानसभा मतदारसंघातील काही भागात उच्चभ्रू सोसायट्या, बंगले यांचे प्रमाण पहायला मिळत असले तरी दुसरीकडे झोपडपट्टीत राहणारे लोक; तसेच पूरग्रस्त वसाहतींचा गंभीर झालेला प्रश्न या समस्या प्रामुख्याने या मतदारसंघात भेडसावतात. ३० ते ३५ पेक्षा अधिक झोपडपट्ट्या या भागात आहेत. कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा, भरुन वाहणाऱ्या कचराकुंड्या, नाल्यांची झालेली दुरवस्था अशा अनेक समस्या प्रामुख्याने या भागात जाणवतात. पर्वतीमधील अंतर्गत रस्ते अत्यंत अरूंद असल्याने सकाळी आणि संध्याकाळी या भागात वाहतुकीची प्रचंड कोंडी होते. या भागातील रस्त्यांचे रुंदीकरण करावे अशी मागणी वारंवार आमदारांकडे करण्यात आलेली आहे. मात्र, कोणताही उपयोग झालेला नाही. पानशेत धरण फुटल्यानंतर पानशेत पूरग्रस्त नागरिकांना पर्वती मतदारसंघात जागा देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. ही घरे देताना शासनाने ९९ वर्षांचा करार करून या जागा पूरग्रस्तांना दिलेल्या आहेत. या जागा नावावर करून मिळाव्यात, यासाठी अनेक वर्षे येथील रहिवासी प्रयत्नशील आहेत. या जागेमध्ये राहणारी पूरग्रस्तांची ही दुसरी पिढी आहे. या जागा नावावर करून देण्याचे

आश्वासन विद्यमान आमदार माधुरी मिसाळ यांनी अनेकदा मतदारांना दिले होते. मात्र त्यामध्ये आजही यश मिळालेले नाही. प्रत्येक कुटुंबातील सदस्यांची संख्या वाढल्याने अनेक नागरिकांनी दोन मजली इमारती उभारल्या आहेत. विशेष म्हणजे हे करताना बहुतेकांनी महापालिकेची परवानगी न घेताच बेकायदा बांधकामे केली आहे. बांधकाम करताना कोणतेही नियोजन न झाल्याने पायाभूत सुविधांवर ताण वाढत आहे. ही गोष्ट अनेकदा आमदारांच्या कानावर घालूनही कोणताही उपयोग होत नसल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे.

शिवाजीनगर मतदारसंघात झोपडपट्टी पुनर्वसनाचा (एसआरए) प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या भागात मोठ्या प्रमाणात झोपडपट्ट्या आहेत. राज्यात गेली पंधरा वर्षे सत्ताधारी असलेल्या काँग्रेस, राष्ट्रवादी आघाडी पक्षाचे आमदार विनायक निम्हण येथून प्रतिनिधित्व करतात. मात्र, सत्ताधारी पक्षाचे असतानाही त्यांचा पाठपुरावा कमी पडत असल्याने येथील प्रश्न सुटलेले नसल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. मतदारसंघात वाढत्या लोकसंख्येमुळे रस्ते अपुरे पडत आहेत. यामुळे रस्ता रुंदीकरणाचे प्रश्न, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर येणारा ताण, तसेच वाहतूक समस्या नागरिकांना जाणवतात. महिलांच्या सुरक्षिततेसाठी लोकप्रतिनिधींचे प्रयत्न कमी पडत असल्याचे नागरिकांचे सांगणे आहे. या भागात गेल्या काही वर्षांपासून बांधून तयार असलेली भाजी मंडईची इमारत अद्याप सुरु झालेली नाही. काही सोसायट्यांमध्ये आजही पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. उन्हाळ्यात सोसायटीतील नागरिकांना पाण्याच्या टँकरसाठी पैसे खर्च करावे लागतात. गोखलेनगर भागात असलेल्या पूरग्रस्त वसाहतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न गंभीर आहे. या सर्व इमारती 'म्हाडा' च्या मालकीच्या असून, या वसाहतींना अडीच ते तीन 'एफएसआय' बांधकाम करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी गेले काही वर्षे केली जात आहे. मात्र लोकप्रतिनिधी म्हणून आमदार निम्हण यांनी राज्य सरकारकडे फारसे प्रयत्न केले नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

**पुण्याचे प्रश्न**

१) वाहतुकीची कोंडी, कचऱ्याचा त्रास, झपाट्याने खासकीकरण होत असल्याने महाग होणारी आरोग्यसेवा, पोलिसच कमी असल्याने होणाऱ्या साखळीचोऱ्या आणि दरोडे.

२) पुणे शहर, पिंपरी-चिंचवड व जिल्हा यांना वर्तुळाकृती जोडणारा रिंग रोड आणि रिंग रेल्वेची १९७० मध्ये आखलेली योजना

३) मेट्रोच्या दोन मार्गांचा मुहुर्त लवकर निघावा.

४) समाविष्ट गावांचा गतीने विकास होण्यासाठी त्या गावांचा अजूनही अपूर्ण असलेला विकास आराखडा पूर्ण व्हावा.

५) ४० टक्के पुणेकर झोपडपट्ट्यांत राहणारे असल्याने त्यांना चांगले घर मिळण्याची गरज आहे. मात्र, झोपडपट्टी पुनर्वसनाचे घोंगडे अजूनही भिजतच असून, या योजनांना गती देण्यासाठी योग्य नियम सरकारने करावेत.

६) गरीब आणि मध्यमवर्गीयांचा आधार म्हणजे ससून रुग्णालय. मात्र, त्यावरील भार प्रचंड वाढल्याने ससूनच्या धर्तीवर पुण्यात किमान चार रुग्णालये व्हावीत.

७) पोलिसांची पुरेशी संख्या : पुण्यात पोलिसांची संख्या अत्यंत अपुरी असल्याने वाहतुकीच्या नियोजनाचा अभाव, कायदा आणि सुव्यवस्थेची ढासळलेली स्थिती दिसून येते. ही संख्या पुरेशी असावी.

८) कचऱ्याच्या डेपोसाठी जागा : शहरात एकच मोठा कचरा डेपो असल्याने प्रदूषणापासून ते वाहतुकीच्या कोंडीपर्यंत सहन करावा लागणारा त्रास टाळला पाहिजे. त्यासाठी शहराच्या चारी बाजूंना स्वतंत्र डेपोसाठी सरकारने जागा द्यावी.

**मतदारसंघातील समस्या**

**पर्वती मतदारसंघातील समस्या / प्रश्न –**

पर्वती मतदारसंघातील काही भागात उच्चभ्रू सोसायट्या बंगले यांचे प्रमाण पाहायला मिळते तर दुसरीकडे झोपडपट्टीत राहणारे लोक, पूरग्रस्त वसाहतींचा प्रश्न या समस्या प्रामुख्याने या मतदारसंघात भेडसावतात. ३० ते ३५% पेक्षाही जास्त झोपडपट्ट्या या भागात आहेत.

कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा. भरून वाहणाऱ्या कचराकुंड्या. नाल्यांची दूरवस्था. अंतर्गत रस्ते अत्यंत अरूंद, सकाळी व संध्याकाळी या ठिकाणी वाहतुकीची प्रचंड कोंडी – रस्त्याचे रुंदीकरण करावे. पानशेत धरण फुटल्यानंतर, पानशेत पुरग्रस्त नागरिकांना पर्वती मतदारसंघात जागा देवून त्यांचे पूनर्वसन करण्यात आले आहे. ही घरे देताना शासनाने १९ वर्षांचा करार करून या जागा पुरग्रस्तांना दिल्या आहेत. या जागा नावावर करून मिळाव्यात. आ. माधुरी मिसाळांनी अनेकदा आश्वासन दिले. महापालिकेची परवानगी न घेताच बेकायदा बांधकामे केली आहेत. सार्वजनिक संडास, मूत्राऱ्या यांची दूरवस्था अस्वच्छता.

हडपसर मतदारसंघातील समस्या –

वाहतुकीचा गंभीर प्रश्न सोडवावा. विद्यार्थ्यांना जीव मूठीत धरून शाळेत प्रवेश करताना उड्डाणपुलामुळे मूख्य गाडीतळ परिसर गजबजून गेलेला. अपघात होतात. सार्वजनिक टॉयलेटस्, बाथरूमची दुरावस्था.

कसबा मतदारसंघ –

– पार्किंगचा प्रश्न – पार्किंगचा वापर गोडाऊन म्हणून करण्यात येत आहे. प्रत्येक इमारतीतील पार्किंग भाड्याने देण्यात आली आहेत. रस्त्यावर गाड्या लावलेल्या असतात. पर्यायी व्यवस्था झाली पाहिजे.

## ४.५ – विधानसभा निवडणूकीसाठी (२०१४) उभे राहिलेले उमेदवार

विधानसभा निवडणूक २०१४ मध्ये पुणे विधानसभा मतदारसंघातून आठ आमदार, एक विधान परिषद सदस्य, तीन माजी मंत्री, तब्बल २४ नगरसेवक, सहा माजी नगरसेवकांसह २०३ उमेदवार शहरातील जागांसाठी रिंगणात उतरले होते. कॉंग्रेस, राष्ट्रवादी आघाडी आणि भाजप शिवसेना युती तुटल्यानंतर ह्या निवडणुकीतून बहुरंगी लढती झाल्या. मतदारसंघातून उभे राहिलेले उमेदवार व त्यांच्या पक्षांची ओळख :–

१३ वी विधानसभा निवडणूकीसाठी कसबापेठ मतदारसंघातून भाजप या पक्षाने गिरीश बापट यांना उमेदवारी दिली होती. काँग्रेस पक्षाने रोहित टिळक यांना कसब्यातून उमेदवारी दिली होती. मनसे या पक्षाने रविंद्र धंगेकर यांना उमेदवारी दिली होती. राष्ट्रवादी काँग्रेसकडून दिपक मानकर उभे होते. अपक्ष म्हणून सूर्यकांत आंदेकर हे उमेदवार कसबा पेठेतून उभे राहिले होते.

मतदारसंघातून निवडणुकीसाठी उभे राहिले उमेदवार व त्यांचे पक्ष

**१) कसबा पेठ उमेदवार व त्यांचे पक्ष**

१) गिरीश बापट - भाजपा, २) रोहित टिळक - काँग्रेस, ३) रविंद्र धंगेकर - मनसे, ४) दीपक मानकर - राष्ट्रवादी काँग्रेस, ५) सूर्यकांत आंदेकर - अपक्ष

**२) पुणे कॅन्टोंन्मेंट उमेदवार व त्यांचे पक्ष -**

१) दिलीप कांबळे - भाजपा, २) रमेश बागवे - काँग्रेस, ३) परशुराम वाडेकर - शिवसेना, ४) अजय तायडे - मनसे, ५) भगवान वैराट - राष्ट्रवादी काँग्रेस

**३) हडपसर -**

१) योगेश टिळेकर - भाजप, २) महादेव बाबर - शिवसेना, ३) चेतन तुपे - राष्ट्रवादी काँग्रेस, ४) प्रमोद भानगिरे - मनसे, ५) बाळासाहेब शिवरकर - काँग्रेस

**४) पर्वती -**

१) माधुरी मिसाळ - भाजपा, २) सचिन तावरे - शिवसेना, ३) सुभाष जगताप - राष्ट्रवादी काँग्रेस, ४) अभय छाजेड - काँग्रेस, ५) जयराज लांडगे - मनसे

**५) खडकवासला -**

१) भीमराव तापकीर - भाजपा, २) दिलीप बराटे - राष्ट्रवादी, ३) राजाभाऊ लायगुडे - मनसे, ४) श्याम देशपांडे - शिवसेना, ५) श्रीरंग चव्हाण पाटील - काँग्रेस

**६) कोथरुड**

१) मेधा कुलकर्णी - भाजपा, २) चंद्रकांत मोकाटे - शिवसेना, ३) बाबूराव चांदेरे - राष्ट्रवादी काँग्रेस, ४) किशोर शिंदे - मनसे, ५) उमेश कंधारे - काँग्रेस

**७) शिवाजीनगर**

१) विजय काळे - भाजप, २) विनायक निम्हण - काँग्रेस, ३) अनिल भोसले - राष्ट्रवादी, ४) मिलिंद एकबोटे - शिवसेना, ५) राजू पवार - मनसे

**८) वडगावशेरी**

१) जगदीश मुळीक - भाजप, २) सुनील टिंगरे - शिवसेना, ३) बापू पठारे - राष्ट्रवादी काँग्रेस, ४) नारायण गलांडे - मनसे, ५) चंद्रकांत छाजेड - काँग्रेस

## उमेदवार परिचय

पुण्यातील विधानसभा मतदारसंघांतील लढतींचे चित्र :-

| मतदारसंघ | राष्ट्रवादी | काँग्रेस | भाजप | शिवसेना | मनसे |
|---|---|---|---|---|---|
| वडगाव शेरी | बापू पठारे | चंद्रकांत छाजेड | जगदीश मुळीक | सुनील टिंगरे | नारायण गलांडे |
| हडपसर | चेतन तूपे | बाळासाहेब शिवरकर | योगेश टिळेकर | महादेव बाबर | प्रशांत भानगिरे |
| शिवाजीनगर | अनिल भोसले | विनायक निम्हण | विजय काळे | मिलिंद एकबोटे | राजू पवार |
| पर्वती | सुभाष जगताप | अभय छाजेड | माधुरी मिसाळ | सचिन तावरे | जयराज लांडगे |
| कोथरूड | बाबूराव चांदेरे | उमशे कंधारे | मधो कुलकर्णी | चंद्रकांत मोकाटे | किशोर शिंदे |
| पुणे कँटोन्टें | हीना मोमीन खान<br>भगवान वैराट | रमशे बागवे | दिलीप कांबळे | परशुराम वाडेकर | अजय तायडे |
| खडकवासला | दिलीप बराटे | श्रीरंग चव्हाण पाटील | भीमराव तापकीर | श्याम देशपांडे | राजाभाऊ लायगुडे |
| कसबा पेठ | दीपक मानकर | रोहित टिळक | गिरीश बापट | प्रधांत बधे | रवींद्र धंगेकर |

या प्रकरणात विधानसभा निवडणूक २०१४ च्या निवडणूकीसाठी उभे राहिलेले उमेदवार व त्यांचे पक्ष यांची ओळख करून दिलेली आहे. [3] (लोकराज्य मासिकाच्या नोव्हेंबर २०१४ या अंकातून प्रसिद्धी दिली गेली आहे. पान नं. ४४)

**उमेदवारी अर्ज –**

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख २७ सप्टेंबर २०१४ होती. २० सप्टेंबर पासूनच अर्जवाटप सुरू झाले होते.

शनिवार दि. २६ सप्टेंबर २०१४ रोजी प्रमुख पक्षांची अधिकृत उमदवारी मिळालेल्या उमेदवारांबरोबरच पक्षाची उमदवारी मिळेल, या आशेने अनेक इच्छुकांनी धामधुमीने उमदवारी अर्ज दाखल केले. अर्ज दाखल करण्याचा शनिवार शेवटाचा दिवस असल्याने इच्छुकांची एकच गर्दी निवडणूक कार्यालयांत झाली होती. मिरवणुकीमध्ये शक्तिप्रदर्शन, त्यानंतरच्या प्रचारसभांचा प्रारंभ यामुळे पुण्यात निवडणुकीचे वातावरण तयार झाले होते.

**वडगाव शेरी -**

राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार बापू पठारे यांनी, तर काँग्रेसचे ॲड. चंद्रकांत छाजेड यांच्यासह अकरा जणांनी दि. २५ सप्टेंबर रोजी शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल केले. कार्यकर्त्यांच्या फौजफाट्यासह आलेल्या पठारे यांनी अर्ज दाखल केल्यानंतर लगेचच जाहीर सभा घेऊन प्रचाराला सुरवात केली. गर्दी नियंत्रित करण्यासाठी येरवडा क्षेत्रीय कार्यालयाभोवती मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवला होता. लता साठे, राहुल भंडारे, संतोष आरडे यांनी सुरुवातीला येऊन आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. मोजक्याच कार्यकर्त्यांबरोबर आलेल्या ॲड. छाजेड यांनीही आपला अर्ज दाखल केला. दरम्यान बँड आणि जोरदार घोषणा करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या रॅलीद्वारे राष्ट्रवादी काँग्रेसचे पठारे हे दाखल झाले. नगरसेवक पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि कुटुंबियांबरोबर पठारे यांनी दुपारी दीडच्या सुमारास आपला अर्ज दाखल केला. भारतीय नवनिर्माण सेनेतर्फे संजय पडवळ यांनीही अर्ज भरला. त्यानंतर दादूभाऊ रणसिंग, प्रीतम खांदवे यांच्यासह नारायण गलांडे यांनीही आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. कर्जदार, जामीनदार बचाव संघर्ष समितीच्या सुषमा विधाते या तृतीयपंथी उमेदवारानेही अपक्ष म्हणून आपला अर्ज दाखल केला. विधाते म्हणाल्या, ''सध्याचे राजकीय लोक कृतीत काहीच उतरवित नाहीत. म्हणूनच आम्ही निवडणूक लढविण्याचे ठरविले. उमेदवार म्हणून जनतेपुढे जाताना आम्हालाही समाजाचे प्रश्न समजतील.''

**हडपसर -**

शिवसेनेचे आमदार महादेव बाबर व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने नगरसेवक नाना भानगिरे या दोघांनी दि. २५ सप्टेंबर रोजी शुक्रवारी शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केले. दिवसभरात काँग्रेस व राष्ट्रवादीचे उमेदवार आपले उमेदवारी अर्ज भरतील याबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता होती. मात्र, दोन्ही पक्षांची उमदवारी जाहीर न झाल्याने या दोन्ही पक्षांकडून कोणाचेही अर्ज दाखल झाले नाहीत.

आमदार बाबर यांनी सोलापूर रस्त्याने पदयात्रा काढून शक्तिप्रदर्शन करीत हडपसर साधना विद्यालयातील निवडणूक कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज भरला. एबी फॉर्म व मालमत्तेबाबतचे प्रतिज्ञापत्र शनिवारी सादर केले. शिवसेनेचे खासदार आढळराव पाटील यांच्या उपस्थितीत बाबर यांनी उमेदवारी अर्ज भरला. भानगिरे यांनी सकाळी नगरसेवकाचा राजीनामा दिल्यानंतर महमंदवाडी-ससाणेनगर-हडपसर गाव मार्गे रॅली काढून जोरदार शक्तिप्रदर्शन केले. भानगिरे यांनीदेखील एबी फॉर्म आपल्या अर्जासोबत जोडलेला नसून शनिवारी जोडला जाईल, असे प्रतिज्ञापत्रात नमूद केले होते.

**शिवाजीनगर -**

इतर कार्यालयांच्या तुलनेत शिवाजीनगर विधानसभा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात २५ सप्टेंबर रोजी शुक्रवारी वातावरण शांत होते. दोन अपक्ष वगळता कोणत्याही पक्षाच्या अधिकृत उमेदवाराचा अर्ज दाखल झालाच नाही. काँग्रेसचे विद्यमान आमदार विनायक निम्हण २५ सप्टेंबरला आपला अर्ज दाखल केला होता.

**पर्वती -**

भारतीय जनता पक्षाच्या आमदार माधुरी मिसाळ, काँग्रेसचे शहराध्यक्ष अभय छाजेड, राष्ट्रवादी

काँग्रेसतर्फे महापालिकेतील सभागृह नेते सुभाष जगताप, नगरसेवक शिवलाल भोसले यांनी अर्ज दाखल केले. पर्वतीत आठ उमेदवारांनी एकूण २२ अर्ज दाखल केले होते.

भाजप-शिवसेना युती व काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी न झाल्याने सर्वच पक्ष निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. तेथील वातावरण निवडणूकमय झाले होते. जगताप अर्ज दाखल करीत असतानाच त्यांच्याच पक्षाचे भोसले हेही अर्ज भरण्यासाठी आले. दोघांसमवेत कार्यकर्ते मोठ्या संख्येने होते. जगताप बाहेर येताच, त्यांच्या कार्यकर्त्यांनी घोषणा देत परिसर दणाणून सोडला. राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आपल्यालाच उमेदवारी मिळणार असल्याचा दावा दोघांनीही केला. बहुजन समाज पक्षाचे राम पालखे आणि अपक्ष उमेदवार रमेश धर्मावत यांनीही अर्ज दाखल केले. गेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे या मतदारसंघातून निवडणूक लढविणारे सचिन तावरे यांनी गुरुवारी भाजप आणि अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केले. अपक्ष उमेदवारी गणेश लगस यांनीही बुधवारी अर्ज भरला.

**कोथरूड -**

शिवसेनेचे आमदार चंद्रकांत मोकाटे, भाजपच्या उमेदवार मेधा कुलकर्णी आणि मनसेचे उमेदवार किशोर शिंदे यांनी शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केले. कोथरूड गावातील तुळजाभवानी माता मंदिरापासून चंद्रकांत मोकाटे यांनी पदयात्रा करीत, तर मेधा कुलकर्णी यांनी दशभुजा गणपती मंदिरापासून पदयात्रा करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. कर्वे रस्त्यावरील अभिनव चौकामध्ये शिवसेना आणि भाजपचे कार्यकर्ते समोरासमोर आल्याने तणाव निर्माण झाला होता. शिवसेनेच्या आणि भाजपच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांच्या विरोधात घोषणाबाजी केली. मात्र भाजपचे कार्यकर्ते अखेर रस्त्याच्या कडेला जाऊन उभे राहिल्याने तणाव निवळला.

**कँटोन्मेंट -**

काँग्रेसचे आमदार रमेश बागवे यांनी, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे नगरसेवक अजय तायडे यांनी शुक्रवारी दि. २५ सप्टेंबर रोजी उमदवारी अर्ज दाखल केले. अर्ज दाखल करण्यापूर्वी बागवे आणि तायडे यांनी परिसरातील नागरिकांच्या भेटीगाठी घेतल्या.

**कसबा -**

आमदार गिरीश बापट यांनी पुन्हा एकदा भाजपतर्फे, तर रोहित टिळक यांनी काँग्रेसतर्फे कसबा विधानसभा मतदारसंघातून शुक्रवारी दि. २५ सप्टेंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला. मनसे, राष्ट्रवादी आणि शिवसेनेचे उमेदवारांनी शनिवारी अर्ज दाखल केला. कसबा गणपती मंदिरापासून पदयात्रा काढून सकाळी बापट यांनी अर्ज दाखल केला. टिळक यांनी केसरीवाडा येथे श्रीगणेशाची आरती करून आणि मंडई येथील लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यकर्त्यांसह जाऊन उमदवारी अर्ज दाखल केला. उमदवारी अर्ज भरण्याच्या वेळी बापट आणि टिळक एकाचवेळी आल्याने त्यांनी एकमेकांना भेटून शुभेच्छा दिल्या.

**खडकवासला –**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने आमदार भीमराव तापकीर यांनी अर्ज भरला होता. त्यांच्यासह कॉंग्रेसच्या १६ जणांनी अर्ज भरले होते. राष्ट्रवादीच्या वतीने इच्छुक उमेदवार नगरसेवक दिलीप बराटे आणि शंकर केमसे आणि नगरसेवक सचिन दोडके यांनी ही वारजे, खडकवासला सिंहगड रस्ता–कात्रज धनकवडी मार्गे रॅली काढून अर्ज भरला. कॉंग्रेसच्या वतीने इच्छुक उमेदवार माजी सभापती राम बराटे, सेवादलाचे राष्ट्रीय संघटक हरिदास चरवड, जिल्हा दूध संघाचे संचालक भगवान पासलकर, प्रदेशचे माजी सदस्य श्रीरंग चव्हाण–पाटील, तृप्ती देसाई यांनी अर्ज भरले होते. मनसेकडून राजाभाऊ लायगुडे यांनीही अर्ज भरला होता.

**समारोप –**

पक्षाचे पत्र मिळवून निवडणूक कार्यालय गाठण्याची अखेरच्या क्षणापर्यंतची घाई, एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठीं अचानक केलेले पक्षांतर, काही ठिकाणची बंडखोरी....

अशा वातावरणात उमेदवारांनी अर्ज दाखल केले.

## ४.६ – माघारी घेतलेले अर्ज, माघार घेतलेले उमेदवार

**पर्वती मतदारसंघ –**

या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात व्यापारी वर्ग आहे. कॉंग्रेसचे शहराध्यक्ष या मतदारसंघातून लढत असल्यामुळे कॉंग्रेसपक्षासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरली होती. पर्वती मतदार संघातून कॉंग्रेस नगरसेवक आणि उपमहापौर आबा बागुल यांची पत्नी जयश्री, राष्ट्रवादीचे नगरसेवक शिवलाल भोसले, अपक्ष उमेदवार गणेश लगस, रमेश धर्मावत यांच्यासह ७ उमेदवारांनी माघार घेतली. पर्वतीमध्ये १४ उमेदवार रिंगणात होते. कॉंग्रेसचे बंडखोर उमेदवार अनिल जाधव यांनी माघार घेतली नाही. राष्ट्रवादीचे नगरसेवक शिवलाल भोसले यांनी सभागृह नेते सुभाष जगताप यांच्या उमेदवारीला आव्हान देत स्वतः अर्ज दाखल केला. शिवसेनेकडून सचिन तावरे, मनसेकडून जयराज लांडगे यांच्याशिवाय काही अपक्ष उमेदवारांमुळे पर्वतीतील वातावरण ढवळून निघाले.

**माघार घेतलेले उमेदवार –**

कसबा पेठ मतदारसंघातून उदयकांत आंदेकर, राजा नुंगतकर यांच्यासह इतर ७ उमेदवारांनी माघार घेतली.

**शिवाजीनगर –**

शिवाजीनगर मतदारसंघातून गेली १५ वर्षे आमदार निम्हण प्रतिनिधित्व करीत आहेत. विनायक निम्हण यांच्या उमेदवारीला शिवाजीनगर भागातील अनेक स्थानिक नेत्यांनी विरोध केला होता. त्यानंतरही पक्षाने निम्हण यांना तिकीट दिल्याने बंडखोरी करून माजी महापौर दत्तात्रय गायकवाड, विद्यमान नगरसेवक दत्तात्रय बहिरट यांनी उमदवारी अर्ज दाखल केले होते. या मतदारसंघातून २३ उमेदवारांनी अर्ज केले होते. त्यापैकी गायकवाड, बहिरट यांच्यासह अन्य तीन अपक्ष अशा पाच उमदवारांनी अर्ज मागे घेत माघार घेतली.

**कोथरूड मतदारसंघ –**

माघार घेतलेले उमेदवार – उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची मुदत समाप्त झाली तेव्हा कोथरूड विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादीचे प्रमोद निम्हण यांनी माघार घेतली. १३ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात होते. ह्यामध्ये शिवसेनेचे विद्यमान आमदार चंद्रकांत मोकाटे भाजपच्या मेधा कुलकर्णी, मनसेचे किशोर शिंदे राष्ट्रवादीचे बाबूराव चांदोरे आणि काँग्रेसचे उमेश कंधारे अशी पंचरंगी लढत होती. लोकसभेतील भाजपचे उमेदवार असोत की विधानसभेत शिवसेनेचे एकत्र असताना दोघांनाही कमी अधिक प्रमाणात मताधिक्य मिळत होते. आत्ता ह्या विधानसभेच्या निवडणूकीत प्रथमच हे दोन्ही पक्ष वेगळे होऊन परस्परांच्या विरोधात उभे ठाकल्याने मतदारांपुढे कोणाला मतदान करावयाचे हा प्रश्न उभा राहिला होता. भाजपकडून नरेंद्र मोदीच्या लाटेचा आधार घेण्यात आला.

**बाद केलेले अर्ज –**

विधानसभा निवडणूक – २०१४ मधील काही उमेदवारांच्या अर्जात काही त्रुटी आढळल्यामुळे त्यांचे अर्ज बाद ठरविण्यात आले. पक्षाकडून घाईगडबडीत मिळविलेला एबी फॉर्म, प्रतिज्ञापत्र पक्षाकडून तिकीट मिळाल्यानंतर वा मिळण्यापूर्वी केलेली धावपळ काही जणांच्या बाबतीत फळाला आली.

**वडगाव शेरी –**

वडगावशेरी मतदान संघात उमदवारी अर्ज दाखल केलेल्या ३५ उमेदवारांपैकी चार उमेदवारांचे अर्ज छाननी दरम्यान बाद ठरविण्यात आले. भारतीय जनता पक्षाच्या नावे चंद्रकांत सावंत यांनी अर्ज भरला होता. मात्र एबी फॉर्म न मिळाल्याने त्यांचा अर्ज बाद ठरला. त्याबरोबरच सुषमा विधाते, दिवाकर द्वारके, जयंत मोहिते आणि सुमंत जगताप यांचा अर्ज बाद ठरविण्यांत आला. सर्व प्रमुख पक्षाच्या उमेदवारांसह ३१ उमेदवारांचे अर्ज वैध ठरविण्यात आले.

**शिवाजीनगर –**

शिवाजीनगर मतदान संघातून निवडणूक लढविणाऱ्या सर्व इच्छुक उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. निवडणूक लढविण्यासाठी शिवाजीनगरमधून २३ इच्छुकांनी अर्ज दाखल केले होते. अर्ज छाननीमध्ये कोणत्याही उमेदवारांचा अर्ज अवैध ठरला नाही.

**पर्वती –**

पर्वती मतदारसंघात २२ अर्जांपैकी समीर याकूब शेख या एकमवे उमेदवाराचा अर्ज बाद झाला.

**हडपसर –**

हडपसर मतदारसंघात चार उमेदवारी अर्ज बाद झाले. त्यामध्ये राष्ट्रवादीच्या वैशाली बनकर, हिंदू राष्ट्रसेनेच्या रसिका देसाई यांचा समावेश होता. या मतदारसंघात चेतन तुपे यांना राष्ट्रवादीने उमेदवारी दिली होती. त्यांच्यासमवेत बनकर यांनीदेखील अर्ज भरला होता. त्यांच्याकडे एबी फॉर्म नसल्याने अर्ज बाद ठरविण्यात आला. देसाई यांचा अर्ज तांत्रिक त्रुटीच्या कारणास्तव बाद ठरविण्यात आला.

**खडकवासला –**

खडकवासला मतदारसंघातून १२ अर्ज बाद करण्यात आले. २० उमेदवार रिंगणात होते. काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी दाखल केलेले रामभाऊ बराटे, त्यांचे पुत्र सचिन, हरिदास चरवड यांच्याकडे एबी फॉर्म नसल्याने त्यांचे अर्ज अवैध ठरविण्यात आले आहेत. राष्ट्रवादीचे सचिन दोडके, शंकर केमसे व मनसेचे बाळासाहेब मोकाशी यांची अपक्ष उमेदवारी ग्राह्य धरण्यात आली.

**कसबा –**

उमेदवारी अर्जांसोबत आवश्यक असणारे प्रतिज्ञापत्र जोडले नसल्यामुळे राष्ट्रवादीचे प्रवक्ते अंकुश काकडे यांचा अर्ज बाद करण्यात आला. तसेच शिवसेनेचे माजी नगरसेवक विजय मारटकर यांनी 'ए–बी फॉर्म जोडला नसल्याने त्यांचाही अर्ज बाद झाला.

**कँटोन्मेंट –**

पुणे कँटोन्मेंट मधून हिना मोमिन यांचा अर्ज अवैध ठरविण्यात आला. तसेच एबी फॉर्म नसल्याने राष्ट्रवादीचेच नरेश जाधव, बहुजन समाज पक्षाचे नितीन डुबेक आणि अपक्ष गौतम लोखंडे यांचा समावेश होता.

## ४.७ – विधानसभा निवडणूक (१३ वी) व पुणे शहर – जातीचा प्रभाव

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणावर जातीची पकड असलेली दिसून येते. महाराष्ट्राचे राजकारण मराठा जातीच्या वर्चस्वासाठी प्रसिद्ध आहे. सामाजिक संरचनेच्या प्रक्रियेत जातीच्या वैशिष्ट्यांमध्ये काही अंशी बदल होत असले तरी आर्थिक व राजकीय क्षेत्रात जातीचे आजही अस्तित्त्व टिकून आहे. सुरुवातीपासूनच काही विशिष्ट व वरचढ जातींचे प्रभुत्व राजकारणावर कायम राहिले आहे. समाजातील सत्ताधारी वर्ग जातीचा आधार घेऊन आपले प्राबल्य राजकारणात कायम राखत आहेत. पुण्यातील विधानसभा निवडणूकीवर जातीचा प्रभाव होता का? तो कशाप्रकारे होता याचे विश्लेषण या प्रकरणात केले आहे.

भारत हा देश अनेक बाबतीत विविधता असलेला देश आहे. भारतात धर्म, भाषा, जात, प्रांत, संस्कृती इ. बाबतीत विविधता असली तरीदेखील हजारो वर्षांपासून अस्तित्वात असणारी भारताची राष्ट्रीय एकात्मता नजरेआड करता येत नाही. या सर्व विविधतेतून एकतेच्या भावनेने एकत्र राहण्याची प्राचीन परंपरा भारताला लाभलेली आहे. परंतु भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रारुपांना राजकीय रंग प्राप्त झाला. कालांतराने धर्म, भाषा, जात, प्रादेशिकवाद, जमातवाद इ. समस्या निर्माण झाल्या. आज या समस्या राजकारणातील समस्या म्हणून ओळखल्या जातात. या समस्या भारतीय राजकारणात इतक्या गुंतलेल्या आहेत की आजच्या भारतीय राजकारणावर त्या समस्या आपला प्रभाव टाकत आहेत. या सर्व समस्या भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान देत असतात. भारतातील समाजव्यवस्थेत 'जात' हा घटक अत्यंत प्रभावी व परिणामकारक ठरलेला आहे. पूर्वीच्या काळी भारतात चार्तुवर्ण्य व्यवस्था होती. समाजात ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य, क्षुद्र असे महत्त्वाचे वर्ण होते. या प्रत्येक वर्णाचा स्वतःचा एक खास व्यवसाय ठरलेला होता. पुढे व्यवसायानुसार जात ठरु लागली. एका विशिष्ट जातीतच

रोटी व बेटी व्यवहार होऊ लागले. त्यामुळे विशिष्ट व्यवसाय विशिष्ट जातीसाठी आहे असे समीकरण तयार झाले. आज भारतीय समाजरचनेचा अभ्यास केल्यावर असे आढळून येते की भारतातील जाती व्यवस्थेचे स्वरुप बदलत आहे. कोणतीही व्यक्ती कोणताही व्यवहार मुक्तपणे करीत आहे. सामाजिक संरचनेच्या प्रक्रियेत जातींच्या वैशिष्ट्यांमध्ये काही अंशी बदल होत असले तरी आर्थिक व राजकीय क्षेत्रात जातीचे आजही अस्तित्व टिकून आहे. सामाजिक संरचनेत जात बदलत असली तरी अर्थकारणात व समाजकारणात जातीसंस्था टिकून असल्याने राजकारणातही त्यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात जाणवतो असे दिसून येते. सुरुवातीपासूनच काही विशिष्ट व वरचढ जातीचे प्रभुत्व राजकारणावर कायम राहिले आहे. स्वत:चे अस्तित्व कायम ठेवण्यासाठी बदलत्या परिस्थितीला प्रतिसाद देत जात बदलत आहे. समाजातील सत्ताधारी वर्ग जातीचा आधार घेवून आपले प्राबल्य राजकारणात कायम राखत आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणावर जातीची पकड असलेली दिसून येते. महाराष्ट्राचे राजकारण मराठा जातीच्या वर्चस्वासाठी प्रसिद्ध आहे. थोडक्यात महाराष्ट्रातील जातीची रचना पाहिल्यास असे दिसून येते की, महाराष्ट्रातील 'जात व राजकारण' यांच्या परस्परसंबंधांना राजकीय पार्श्वभूमी लाभली आहे.

१) ब्राह्मण जातीचे राजकारण –

महाराष्ट्राच्या राजकारणावर ब्राह्मणांचा जबरदस्त प्रभाव आढळतो. पारंपारिक उच्च स्थान, ज्ञान क्षेत्रावरील वर्चस्व, प्रशासनावरील ताबा इ. अनुकूल गोष्टींमुळे महाराष्ट्रात ब्राम्हणांचे वर्चस्व असल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या राजकारणात भाजपा व शिवसेना हे दोन पक्ष ब्राह्मणांना अधिक जवळचे वाटतात. याउलट इतर सर्व पक्षांच्या भूमिकेत कमी अधिक प्रमाणात ब्राह्मण वर्चस्वाला विरोध आहे.

२) मराठा जातीचे राजकारण –

खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे राजकारण मराठा वर्चस्वाचे राजकारण म्हणून ओळखले जाते. म. फुले, शाहू-शिंदे यांच्या वैचारिक बैठकीच्या आधारे ब्राह्मणेतर राजकारण घडले आणि मराठा जातीच्या राजकारणाची सुरुवात ब्राह्मणेतर चळवळीतून झाल्याचे दिसते. यशवंतराव चव्हाण, राजाराम बापू पाटील, वसंतदादा पाटील, आनंदराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, बॅ. भोसले, शंकरराव चव्हाण, शरद पवार इ. दिग्गज मराठा नेत्यांमुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला गती मिळत राहिली. आज महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा नेतृत्वाची पिछेहाट झाली असली तरी मराठा वर्चस्वाचा अंत अजूनही झालेला नाही. असे दिसून येते.

३) महाराष्ट्रातील दलित राजकारण –

संपूर्ण भारतात व महाराष्ट्रातदेखील डॉ. आंबेडकरांच्या लेखन व राजकीय नेतृत्वामुळे व दलित साम्राज्याच्या राजकारणाला दिशा व गती मिळाली. सर्व दलितांनी एकत्र येवून राजकीय अधिकार मिळविले पाहिजे यावर डॉ. आंबेडकरांनी सुरुवातीपासूनच भर दिला. त्यानंतर त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' ही संघटना आणि 'मूकनायक' हे वर्तमानपत्र काढले. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना

देखील केली. तसेच त्यांनी आपल्या मृत्युपूर्वीच रिपब्लिकन पक्षाच्या निर्मितीचा आराखडा तयार केला होता. परंतु कालांतराने खंबीर राजकीय नेतृत्व, राजकीय ध्येयधोरण व कार्यक्रम आणि इतर राजकीय पक्षांशी करावयाचे सहकार्य या मुद्द्यांवरुन मतभेद होवून रिपब्लिकन पक्षात फूट पडत गेली. त्यामुळे दलित समाजाचे राजकारण करण्यात या पक्षाला अपयश आले.

४) महाराष्ट्रातील इतर मागास जातींचे राजकारण –

उत्तर भारतात मंडळ आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीवरुन १९८७-८८ नंतर देशाच्या राजकारणात मागास जातीच्या राजकारणाला वेग आला. महाराष्ट्रात मराठा जातीला आव्हान देऊ शकेल अशी जात आढळत नव्हती. यावेळी बिगर मराठा जातींनी एकत्र येऊन राजकारण करावे. अर्थातच ही भूमिका इतर मागास जातींना घ्यावी लागणे अपरिहार्य होते. १९८५ नंतर महाराष्ट्रांच्या राजकारणात माळी, धनगर आणि वंजारी जातींमध्ये राजकीय महत्त्वाकांक्षा निर्माण झाली.

## पुणे शहर विधानसभा मतदारसंघातील जातीचे राजकारण

महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रमुख पक्षांनी मतदारसंघातील जातीच्या राजकारणाला प्राधान्य देऊनच उमेदवारीचे वाटप केले होते. पुणे शहरातील आठही मतदारसंघात मराठा, ब्राह्मण, माळी, नवबौद्ध, मातंग या जातींची गणित जुळवूनच उमेदवारीचे वाटप केले. पुणे महानगर झाल्याने येथे विविध जातीधर्माचे, भाषांचे लोक राहत आहेत. मात्र शहराच्या राजकारणावर मराठा, ब्राह्मण समाजाचे नेहमी वर्चस्व राहिले आहे. याच वर्चस्वातून, तसेच नात्यातील लोक, नातीगोती, जातीच्या मतदारांची संख्या, उमेदवारांची आर्थिक स्थिती यांचा विचार करुनच उमेदवारीचे वाटप झाले होते.

हडपसर मतदारसंघ –

हडपसर या मतदारसंघात मराठा व माळी या दोन समाजाच्या उमेदवारांना कायमच प्राधान्य दिल्याचा आजवरचा इतिहास आहे. यावेळी सर्वच प्रमुख पक्षांनी जातीचे गणित डोळ्यासमोर ठेवूनच उमेदवारीचे वाटप केल्याचे दिसते. शिवसेनेचे विद्यमान आमदार महादेव बाबर हे मराठा समाजाचे असल्याने काँग्रेसने येथे बाळासाहेब शिवरकर या माळी समाजाच्या नेत्यास उमेदवारी दिली. काँग्रेस कोणाला उमेदवारी देणार यावर राष्ट्रवादीचे गणित ठरणार होते. त्यामुळे चेतन तुपे आणि माजी महापौर वैशाली बनकर यांच्यात अखेरच्या क्षणापर्यंत चढाओढ होती. काँग्रेसने शिवरकर यांना उमेदवारी जाहीर करताच तुपे यांचे नाव 'राष्ट्रवादी' ने निश्चित केले. भाजपनेही जातीचे गणित जुळवत योगेश टिळेकर यांना उमेदवारी देत शिवसेनेला शह देण्याचा प्रयत्न केला.

कोथरुड मतदारसंघ –

कोथरूड मतदारसंघ युतीत शिवसेनेकडे होता. पण भाजपच्या परंपरागत मतदार विशेषत: ब्राम्हण मतदार या मतदारसंघात असल्याने हा मतदारसंघ मिळावा. यासाठी भाजपने सतत प्रयत्न केल्याचे दिसून येते. युती तुटल्याने भाजपने प्रा. मेधा कुलकर्णी या नव्या ब्राम्हण चेहऱ्याला संधी दिली. शिवसेनेचा उमेदवार मराठा असल्याने काँग्रेस आणि राष्ट्रवादीने मराठा उमेदवारास प्राधान्य दिले.

कसबा मतदारसंघ –

कसबा मतदारसंघातही ब्राम्हणविरुद्ध मराठा अशा लढतीचे प्रयोग अनेकदा झाले. त्यात भाजपचे गिरीश बापट यशस्वी ठरले. ही बाब लक्षात आल्याने काँग्रेसने रोहित टिळक या ब्राम्हण चेहऱ्यास रिंगणात उतरविले भाजप, काँग्रेसने ब्राम्हण उमेदवार दिल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने माजी उपमहापौर दीपक मानकर या मराठा उमेदवारास काँग्रेसमधून बोलावून तिकीट दिले.

शिवाजीनगर मतदारसंघ –

शिवाजीनगरमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसने मराठा उमेदवार दिल्याने भाजपनेही मराठा उमेदवारालाच प्राधान्य दिले, तर शिवसेनेच्या वतीने जाणीवपूर्वक मिलींद एकबोटे या ब्राम्हण चेहऱ्यास रिंगणात उतरविले होते. तर मनसेने ओबीसी चेहऱ्याला संधी दिली होती.

पर्वती मतदारसंघ –

पर्वती मतदारसंघ २००९ मध्ये सर्वसाधारण झाल्याने येथील बहुजन समाजाचे उमेदवार मोठ्या संख्येने पुढे आले. भाजपने माधुरी मिसाळ यांना उमेदवारी दिल्याने मातंग, नवबौद्ध तसेच इतर दलित समाजाची मते लक्षात घेऊन सचिन तावरे यांना शिवसेनेच्या वतीने तर जयराज लांडगे यांना मनसेच्या वतीने उमेदवारी देण्यात आली. या मतदारसंघात जैन–मारवाडी–अग्रवाल–माहेश्वरी समाजाच्या मतदारांची संख्या ७५ हजारांवर आहे. सध्या बहुसंख्य भाजपकडे वळलेल्या या मतदारांना आपलेसे करण्यासाठी काँग्रेसने अभय छाजेड यांना उमेदवारी दिली.

खडकवासला मतदारसंघ –

खडकवासला मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर नाती–गोती व जुन्या घराण्यांचा प्रभाव आहे. भाजपने भीमराव तापकीर यांना उमेदवारी दिल्याने 'राष्ट्रवादी'ने मराठा समाजाचेच दिलीप बराटे यांना संधी दिली. मनसेने राजाभाऊ लायगुडे तर काँग्रेसने श्रीरंग चव्हाण–पाटील यांना उमेदवारी देत हेच नात्यागोत्याचे राजकारण जपण्याचा प्रयत्न केला.

पुणे कॅन्टोंन्मेंट मतदारसंघ –

पुणे कॅन्टोंमेन्ट या राखीव मतदारसंघातही मातंग आणि नवबौद्ध या जातीच्या गणितांवर उमेदवारी ठरविण्यात आली. रमेश बागवे मातंग समाजाचे असल्याने भाजपने माजी मंत्री दिलीप कांबळे यांना उमेदवारी दिली; तर शिवसेनेने उमेदवार आयात करीत नवबौद्ध असणाऱ्या परशुराम वाडेकर यांना पक्षाच्या वतीने संधी दिली. रिपब्लिकन पक्षाने नवनाथ कांबळे यांना तर मनसेने अजय तायडे यांना रिंगणात उतरविले आहे.

पुण्यात मुस्लिम समाजाला कोणत्याच पक्षाने स्थान दिले नाही ही बाब हेरून 'राष्ट्रवादी' ने हीना मोमिन यांना उमेदवारी देऊन या समाजाला खेचण्याचा प्रयत्न केला.

१३ वी विधानसभा निवडणूक, अनुषंगाने पुणे शहरातील मतदारसंघावर उमेदवार निवड प्रक्रियेवर जातीचा प्रभाव असलेला दिसून येतो. मराठा व ब्राह्मण समाजातील उमेदवारांना पक्षांनी पसंती दिली असल्याचे पहावयास मिळते.

## ४.८ निवडणूक यंत्रणा

२०१४ विधानसभा निवडणूकीसाठी निवडणूक आयोगाने खालील योजना राबविल्या. मतदारांमध्ये जनजागृती करण्याबरोबरच नवमतदारांकडून 'आम्ही मतदान करणार', अशी शपथ घेण्याचा कार्यक्रम निवडणूक आयोगाकडून कॉलेज कॅम्पसवर हाती घेण्यात आला होता.

### मतदान केंद्रे –

पुणे शहर विधानसभा निवडणूक – २०१४ साठी एकूण – सात हजार ४७५ मतदान केंद्रे तयार करण्यात आली होती.

### मतदारांना घरपोच स्लिपा :–

२०१४ विधानसभा निवडणुकीत मतदान करण्यासाठी मतदारांना घरोघरी स्लिपा पोचविण्याचे काम करण्यात आले. ११ ऑक्टोबरपर्यंत २०१४ ला मतदारांच्या घरोघरी जाऊन स्लिप दिल्या त्यानंतर १२ ऑक्टोबरला एक दिवस मतदान केंद्रावर स्लिप उपलब्ध करून दिल्या गेल्या. विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी पुणे शहर व जिल्ह्यातील २१ मतदारसंघांतील जिल्हा निवडणूक यंत्रणा सज्ज झाली होती. ३०८ उमेदवार रिंगणात होते. सात हजार ४७५ मतदान केंद्रे होती. १३ हजार ऑक्टोबर २०१४ पोलिसांचा बंदोबस्त आणि सुमारे ४५ हजार अधिकारी–कर्मचारी यांनी यंत्रणेत काम केले. बुधवारी (ता. १५) रोजी सकाळी सात ते सायंकाळी सहा या वेळेत मतदान झाले. शहर व जिल्ह्यात २८० मतदान केंद्रे संवेदशील होती.

भरारी पथके, तसेच पोलिसांच्या तपासणीत आठ कोटी ६५ लाख ३२ हजार ७७० रुपये जप्त करण्यात आले. खातरजमेनंतर पाच कोटी २२ लाख ६३ हजार ५०० रुपये संबंधितांना देण्यात आले.

### आदर्श मतदान केंद्र

प्रत्येक विधानसभा मतदारसंघात एक आदर्श मतदान केंद्र तयार करण्यात आले होते. निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार लोकसभा निवडणुकीपासून अशा प्रकारे प्रयत्न करण्यात येत होते. रांगोळी, पारंपरिक वाद्य, तसेच फूल देऊन मतदारांचे स्वागत केले गेले. शहरातील १५२ मतदान केंद्रे पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावर आहेत. या ठिकाणी ज्येष्ठांच्या मदतीसाठी एक हजार १८८ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती.

**विशेष भरारी पथकांची स्थापना –**

निवडणुकीत पैशांचे वाटप व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी विशेष काळजी घेण्यात आली. स्थानिक पोलिस, प्राप्तिकर विभाग, उत्पादन शुल्क विभाग या सर्वांच्या स्वतंत्र टीम स्थापन केल्या होत्या. भरारी पथकांच्या माध्यमातून विशेष लक्ष ठेवण्यात येत होते.

**व्होटर स्लिप मतदान केंद्रावर –**

ज्या मतदारांना व्होटर स्लिप मिळाल्या नाहीत त्यांच्यासाठी मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राबाहेर त्या देण्याची व्यवस्था केली होती. जास्तीत जास्त मतदारांपर्यंत स्लिप पोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत होता.

## मतदारसंघामधील स्लिप वाटप (टक्के)

| मतदार संघ | शेकडेवारी |
|---|---|
| वडगाव शेरी | ६०.२४% |
| शिवाजीनगर | ७२.३५% |
| कोथरुड | ५०.२९% |
| खडकवासला | ६५.२३% |
| पर्वती | ५१.१८% |
| हडपसर | ५५.२४% |
| पुणे कँटोन्मेंट | ७६.३४% |
| कसबा | ७०.३६% |

**मतदारसंघ निवडणूक अधिकारी व कार्यालये**

पुणे शहरामध्ये २०१४ विधानसभा निवडणूकीमध्ये कार्यरत असणारे निवडणूक अधिकारी व निवडणूक कार्यालये यांचे पत्ते.

१) कसबा पेठ –सोनप्पा यमगर, शहर प्रांताधिकारी, जिल्हा परिषद जुनी इमारत.

२) पुणे कँटोन्मेंट –उत्तम पाटील, भूसंपादन अधिकारी क्र. २६, नवी प्रशासकीय इमारत (२६११११२३९)

३) हडपसर –तुषार ठोंबरे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हा परिषद जुनी इमारत (२६११४८००)

४) पर्वती –ज्योती कदम, जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हा परिषद जुनी इमारत (२६१२३९०७)

५) खडकवासला -स्नेहल बर्गे, हवेली प्रांताधिकारी, क्वीन्स गार्डन रोड, अल्पबचत भवनामागे (२६१२३५२३)
६) शिवाजीनगर -धनाजी पाटील, शहर वितरण अधिकारी कार्यालय, सेंट्रल बिल्डिंग (२६१२३७४३)
७) वडगावशेरी -अण्णासाहेब चव्हाण, क्षेत्रिय आयुक्त क्र. ४ कार्यालय
८) भोसरी -साहेबराव गायकवाड, भूसंपादन अधिकारी क्र. १४, जिल्हा परिषद, जुनी इमारत.
९) पिंपरी -यशवंत माने, सहाय्यक आयुक्त एलबीटी, पिंपरी-चिंचवड महापालिका (२७४२६९६५)
१०) चिंचवड -भानुदास गायकवाड, सहाय्यक आयुक्त करसंकलन, पिंपरी-चिंचवड महापालिका Ref. Systematic Voters Eucation and Electral Participaiton Program.

## ४.९ विधानसभा निवडणूक (१३ वी) अन्वयाने पुणे शहरातील प्रचारयंत्रणा व पुण्यातील खास प्रचारसभा

पुणे शहरातील प्रचार अतिशय प्रभावी होता. सगळीकडे निवडणूकीची धामधूम दिसून येत होती. विविध पक्षांनी स्वत:ची प्रचारगीते बनवून घेतली होती. फेसबुक, व्हॉट्सअपच्या माध्यमातून प्रचार अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविला जात होता, अपप्रचारांचे प्रमाण जवळ जवळ नव्हते. पथनाट्याचाही वापर प्रचारासाठी करण्यात आलेला होता.

या १३ व्या विधानसभेच्या निवडणूकीत भाजपाला यश मिळाले तसेच पुणे शहरातील आठही मतदारसंघावर भाजपचे उमेदवार निवडून आले याला प्रचारसभांचे काही प्रमाणात योगदान मिळाले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पिंपरीत सभा घेवून, डिजिटल इंडिया, स्मार्ट सिटी, मोबाईल गव्हर्नन्स, अनधिकृत बांधकामांचा प्रश्न, सॉलिड वेस्ट प्रकल्प अशा संदर्भात आश्वासने दिली. तसेच हडपसरला घेतलेल्या सभेत भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांनी भाजप उमेदवाराच्या प्रचारादरम्यान सत्तेवर असलेली आघाडी सरकारमधील (काँग्रेस-राष्ट्रवादी) १०१ गैरव्यवहारांची यादी मतदारांसमोर, जनतेसमोर सादर केली. या महत्त्वपूर्ण प्रचारसभांमुळे देखील भाजपाला या निवडणूकीत यश मिळालेलं दिसून येते. या प्रचारसभांमुळे लोकांमध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीबाबत असंतोष वाढवायला मदतच झाली. नरेंद्र मोदींनी पिंपरीत घेतली प्रचारसभा''नागरी विकास योजनेअंतर्गत देशात पाचशे 'स्मार्ट सिटी' उभ्या केल्या जाणार आहेत. त्यात पुणे व पिंपरी चिंचवडचा समावेश केला आहे. या दोन्ही शहरांचा जुळे शहर म्हणून विकास केला जाणार आहे, तसेच डिजीटल इंडिया संकल्पना आम्ही हाती घेतली आहे. माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्राला पूरक अशा 'मोबाईल गव्हर्नन्स' संकल्पनेलाही मूर्त रुप देत आहोत. त्यामुळे येथील आयटी क्षेत्राला चालना मिळून रोजगाराच्या संधी वाढणार आहेत. शहरातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न भाजप सत्तेवर आल्यानंतर सोडविला जाईल, अशी आश्वासने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येथील जाहीर सभेत दिली. पिंपरी येथील 'एचए' मैदानावर पुणे शहर, जिल्हा व पिंपरी चिंचवडच्या भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी ही सभा आयोजित केली होती. कचऱ्यापासून ऊर्जा, इंधन व विटा बनविण्यासारखे 'सॉलिड वेस्ट' प्रकल्प सुरु करण्याचाही आमचा विचार आहे, असे मोदीनी सांगितले.

हडपसरच्या सभेत अमित शहा ''काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात झालेल्या १०१ गैरव्यवहारांची यादी विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे यांनी दिली. हे गैरव्यवहार सुमारे ११.८८ लाख कोटींचे आहेत. एवढे पैसे खाल्ल्यावर आता त्यांना पुन्हा सत्ता हवी आहे.'' अशी जोरदार टीका भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष अमित शहा यांनी केली; तसेच या नेत्यांनी मते मागताना या गैरव्यवहारांची उत्तरेही मतदारांना द्यावीत, अशी मागणीही त्यांनी केली.

भाजपचे हडपसरचे उमेदवार योगेश टिळेकर, पुरंदरच्या उमेदवार संगीता निंबाळकर यांच्या प्रचारासाठी हडपसर येथे शहा यांची प्रचारसभा झाली. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान, खासदार अनिल शिरोळे उपस्थित होते. हडपसर भागातील काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही स्थानिक नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामध्ये स्थायी समितीचे माजी अध्यक्ष दिलीप तुपे, माजी उपमहापौर प्रकाश मंत्री, मंगला मंत्री, दत्तात्रेय ससाणे, सुखदेव गायकवाड, सोपान गोंधळे, अशोक जमदाडे, दिलीप काळे आदींचा समावेश आहे.

शहा म्हणाले, की केंद्रातील आघाडी सरकारने दहा वर्षांत सर्व क्षेत्रांत भ्रष्टाचार केला. त्यांचे गैरव्यवहार सांगण्यास दिवस पुरणार नाही. गेल्या दहा वर्षांत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची वाढलेली संपत्ती बघा. राज्यात गुंडागर्दी वाढली आहे. गुंड राष्ट्रवादी काँग्रेसचेच. साखर कारखाने, सहकारी बँका संपविण्याचे काम त्यांनी केले.

विकासात महाराष्ट्र पूर्वी आघाडीवर होता. आता सर्वच क्षेत्रांत पिछाडीवर गेला आहे. महाराष्ट्राच्या विकासाशिवाय देशाचा विकास होणार नाही. मोदी करीत असलेला विकास काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार महाराष्ट्रात तुमच्यापर्यंत पोचू देणार नाही. चांगल्या मुख्यमंत्र्यांमार्फत ते काम होऊ शकेल. त्यामुळे तुम्ही आपापल्या भागातून भाजपचे उमेदवार निवडून द्यावेत, असे आवाहन शहा यांनी केले.पाणी, गटारे, उड्डाणपूल, कचरा या समस्या सध्या बाजूला ठेवा. सुशासन देणारे प्रामाणिक नेते नसल्याने हे संकट आले आहे. प्रामाणिक नेते आल्यावर या समस्या आपोआप सुटतील. राज्यात भाजपचे नेतृत्व आल्यास, राज्याचा विकास करून महाराष्ट्राचा गौरव पुनर्प्रस्थापित करतील, असे शहा म्हणाले.

विधानसभा निवडणुकांच्या धामधुमीला विविध राजकीय पक्षांच्या प्रचारगीतांनी म्युझीकल तडका दिला. प्रचारगीतांमध्ये तोच तोच पणा नव्हता. सर्वच पक्षांची ही प्रचारगीते मोबाईवरील रिंगटोन्स पासून ते यू ट्यूबपर्यंत आणि प्रचाराच्या रिक्षांपासून ते खाजगी रेडिओ वाहिन्यांवरील जाहिरातींपर्यंत सर्वत्रच ऐकायला मिळत होती. पक्षांनी प्रत्येक उमेदवारांनुसार गाणी तयार करून ती स्पर्धेमध्ये उतरवली होती.

शिवसेनेने आपल्या वेबसाईवरुन आपली प्रचारगीते उपलब्ध करून दिली होती. यामध्ये १) चला उठा महाराष्ट्र घडवूया, २) आम्ही शिवाचे सैनिक वेडे, ३) तेजाचा वारसा आम्हाला, ४) कोट कोट हृदयाचा केवळ एक हृदयसम्राट ही गाणी ऑडिओ स्वरुपामध्ये उपलब्ध होती.

राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या प्रचारगीतांसाठी स्वतंत्र लिंक खुली केली त्यामध्ये एमपीथ्री आणि मोबाईल रिंगटोनसाठी आवश्यक फॉरमॅटमध्ये आपली प्रचारगीते उपलब्ध करून दिली होती. या गाण्यांमध्ये १) मी राष्ट्रवादी, महाराष्ट्रवादी, २) देश हा शिवरायांचा, जोती, शाहू, भीमरावांचा, ३) महाराष्ट्रा तुला मुजरा, राष्ट्रवादीचा आदी गाणी उपलब्ध होती.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपल्या 'सर्वात पुढे महाराष्ट्र माझा, गीताच्या माध्यमातून आपला प्रचार सुरू केला होता.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आपल्या ब्लू-प्रिंटच्या व्हिडिओचे प्रचारगीत म्हणून वापर केला होता. हा व्हिडीओ फेसबुक, व्हॉट्सअपच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचविला गेला होता.

ऑडिओ, व्हिडिओ क्लिप्सचा वापर निवडणूक प्रचारामध्ये करण्यात आला होता. मोबाईल व इंटरनेटचा वापर प्रचारासाठी करण्यात आला. व्हाटस्अप व वुईचॅट यांसारख्या मोफत ॲप्लीकेशनमुळे, ट्विटर व फेसबुक यांसारख्या सोशल मिडिया साईटमुळे मोबाईल टू मोबाईल मेसेज पाठविणे बंद झाले. तरीही पक्षांच्या उमेदवारांकडून 'बल्क मॅसेज' पाठविले जात होते. हे मॅसेज ठरविलेल्या मतदारसंघातील मतदारांनाच पाठविण्यात येत होते.

### विधानसभा निवडणूक काळात अपप्रचार

आक्षेपार्ह मजकूर किंवा छायाचित्र प्रसारित करणाऱ्यांवर सायबर कायद्यानुसार कारवाई होईल. मात्र एखाद्या ग्रुपमधून असा मजकूर प्रसारित झाल्यास संबंधित ग्रुप ॲडमिनलाही जबाबदार धरले जावू शकते. असे पुणे शहराचे पोलिस आयुक्त राजेश बनसोडे, आर्थिक व सायबर गुन्हे शाखा यांनी सांगितल्यामुळे राजकारण्यांबद्दल अवमानकारक मजकूर प्रसारित करण्याचे प्रमाण जवळजवळ नव्हते. त्यामुळे अपप्रचाराचे प्रमाण नव्हतेच. प्रचारासाठी 'पथनाट्य'चाही वापर करण्यात आला होता. काही पक्षांनी व्यावसायिक पथनाट्य सादर करणाऱ्या पथकांना बोलाविले होते. पक्षाची माहिती, जाहिरनामा, उमेदवारांची ओळख, स्थानिक प्रश्न अशी माहिती पथकाला दिली गेली होती. त्यामधील कलाकारांनी त्याप्रमाणे संहिता, संवाद लिहिला होता. त्यासाठी व्यावसायिक, पथकासाठी १० ते २० हजार रुपये मोजले जात होते.

'अहो भाऊ जरा जपून मतदान करा बरं का! असा संवाद पथनाट्याद्वारे साधत कार्यकर्ते मतदारांचे लक्ष वेधत होते. तसेच प्रत्येक मतदारसंघात रॅलीद्वारेही प्रचार केला गेला.

## ४.१० – पुणे शहरातील विधानसभा मतदारसंघांच्या मागील वर्षीच्या निवडणूकीचा आढावा

या प्रकरणामध्ये पुणे शहरातील विधानसभेच्या मतदारसंघाचा मागील वर्षीच्या निवडणूकांचा आढावा घेण्यात आलेला आहे. विधानसभा निवडणूकांचा संपूर्ण आढावा घेत असताना, निवडणुकीचे वर्ष, प्रभागाचे नाव, विजेता उमेदवार, लिंग, पार्टी (पक्ष), त्यांनी मिळविलेली मते, उपविजेता त्यांची मते, लिंग इत्यादी संदर्भात सविस्तर विश्लेषण करण्यात आलेले आहे. ते खालीलप्रमाणे

### वडगावशेरी

मागील २००९ या वर्षीच्या निवडणुकीमध्ये बापुसाहेब पठारे हे उमेदवार निवडून आले. ते राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाचे उमेदवार आहेत. त्यांना एकूण ७२०३४ मते मिळाली होती. त्यांच्या

खालोखाल मतसंख्या असणारे शिवसेनेचे उमेदवार भोसले अजय जयवंत हे होते. ते शिवसेना या पक्षाचे नेते होते. त्यांना एकूण ३८९१८ एवढी मते मिळाली.

वडगाव शेरी

| वर्ष | प्रभागाचे नाव | जात | विजेता | लिंग | पार्टी | मते | उपविजेते | लिंग | पार्टी | मते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१४ | वडगाव शेरी | जनरल | जगदिश तुकाराम मुळीक | पु. | भाजपा | ६६९०८ | टिंगरे सुनिल वि. | पु. | शिवसेना | ६१५८३ |
| २००९ | वडगाव शेरी | जनरल | बापुसाहेब तु. पठारे | पु. | रा. कॉं. | ७२०३४ | भोसले अजय जयवंत | पु. | शिवसेना | ३८९१८ |

## पर्वती मतदारसंघ निवडणूकांचा आढावा

पर्वती मतदारसंघाच्या मागील निवडणूकांच्या निवडणूकीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की २००९ साली भाजपच्या, स्त्री उमेदवार माधुरी मिसाळ या ६४९५९ एवढ्या मतसंख्येने निवडून आल्या. त्या निवडणूकीत उपविजेते म्हणून राष्ट्रवादीचे तावरे सचिन शाम ४६७४३ मतांनी उपविजेते ठरले.

तसेच पर्वती मतदारसंघातून २००४ साली ज्या निवडणुका झाल्या त्यामध्ये एस.सी. वर्गातील बागवे रमेश आनंदराव हे कॉंग्रेस या पक्षाचे उमेदवार ९६८५३ मतांनी विजयी ठरले होते. उपविजेते म्हणून भाजपचे गांगुर्डे विश्वास हे उमेदवार ७०१७९ इतक्या मतांनी विजयी झाले.

१९९९ च्या निवडणुकीमधे पर्वती मतदारसंघातून गांगुर्डे विश्वास हे भाजपचे उमेदवार ६६६४६ मतांनी निवडून आले. तसेच बागवे रमेश हे कॉंग्रेसचे उमेदवार ६३३०४ एवढ्या मतांनी उपविजेते ठरले.

१९९५ च्या पर्वती मतदारसंघामधील निवडणूकीत कांबळे दिलीप हे भाजपचे उमेदवार ८२७९२ एवढ्या मतांनी विजयी ठरले. तसेच शरद रणपिसे हे कॉंग्रेसचे उमेदवार उपविजयी ठरले.

१९९० साली रणपिसे शरद हे कॉंग्रेसचे उमेदवार ६६८६५ एवढ्या मतांनी विजयी ठरले. तर गांगुर्डे विश्वास हे भाजपचे उमेदवार ५६५३० एवढ्या मतांनी उपविजेते ठरले.

१९८५ साली पर्वती मतदारसंघातून कॉंग्रेसचे उमेदवार रणपिसे शरद हे ४२८३६ मतांनी विजयी ठरले. तर गांगुर्डे विश्वास हे भाजपचे उमेदवार ३४५१७ एवढ्या मतांनी उपविजेते ठरले.

१९८० च्या निवडणुकांचा आढावा घेतला असता चव्हाण वसंत हे कॉंग्रेसचे उमेदवार ३६२३३ मतांनी विजयी ठरले तर गांगुर्डे विश्वास हे भाजपचे उमेदवार २२८८० मतांनी उपविजेते ठरले.

१९७८ च्या निवडणूकीत सुभाष सर्वगौड हे जे एन पी चे उमेदवार ३९५०४ एवढ्या मतांनी विजयी ठरले. तर मात्र शंकरराव हे कॉंग्रेसचे उमेदवार २१७४८ एवढ्या मतांनी उपविजेता ठरले.

पर्वती

| वर्ष | प्रभाग क्र. | प्रभागाचे नाव | जात | विजेता | लिंग | पार्टी | मते | उपविजेते | लिंग | पार्टी | मते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१४ | २१२ | पर्वती | जनरल | मिसाळ माधुरी सतिश | स्त्री | भाजप | ९५५८३ | तावरे सचिन शाम | पु. | शिवसेन | २६४९३ |
| २००९ | २१२ | पर्वती | जनरल | मिसाळ माधुरी सतिश | स्त्री | भाजप | ६४९५९ | तावरे सचिन शाम | पु. | रा.कॉं. | ४६७४३ |
| २००४ | २४८ | पर्वती | (एससी) | बागवे रमेश आनंदराव | पु. | कॉंग्रेस | ९६८५३ | गांगुर्डे विश्वास कृ. | पु. | भाजप | ७०१७९ |
| १९९९ | २४८ | पर्वती | (एससी) | गांगुर्डे विश्वास कृ. | पु. | भाजप | ६६६४६ | बागवे रमेश आनंदराव | पु. | कॉंग्रेस | ६३३०४ |
| १९९५ | २४८ | पर्वती | (एससी) | कांबळे दिलीप ज्ञानदेव | पु. | भाजप | ८२७९२ | शरद रणपिसे | पु. | कॉंग्रेस | ६००८७ |
| १९९० | २४८ | पर्वती | (एससी) | रणपिसे शरद नामदेव | पु. | कॉंग्रेस | ६६८६५ | गांगुर्डे विश्वास कृ. | पु. | भाजप | ५६५३० |
| १९८५ | २४८ | पर्वती | (एससी) | रणपिसे शरद नामदेव | पु. | कॉंग्रेस | ४२८३६ | गांगुर्डे विश्वास कृ. | पु. | भाजप | ३४५१७ |
| १९८० | २४८ | पर्वती | (एससी) | चव्हाण वसंत छोटेलाल | पु. | कॉंग्रेस | ३६२३३ | गांगुर्डे विश्वास कृ. | पु. | भाजप | २२८८० |
| १९७८ | २४८ | पर्वती | (एससी) | सुभाष सर्वगौड | पु. | जेएनपी | ३९५०४ | मात्रे शंकरराव गो. | पु. | कॉंग्रेस | २१७४८ |

## सारांश

१९७८ पासून ते २०१४ च्या पर्वती मतदारसंघामधील विधानसभा निवडणूकांच्या आढावा घेतला असता असे दिसून येते की पर्वती मतदारसंघावर भाजप व कॉंग्रेस या पक्षांचे प्रभुत्व आहे. तसेच सर्वात जास्त वेळा एससी उमेदवार या मतदारसंघातून निवडून आलेले आहेत.

## कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाच्या मागील वर्षीच्या निवडणूकीचा आढावा

१९६२ साली विधानसभेच्या निवडणूका झाल्या त्यामधे नारायणराव सणस हे काँग्रेस या पक्षाचे उमेदवार २७१३५एवढ्या मतांनी निवडून आले होते. तसेच उडानसिंग परदेशी हे आयएनडी या पक्षाचे उमेदवार १०७१० मतांनी उपविजेते ठरले.

१९६७ साली आर.व्ही. तेलंग हे काँग्रेस या पक्षाचे उमेदवार २२५६७ एवढ्या मतांनी विजयी ठरले तसेच आर.पी. बडके हे एसएसपी या पक्षाचे उमेदवार १८३९८ एवढ्या मतांनी उपविजेते ठरले.

१९७२ च्या निवडणूकीत लिलाबा मर्चंट हे काँग्रेस या पक्षाचे उमेदवार २३५८६ एवढ्या मतांनी विजयी ठरले तसेच रामभाऊ वडके हे सओपी या पक्षाचे उमेदवार ८९८७ एवढ्या मतांनी उपविजेते ठरले.

१९७८ च्या निवडणूकीत अरविंद लेले भारतीय जनता पार्टीचे उमेदवार ५२१९० एवढ्या मतांनी विजयी ठरले तसेच उल्हास शेडगे हे काँग्रेस या पक्षाचे उमेदवार २८४१० एवढ्या मतांनी उपविजेते ठरलेले आहेत.

१९८० च्या निवडणूकीत पुन्हा एकदा अरविंद लेले हे भाजप या पक्षाचे उमेदवार २८८५१ एवढ्या मतांनी निवडून आलेले आहेत. तसेच ढेरे प्रकारश केशवराव हे काँग्रेस या पक्षाचे उमेदवार २५२४९ एवढ्या मतांनी उपविजेते ठरलेले आहेत.

१९८५ च्या निवडणूकीचा विचार करता उल्हास नथोबा काळोखे हे काँग्रेस या पक्षाचे उमेदवार ५५८८८ एवढ्या प्रचंड मतांनी निवडून आले तर अरविंद लेले भाजपा या पक्षोचे ३१३२१ एवढ्या मतांनी उपविजयी ठरलेले दिसतात.

१९९० च्या निवडणूकींचा आढावा घेतला असता अण्णा जोशी हे भाजपाचे उमेदवार ४९१५२ एवढ्या मतांनी निवडून झालेले दिसतात तर शांतीलाल सुरतवाला हे काँग्रेसचे उमेदवार ४२०७५ एवढ्या मतांनी उपविजयी ठरलेले दिसतात.

१९९१ च्या विधानसभेच्या निवडणूकीत टि.व्ही विठोबा हे काँग्रेसचे उमेदवार ३७१०० एवढ्या मतांनी निवडून आले तर गिरीष बापट हे भाजपचे उमेदवार ३१७७५ एवढ्या मतांनी उपविजेते ठरले.

१९९५ च्या विधानसभेच्या निवडणूकीमध्ये गिरीष बापट हे भाजपचे उमेदवार ५३०४३ एवढ्या मतांनी निवडून आले. तसेच सतिश देसाई हे काँग्रेसचे उमेदवार ३२२८३ एवढ्या मतांनी उपविजेते ठरले.

१९९९ सालच्या विधानसभेच्या निवडणूकीत गिरीष बापट हे भाजपचे उमेदवार ३९४१९ एवढ्या मतांनी निवडणून आलेले आहेत तर त्यांच्या विरोधात उभे असलेले काँग्रेसचे उमेदवार अण्णा थोरात हे १९२५१ मतांनी उपविजेते ठरलेले आहेत.

२००४ सालच्या विधानसभेच्या निवडणूकीत गिरीष बापट हे भाजपचे उमेदवार ३८१८० मतांनी निवडून आले अण्णा थोरात हे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार २८५४२ मतांनी उपविजयी ठरले.

२०१४ सालीच्या निवडणूकी त गिरीष बापट हे भाजपचे उमेदवार ७३५९४ एवढ्या प्रचंड मतांनी निवडून आलेले दिसतात. तर उपविजेते काँग्रेसचे रोहित टिळक हे ३१३२२ एवढ्या मतांनी उपविजेते ठरलेले दिसतात.

कसबापेठ

| वर्ष | प्रभाग क्र. | प्रभागाचे नाव | जात | विजेता | लिंग | पार्टी | मते | उपविजेते | लिंग | पार्टी | मते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१४ | २१५ | कसबा पेठ | जनरल | बापट गिरीष भालचंद्र | पु. | भाजपा | ७३५९४ | डॉ. रोहित टिळक | पु. | काँग्रेस | ३१३२२ |
| २००९ | २१५ | कसबा पेठ | जनरल | बापट गिरीष भालचंद्र | पु. | भाजपा | ५४९८२ | धंगेकर रविंद्र | पु. | मनसे | ४६८२० |
| २००४ | २४९ | कसबा पेठ | जनरल | बापट गिरीष भालचंद्र | पु. | भाजपा | ३८१६० | अण्णा थोरात | पु. | रा.काँ. | २८५४२ |
| १९९९ | २४९ | कसबा पेठ | जनरल | बापट गिरीष भालचंद्र | पु. | भाजपा | ३९४१९ | अण्णा थोरात | पु. | काँग्रेस | १९२५१ |
| १९९५ | २४९ | कसबा पेठ | जनरल | बापट गिरीष भालचंद्र | पु. | भाजपा | ५३०४३ | सतीश देसाई | पु. | काँग्रेस | ३२२८३ |
| १९९१ | ० | कसबा पेठ | जनरल | टि. व्ही. विठोबा | पु. | काँग्रेस | ३७१०० | बापट गिरीष भालचंद्र | पु. | भाजपा | ३१७७५ |
| १९९० | २४९ | कसबा पेठ | जनरल | अण्णा जोशी | पु. | भाजपा | ४९१५२ | शांतीलाल सुरतवाला | पु. | काँग्रेस | ४२०७५ |
| १९८५ | २४९ | कसबा पेठ | जनरल | उल्हास नथोबा काळोखे | पु. | काँग्रेस | ३५५८८ | अरविंद लेले | पु. | भाजपा | ३१३२१ |
| १९८० | २४९ | कसबा पेठ | जनरल | अरविंद लेले | पु. | भाजपा | २८८५१ | ढेरे प्रकाश केशवराव | पु. | काँग्रेस | २५२४९ |
| १९७८ | २४९ | कसबा पेठ | जनरल | अरविंद लेले | पु. | जनता | ५२१९० | उल्हास शेडगे | पु. | काँग्रेस | २८४१० |
| १९७२ | २३१ | कसबा पेठ | जनरल | लिलाबा मर्चंट | पु. | काँग्रेस | २३५८६ | रामभाऊ वडके | पु. | सओपी | ८९८७ |
| १९६७ | २३१ | कसबा पेठ | जनरल | आर.व्ही. तेलंग | पु. | काँग्रेस | २२५६७ | आर.पी.वडके | पु. | एसएसपी | १८३९८ |
| १९६२ | ४५ | कसबा पेठ | जनरल | नारायणराव सणस | पु. | काँग्रेस | २७१३५ | उडानसिंग परदेशी | पु. | आयएनडी | १०७१० |

## सारांश

वरील १९६२ पासून २०१४ सालापर्यंतच्या निवडणूकांचा आढावा घेतला असता असे दिसून येते की कसबा पेठ विधानसभा मतदारसंघावर भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. तसेच १९९५ पासून २०१४ पर्यंतच्या निवडणूकीमध्ये गिरीष बापट हे भाजपचे उमेदवार पाच वेळा निवडून आलेले दिसून येतात.

## शिवाजीनगर मतदारसंघातील १९६२ पासून ते २०१४ पर्यंतच्या निवडणूकींचा आढावा

१९६२ साली सदाशिव बर्वे हे निवडणूकीत ३०३०६ मतांनी विजयी झालेले आहेत. १९६७ साली बी.डी. किल्लेदार हे २३५०९ एवढ्या मतांनी विजयी झालेले दिसून येतात. १९७२ – रविंद्र मोरे काँग्रेस या पक्षाचे ३४८६२ मतांनी निवडून आले. १९७८ – शांती नाईक या जनता पक्षाच्या उमेदवार ४८६९६ मतांनी निवडून आल्या. १९८० मध्ये अण्णा जोशी हे भाजपचे उमेदवार २६२७३ मतांनी निवडून आले. १९८५ मध्ये अण्णा जोशी हे भाजपचे उमेदवार ४८९६९ एवढ्या मतांनी निवडून आलेले दिसतात. १९९० साली शशिकांत सुतार हे शिवसेना या पक्षाचे उमेदवार ७७२९७ एवढ्या मतांनी निवडून आले. १९९५ साली शशिकांत सुतार हे शिवसेना पक्षाचे उमेदवार १०२४०९ एवढ्या मतांनी निवडून आले. १९९९ साली शांतीलाल सुरतवाला हे शिवसेना या पक्षाचे उमेदवार ६७९७९ एवढ्या मतांनी निवडून आले. २००४ सालच्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये विनायक निम्हण हे शिवसेनेचे उमेदवार ११४७१३ एवढ्या मतांनी निवडून आले. २००९ च्या निवडणुकीत शिवाजीनगर मतदारसंघातून विनायक निम्हण हे काँग्रेस या पक्षाचे उमेदवार ५०९१८ मतांनी निवडून आले. २०१४ सालच्या विधानसभा निवडणूकीत विजय काळे हे भाजप पक्षाचे उमेदवार ५६४६० मतांनी निवडून आले.

शिवाजीनगर मतदारसंघ

| वर्ष | प्रभाग क्र. | प्रभागाचे नाव | जात | विजेता | लिंग | पार्टी | मते | उपविजेते | लिंग | पार्टी | मते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१४ | २०९ | शिवाजीनगर | जनरल | विजय काळे | पु. | भाजप | ५६४६० | निम्हण विनायक म. | पु. | काँग्रेस | ३४४१३ |
| २००९ | २०९ | शिवाजीनगर | जनरल | निम्हण विनायक म. | पु. | काँग्रेस | ५०९१८ | प्रो. विकास मठकरी | पु. | भाजपा | ३०३८८ |
| २००४ | २४७ | शिवाजीनगर | जनरल | निम्हण विनायक म. | पु. | शिवसेना | ११४७१३ | अनिल शि. भोसले | पु. | रा.काँ. | ७६५३२ |
| १९९९ | २४७ | शिवाजीनगर | जनरल | शांतीलाल सुरतवाला | पु. | शिवसेना | ६७९७९ | अंकुश काकडे | पु. | रा.काँ. | ५०८४२ |
| १९९५ | २४७ | शिवाजीनगर | जनरल | सुतार शशिकांतराव | पु. | शिवसेना | १०२४०९ | ॲ. वंदना चव्हाण | स्त्री. | काँग्रेस | ७८११९ |
| १९९० | २४७ | शिवाजीनगर | जनरल | सुतार शशिकांतराव | पु. | शिवसेना | ७७२९७ | अंकुश काकडे | पु. | काँग्रेस | ६७६३७ |
| १९८५ | २४७ | शिवाजीनगर | जनरल | अण्णा जोशी | पु. | भाजप | ४८९६९ | श्रीधर माडगुळकर | पु. | काँग्रेस | ४८८५८ |
| १९८० | २४७ | शिवाजीनगर | जनरल | अण्णा जोशी | पु. | भाजप | २६२७३ | श्रीधर माडगुळकर | पु. | काँग्रेस | २५५०० |
| १९७८ | २४७ | शिवाजीनगर | जनरल | नाईक शांती नारायण | स्त्री. | जनतापक्ष | ४८६९६ | सुरेश कलमाडी | पु. | काँग्रेस | ३६३९३ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७२ | २३४ | शिवाजीनगर | जनरल | रविंद्र मोरे | पु. | कॉंग्रेस | ३४८६२ | किल्लेदार बी.डी. | पु. | पीडब्यूपी | १५२२६ |
| १९६७ | २३४ | शिवाजीनगर | जनरल | बी. डी. किल्लेदार | पु. | पीडब्यूपी | २३५०९ | एन.आर.माटे | पु. | कॉंग्रेस | १५७४७ |
| १९६२ | ४६ | शिवाजीनगर | जनरल | सदाशिव गोविंद बर्वे | पु. | कचँग्रजत्र | ३०३०६ | रमेशचंद्र म्हाळगी | पु. | जेएस | १४७२३ |

## सारांश

१९६२ पासून २०१४ सालच्या विधानसभेच्या निवडणूकांचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, शिवाजीनगर मतदारसंघावर भाजप व शिवसेना या पक्षांचे प्रभुत्व असल्याचे दिसून येते.

## हडपसर मतदारसंघातील मागील वर्षीच्या निवडणूकीचा आढावा

२००९ साली या मतदारसंघामधून महादेव बाबर हे शिवसेना या पक्षाचे उमेदवार ६५५१७ एवढ्या मतांनी निवडून आले.

हडपसर

| वर्ष | प्रभाग क्र. | प्रभागाचे नाव | जात | विजेता | लिंग | पार्टी | मते | उपविजेते | लिंग | पार्टी | मते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१४ | २१३ | हडपसर | जनरल | टिळेकर योगेश कुं. | पु. | भाजपा | ८२६२९ | बाबर महादेव रामचंद्र | पु. | शिवसेना | ५२३८१ |
| २००९ | २१३ | हडपसर | जनरल | बाबर महादेव रामचंद्र | पु. | शिवसेना | ६५५१७ | शिवरकर चंद्रकांत विठ्ठल | पु. | शिवसेना | ५५२०८ |

## कोथरूड मतदारसंघातील मागील वर्षीच्या निवडणूकीचा आढावा

२००९ सालच्या विधानसभेच्या निवडणूकांचा आढावा घेतला असता. चंद्रकांत मोकाटे हे शिवसेनेचे उमेदवार ५२०५५ एवढ्या मतांनी निवडून आले.

कोथरुड

| वर्ष | प्रभाग क्र. | प्रभागाचे नाव | जात | विजेता | लिंग | पार्टी | मते | उपविजेते | लिंग | पार्टी | मते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१४ | २१० | कोथरुड | जनरल | कुलकर्णी मेधा विश्राम | पु. | भाजपा | १००९४१ | चंद्रकांत ब. मोकाटे | पु. | शिवसेना | ३६२७९ |
| २००९ | २१० | कोथरुड | जनरल | चंद्रकांत ब. मोकाटे | पु. | शिवसेना | ५२०५५ | ॲ. किशोर ना. शिंदे | पु. | मनसे | ४४८४३ |

**पुणे कॅन्टोंमेंटच्या मागील वर्षीच्या निवडणूकीचा आढावा घेताना असे दिसून येते की**

१९६२ च्या विधानसभेच्या निवडणूकीत कृष्णराव गिरमे हे काँग्रेसचे उमेदवार १७५०९ मतांनी निवडून आले. १९६७ साली कृष्णराव गिरमे हे काँग्रेसचे उमेदवार १४९२४ मतांनी निवडून आले. १९७२ साली शिवाजीराव ढेरे हे काँग्रेसचे उमेदवार ३०६६१ एवढ्या मतांनी निवडून आले. १९७८ साली विठ्ठल तुपे हे ३४७३७ एवढ्या मतांनी निवडून आले. १९८० साली विठ्ठल तुपे हे २७८६० मतांनी निवडून आले. १९८५ विठ्ठल तुपे ४४९९७ हे निवडून आले. १९९० साली चंद्रकांत शिवरकर हे काँग्रेस या पक्षाचे उमेदवार ७१७८९ एवढ्या मतांनी निवडून आले. १९९५ साली अप्पा लोणकर हे शिवसेना या पक्षाचे उमेदवार ७८००० एवढ्या मतांनी निवडून आले. १९९९ साली चंद्रकांत शिवरकर हे काँग्रेस शिवसेना या पक्षाचे उमेदवार निवडून आले. २००९ साली रमेश बागवे हे काँग्रेस या पक्षाचे उमेदवार ६५६३८ एवढ्या मतांनी निवडून आले. २०१४ सालीच्या विधानसभेच्या निवडणूकीत दिलीप कांबळे हे भाजपाचे उमेदवार ५४६९२ एवढ्या मतांनी निवडून आले. १९६२ ते २०१४ पर्यंतच्या निवडणुकीचा आढावा घेतला असता असे दिसून येते की या मतदारसंघावर काँग्रेस या पक्षाचे प्रभुत्व असलेले दिसून येते.

पुणे कॅन्टोन्मेंट

| वर्ष | प्रभाग क्र. | प्रभागाचे नाव | जात | विजेता | लिंग | पार्टी | मते | उपविजेते | लिंग | पार्टी | मते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१४ | २१४ | पुणे कॉन्टोमेन्ट | जनरल | दिलीप कांबळे | पु. | भाजपा | ५४६९२ | बागवे रमेश आ. | पु. | काँग्रेस | ३९७३७ |
| २००९ | २१४ | पुणे कॉन्टोमेन्ट | जनरल | बागवे रमेश आ. | पु. | काँग्रेस | ६५६३८ | सदानंद क्रिष्णा शेट्टी | पु. | शिवसेना | २८३१३ |
| २००४ | २५१ | पुणे कॉन्टोमेन्ट | जनरल | चंद्रकांत बा. शिवरकर | पु. | काँग्रेस | लिलावती विठ्ठल तुपे | पु. | शिवसेना | ६८९८४ | १०१८०२ |
| १९९९ | २५१ | पुणे कॉन्टोमेन्ट | जनरल | चंद्रकांत बा. शिवरकर | पु. | काँग्रेस | ५९७५५ | कैलास कोद्रे | पु. | रा.काँ. | ४६६१७ |
| १९९५ | २५१ | पुणे कॉन्टोमेन्ट | जनरल | अप्पा सु. लोणकर | पु. | शिवसेना | ७८००० | बाळासाहेब शिवरकर | पु. | काँग्रेस | ७५५८० |
| १९९० | २५१ | पुणे कॉन्टोमेन्ट | जनरल | चंद्रकांत बा. शिवरकर | पु. | काँग्रेस | ७१७८९ | तुपे विठ्ठल बाबुराव | पु. | जनतादल | ४९७९७ |
| १९८५ | २५१ | पुणे कॉन्टोमेन्ट | जनरल | तुपे विठ्ठल बाबुराव | पु. | जदयु | ४४९९७ | शिवरकर चं. विठ्ठल | पु. | काँग्रेस | ४४८२० |
| १९८० | २५१ | पुणे कॉन्टोमेन्ट | जनरल | तुपे विठ्ठल बाबुराव | पु. | जदयु | २७८६० | घुले शिवाजीराव कृ. | पु. | काँग्रेस | २५५४६ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७८ | २५१ | पुणे कॉन्टोमेन्ट | जनरल | तुपे विठ्ठल बाबुराव | पु. | जदयु | ३४७३७ | ससाणे जयसिंग गणपत | पु. | काँग्रेस | ३०२५१ |
| १९७२ | २३५ | पुणे कॉन्टोमेन्ट | जनरल | शिवाजीराव ढेरे | पु. | काँग्रेस | ३०६६१ | राम तुपे | पु. | सओपी | १३७७३ |
| १९६७ | २३५ | पुणे कॉन्टोमेन्ट | जनरल | के. टी. गिरमे | पु. | काँग्रेस | १४९२४ | आर.डी.तुपे | पु. | ससप | १२९७२ |
| १९६२ | ४७ | पुणे कॉन्टोमेन्ट | जनरल | कृष्णराव तु. गिरमे | पु. | काँग्रेस | १७५२९ | ससाणे जयसिंग गणपत | पु. | पसप | ६४७४ |

**सारांश :**

पुणे विधानसभा मतदारसंघांच्या मागील वर्षींच्या निवडणुकांचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, वडगाव शेरी मतदारसंघामध्ये भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व दिसून येते.

पर्वती मतदारसंघाच्या विधानसभा निवडणूकींचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, भाजप व काँग्रेस या पक्षांचा मतदारसंघावर प्रभाव दिसून येतो.

कसबा पेठ मतदारसंघामध्ये मागील १९६२ ते २०१४ निवडणूकांचा आढावा घेतला तर भाजप या पक्षाचा प्रभाव दिसतो.

शिवाजीनगर मतदारसंघाचा १९६२ ते २०१४ वर्षांतील निवडणूकांचा आढावा घेतला तर शिवसेनेचे प्रभुत्व या मतदारसंघावर असलेले दिसून येते.

पुणे कॅन्टोमेंट या मतदारसंघावर १९६२ ते २०१४ या सालातील निवडणूकांचा आढावा घेतला असता काँग्रेस या पक्षाचे मतदारसंघावर प्रभुत्व असलेले दिसून येते.

अशाप्रकारे या प्रकरणात पुणे शहरातील विधानसभा मतदारसंघाच्या मागील वर्षीच्या निवडणूकांचा आढावा घेतला आहे.

## आचारसंहितेचे १४ गुन्हे –

पुणे आचारसंहितेचे चौदा गुन्हे दाखल झाले. त्यात भाजपचे आमदार भीमराव तापकीर, कोथरूड येथील भाजपच्या उमेदवार मेधा कुलकर्णी तर राष्ट्रवादीचे उमेदवार बाबुराव चांदेरे यांचा प्रामुख्याने समावेश आहे. त्या विना परवानगी रॅली काढल्याचे सर्वाधिक गुन्हे दाखल झाले होते. [4] (संदर्भ – दत्तवाडी पोलिस चौकी)

## विधानसभा निवडणूक – २०१४ पुणे शहरातील निवडून आलेले उमेदवार व त्यांची मते

- वडगाव शेरीमधून भाजपाचे जगदीश मुळीक हे ६६,९०८ मतांनी निवडून आले.
- शिवाजीनगर मतदार संघातून भाजपाचे विजय काळे ५६४६० मतांनी निवडून आले.
- कोथरूड मतदार संघातून भाजपाच्या मेधा कुलकर्णी १,००,९४१ मतांनी निवडून आल्या.

- खडकवासला मतदार संघातून भाजपाचे भीमराव तापकीर १,११,५८१ मतांनी निवडून आले.
- पर्वती मतदार संघातून भाजपाच्या माधुरी मिसाळ ९५,५८३ मतांनी निवडून आल्या.
- हडपसर मतदार संघातून भाजपाचे योगेश टिळेकर हे ८२,६२९ मतांनी निवडून आले.
- पुणे कँटोन्मेंट भाजपाचे दिलीप कांबळे हे ५४,६९२ मतांनी निवडून आले.
- कसबा पेठेतून भाजपाचे गिरीश बापट हे ७३,५९४ मतांनी निवडून आले. [5] **संदर्भ –** www.eci.gov.in

# पुणे विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीच्या मतदानाची टक्केवारी

| विधानसभा मतदारसंघ | विधानसभा निवडणूक २००१ | विधानसभा निवडणूक २०१४ |
|---|---|---|
| वडगाव शेरी | ४५.८५ | ५२.२ |
| शिवाजीनगर | ४२.८९ | ५३.२४ |
| कोथरुड | ४६.३७ | ५६.५३ |
| पर्वती | ४५.४५ | ५७.०६ |
| पुणे कॅन्टोन्मेंट | ३५.९८ | ४६.९७ |
| कसबापेठ | ४९.०६ | ६८ |
| खडकवासला | ३५ | ५४.८३ |
| हडपसर | ४० | ५८ |

विधानसभा २०१४ –निवडणूकीतील महिला उमेदवार

– पुणे जिल्ह्यातील प्रमुख चार महिला उमेदवारांपैकी भाजपाच्या माधुरी मिसाळ आणि मेधा कुलकर्णी या भरघोस मतांनी विजयी झाल्या.

– मतमोजणीस सुरुवात झाल्यापासूनच पर्वती विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या उमेदवार माधुरी मिसाळ या आघाडीवर होत्या. त्यामुळे अवघ्या सहा–सात फेऱ्यांमध्येच त्या विजयी घोषित झाल्या. माधुरी मिसाळ यांना ९५ हजार ५८३ मते मिळाली त्यांनी शिवसेनेच्या सचिन तावरे यांना ६९ हजार ९० मतांनी तर राष्ट्रवादीच्या सुभाष जगताप यांना ६९ हजार ४५९ मतांनी मागे टाकले

कोथरुड मतदारसंघात मेधा कुलकर्णी १ लाख ९४१ मतांनी निवडून आल्या त्यांनी शिवसेनेचे चंद्रकांत मोकाटे यांचा ६४ हजार ६६२ मतांनी पराभव केला.

**निवडणूक खर्च**

निवडणूकांमध्ये वारेमाप पैसा खर्च होतो असे लोकांचे म्हणणे आहे. निवडणूक खर्च कोटींमध्ये जातो. प्रत्येक मतदारसंघात ही परिस्थिती होती. आघाडी युतीतील तालेवारांना जपण्याचा तसेच मतदानांच्या दिवशीची व्यवस्था करण्यासाठी हा खर्च केला जातो. पूर्वीच्या वेळेस लाखांमध्ये काम भागत होते. प्रत्येक मतदारसंघात पुढील परिस्थिती दिसून आली. मित्र पक्षांचे स्थानिक नेते, त्यांचा मानपान कार्यकर्त्यांना सांभाळणे ह्यावर जास्तीत जास्त खर्च करण्यात आला. मोठ्या नेत्यांचे येणे जाणे त्यांचे गट-तट कार्यकर्त्यांच्या जेवणावळी यांवरच एकूण खर्चातील २० ते २५% रक्कम लागली. तीच रक्कम काही लाखांत मोजावी लागते असे काही उमेदवारांच्या निवडणूक हिशेब व्यवस्थापकांनी सांगितले. पूर्वी कार्यकर्ते भेळ भत्त्यावरही समाधानी होते मात्र गेल्या २० वर्षांत ते चित्र पालटत असलेले दिसून येत आहे.

**पुणे शहरातील प्रत्येक मतदार संघातं पुढील गोष्टींवर खर्च करण्यात आला.**

मिरवणुकीतील कार्यकर्त्यांची संख्या, सभेसाठी पोलिस परवानगी. दैनंदिन हिशोब, पदयात्रेतील कार्यकर्ते, रोजंदारीवर म्हणजे दिवसाचा भत्ता देवून कार्यकर्ते उभे केले होते. प्रचारासाठी व्हिडीओ, एलईडी स्क्रीन ठेवलेली व्हॅन, व्हॉटस् अप, संकेतस्थळ यांना महत्त्व आले होते. या अत्याधुनिक यंत्रणा हाताळण्यासाठी तज्ज्ञांची गरज असल्यामुळे त्यांनाही पैसे द्यावे लागत होते. पी.आर.ओ. एजन्सीची नियुक्तीही काही मतदारसंघात केली होती. सभांसाठी लोक बोलाविली होती. जमा केली होती पैसे वाटूनच. त्यांना ये जा करण्यासाठी वाहनांची सोय वाहनचालकांना भत्ता, खाण्यापिण्याची व्यवस्था इ. बूथवरील कार्यकर्त्यांवर झालेला खर्च. झेंडे (हाताच्या पंजा, घड्याळ, रेल्वे इंजिन इ.) फ्लेक्स, प्रचाराचे बिल्ले, येणाऱ्या नेत्यांची सोय यावरील खर्च. अशा प्रकारे निवडणुकींचा खर्च कोटींमध्ये जातो. तरी हिशोब मात्र ठरलेल्या पद्धतीनेच दैनंदिन व कमी दाखविणे क्रमप्राप्त ठरतो. तो तसा ठेवण्यासाठी देखील स्वतंत्र व्यक्तीची नेमणूक करण्याचाही खर्च होताच.

शेवटच्या दिवशी मतदानाच्या १० ते १५% रक्कम (एकूण खर्चाच्या) लागली होती. त्यामध्ये प्रत्येक बुथवरील कार्यकर्त्यांची उपस्थिती भत्ता, त्यांनी लॅपटॉप मतदारयादी जेवणाखाण्याची सोय. काही मतदारांच्या मागण्या तातडीने पूर्ण करण्यासाठी स्थानिक नेत्यांची 'अर्थपूर्ण सज्जता' प्रत्येक मतदारसंघात हे चित्र पहायला मिळत होते.

अशाप्रकारे निवडणुकीतील झालेला खर्च किती व्हिजीबल आहे आणि किती इनव्हिजिबल आहे हे मोजमाप करणारी सक्षम यंत्रणा आजपर्यंत तरी निवडणूक आयोगाकडे नाही. निवडणूक आयोगाकडून फक्त दिसणाऱ्या खर्चावर लक्ष ठेवले जाते. प्रत्यक्षात न दिसणाराच खर्च जास्त असतो. कायद्यातील या त्रुटीचा उमेदवार फायदा घेताना दिसून येतात. अन् कोट्यावधींचा खर्च लाखांवर दाखवितात.

खर्च सांभाळणाऱ्या चार्टर्ड अकौंटंटना (सीए) केवळ अधिकृत माहिती दिली जाते, ती फारच कमी असते. सभेसाठी आलेली वाहने हजार असतात पण उमेदवाराची केवळ पन्नास दाखविली जातात. अन् बाकी कार्यकर्त्यांची असतात. असे दाखविले जाते. प्रत्यक्षात त्यासाठी पैसे उमेदवारानेच दिलेले असतात. पण ते सिद्ध होऊ शकत नाही. सी.ए. मतानुसार किरकोळ खर्चच दाखविला जातो. तसेच उमेदवारांसाठी करण्यात आलेल्या प्रचारासाठी केलेल्या खर्चाची बिले कमी लावली जातात. बॅनर्स तयार करण्याचा खर्च

बाजारात अधिक असेल आणि उमेदवाराने कमी दर लावला असेल तर त्याला आव्हान देता येत नाही. रिक्षाचा प्रचार, प्रचार पत्रके इतर खर्चही कमी दाखविला जातो.

## ४.११ निवडणूक निकाल –

२०१४ विधानसभा निवडणुक पुणे शहरासाठी ८ मतदारसंघातून ही निवडणूक लढली गेली. वडगांवशेरी, शिवाजीनगर, कोथरूड, खडकवासला, पर्वती, हडपसर, पुणे कॅन्टोंन्मेट, कसबा हे मतदारसंघ होते.

* वडगावशेरी मधून जगदीश मुळीक हे भाजप या पक्षाकडून निवडणूकीसाठी उभे राहिले होते. तर सुनील टिंगरे – शिवसेना, बापू पठारे – राष्ट्रवादी काँग्रेस, नारायण गलांडे – मनसे, चंद्रकांत छाजेड – काँग्रेस तर्फे निवडणूकीच्या रिंगणात उभे राहिले होते.

ह्या उमेदवारांमधून भाजपाचे जगदीश मुळीक हे ६६९०८ मतांनी निवडून आले.

* शिवाजीनगर मतदारसंघातून विजय काळे, भाजप, सुनील टिंगरे – शिवसेना, बापू पठारे – राष्ट्रवादी, नारायण गलांडे – मनसे, चंद्रकांत छाजेड – काँग्रेस, विधानसभा निवडणूकीसाठी उभे राहिले होते. त्यातून विजय काळे हे ५६४६० मतांनी विजयी झाले.

* कोथरूड मतदारसंघातून मेधा कुलकर्णी – भाजपा, चंद्रकांत मोकाटे – शिवसेना, बाबूराव चांदेरे – राष्ट्रवादी काँग्रेस, किशोर शिंदे – मनसे, उमेश कंधारे – काँग्रेस हे विधानसभेच्या निवडणूकीसाठी २०१४ च्या उभे राहिले होते. त्यातून मेधा कुलकर्णी या १००९४१ मतांनी विजयी झाल्या.

* खडकवासला मतदारसंघातून भीमराव तापकीर – भाजप, दिलीप बराटे – राष्ट्रवादी, राजाभाऊ लायगुडे – मनसे, श्याम देशपांडे – शिवसेना, श्रीरंग चव्हाण पाटील – काँग्रेस हे निवडणूकीसाठी उभे राहिले होते. त्यापैकी भीमराव तापकीर हे १११५८१ एवढ्या मतांनी निवडून आले.

* पर्वती मतदारसंघातून माधुरी मिसाळ – भाजप, सचिन तावरे – शिवसेना, सुभाष जगताप – राष्ट्रवादी काँग्रेस, अभय छाजेड – काँग्रेस, जयराज लांडगे – मनसे हे उमेदवार २०१४ मधील महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उभे राहिले होते. त्यापैकी माधुरी मिसाळ ह्या ९५१५८३ एवढ्या मताधिक्याने पर्वती मतदारसंघातून जिंकून आल्या.

* पुणे कॅन्टोंमेंट मधून दिलीप कांबळे – भाजपा, रमेश बागवे – काँग्रेस, परशुराम वाडेकर – शिवसेना, अजय तायडे – मनसे, भगवान वैराट – राष्ट्रवादी काँग्रेस हे उमेदवार २०१४ महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उभे राहिले होते. त्यापैकी भाजपाचे दिलीप कांबळे हे ५४६९२ एवढ्या मताधिक्याने निवडून आले.

* कसबा पेठेतून गिरीष बापट – भाजपा, रोहित टिळक – काँग्रेस, रविंद्र धंगेकर – मनसे, दीपक मानकर – राष्ट्रवादी काँग्रेस, सूर्यकांत आंदेकर – अपक्ष हे उमेदवार विधानसभा निवडणूक २०१४ साठी उभे राहिले होते. त्यापैकी भाजपाचे गिरीष बापट हे ७३१५९४ एवढ्या मताधिक्याने निवडून आले आहेत.

**संदर्भ –**


संदर्भ क्र. १ – डॉ. प्रकाश पवार 'महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुर्नरचना (मतदारसंघाची पुनर्रचना)', प्रकरण क्र. ८, पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघाची पुनर्रचना पान क्र. २१८

संदर्भ क्र. २ – डॉ. प्रकाश पवार 'महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुर्नरचना (मतदारसंघाची पुनर्रचना), प्रकरण क्र. ८, पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघाची पुनर्रचना पान क्र. २१८

संदर्भ क्र. ३ – लोकराज्य मासिकाच्या नोव्हेंबर २०१४ या अंकातून प्रसिद्धी दिली गेली आहे. पान नं. ४४

संदर्भ क्र. ४ – दत्तवाडी पोलिस चौकी

संदर्भ क्र. ५ – www.eci.gov.in

# प्रकरण ५

# २०१४ पुणे विधानसभा निवडणूक माहितीचे सारणीकरण, विश्लेषण, अर्थनिर्वचन

## प्रकरण ५

# २०१४ पुणे विधानसभा निवडणूक
# माहितीचे सारणीकरण, विश्लेषण, अर्थनिर्वचन

## प्रस्तावना

वर्णनात्मक संशोधनात माहितीचे संकलन हा गाभा आहे. म्हणूनच मिळविलेल्या माहितीवर संशोधनाचा दर्जा अवलंबून असतो. संशोधनास उपयुक्त असणाऱ्या माहितीचे संकलन व विश्लेषण केल्यानंतर संशोधकास निष्कर्ष काढावे लागतात. निष्कर्ष काढण्यासाठी माहितीचे संकलन व अर्थनिर्वचन ही संशोधनात महत्त्वाची बाब आहे.

संशोधनाच्या संदर्भात कोणती माहिती मिळवायची ? ती केव्हा मिळवायची? याचे नियोजन संशोधकाने सुरुवातीलाच करावे लागते. संख्यात्मक व गुणात्मक अशा स्वरूपाच्या या माहितीच्या संख्याशास्त्राचा योग्य प्रकारे उपयोग करून निश्चित स्वरूपाचे अर्थनिर्वचन करता येते. त्यामुळे संशोधन प्रक्रियेला दिशा मिळते. संशोधनातील अत्यंत महत्त्वाच्या अशा प्रक्रियेला / माहितीवर विविध प्रक्रिया करणे असे म्हणतात.

सदर संशोधनात संशोधकाने संशोधनासाठी उद्दिष्ट्ये लक्षात घेवून संख्यात्मक व गुणात्मक माहितीच्या आधारे माहितीचे संकलन, वर्गीकरण, कोष्टीकरण व अर्थनिर्वचन केले.

## ५.१ माहितीचे संकलन

''संशोधनातील निष्कर्ष विश्वासार्ह ठरविण्यासाठी ज्या माहितीच्या आधारे केले जाते त्याला माहिती संकलन असे म्हणतात.

माहितीचे संकलन दोन प्रकारे केले जाते.

माहितीचे प्रकार

संख्यात्मक माहिती — गुणात्मक माहिती

## ५.२ – माहितीचे सारणीकरण व विश्लेषण

या प्रकरणामध्ये अनुसुचीच्या साह्याने सारणी बनवली आहे. सारणीद्वारे विधानसभा निवडणूकीमध्ये जे सत्तांतर घडून आले. त्या पाठीमागील कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. ह्यामध्ये वय, लिंग, जात, धर्म, मतदारसंघाचे नाव सत्तापालटाबाबत अपेक्षा दर्शविणारी सारणी, काँग्रेस विरोधातील असंतोष दर्शविणारी सारणी, विकासाला प्राधान्य दर्शविणारी सारणी, मोदी लाटेचा विधानसभेच्या निवडणुकीवर झालेला परिणाम दर्शविणारी सारणी, उमेदवारांची योग्यता दर्शविणारी सारणी, आचारसंहिता भंगाच्या गुन्ह्यांची टक्केवारी दर्शविणारी सारणी, महिलांचा निवडणुकीवरील प्रभाव दर्शविणारी सारणी महायुतीचा भाजपाला असलेला पाठिंबा दर्शविणारी सारणी ह्या सारख्या सारण्या तयार करून त्याद्वारे विधानसभा निवडणुक – २०१४ मधील सत्तातरांची कारणे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

| अ. क्र. | तपशील |
|---|---|
| ५.२.१ | वय दर्शविणारी सारणी |
| ५.२.२ | लिंग दर्शविणारी सारणी |
| ५.२.३ | जात–धर्म दर्शविणारी सारणी |
| ५.२.४ | मतदारसंघाचे नाव दर्शविणारी सारणी |
| ५.२.५ | सत्तापालटाबाबत अपेक्षा दर्शविणारी सारणी |
| ५.२.६ | काँग्रेस विरोधातील असंतोष दर्शविणारी सारणी |
| ५.२.७ | विकासाला प्राधान्य दर्शविणारी सारणी |
| ५.२.८ | मोदी लाटेचा विधानसभेच्या निवडणूकीवर झालेला परिणाम दर्शविणारी सारणी |
| ५.२.९ | उमेदवाराची योग्यता दर्शविणारी सारणी |
| ५.२.१० | निवडणूक यंत्रणेची कार्यक्षमता दर्शविणारी सारणी |
| ५.२.११ | आचारसंहिताभंगाचे गुन्ह्यांची टक्केवारी दर्शविणारी सारणी |
| ५.२.१२ | महिलांचा निवडणूकीवरील प्रभाव दर्शविणारी सारणी |
| ५.२.१३ | महायुतीचा भाजपाला असलेला पाठिंबा दर्शविणारी सारणी |

## सारणी क्र. ५.२.१ वयानुसार मतदारांचे केलेले वर्गीकरण

अनुसुचीद्वारे संशोधनासंदर्भात माहितीचे संकलन करत असताना वयानुसार ५ गट वय या निकषावर करण्यात आले ते म्हणजे.

१) १८ ते २८

२) २९ ते ३९


३) ४० ते ४९

४) ५० ते ५९

५) ६० च्या वर

| अ. क्र. | वय | मतदारांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १८ ते २८ | ३० | २८.८४% |
| २ | २९ ते ३९ | २४ | २३.७६% |
| ३ | ४० ते ४९ | १७ | १३.६४% |
| ४ | ५० ते ५९ | २५ | २४.८४% |
| ५ | ६० च्या वर | ८ | ७.६९% |
|  | एकूण | १०४ | १००% |

### आलेख क्र. १ वयानुसार मतदारांचे केलेले वर्गीकरण




### निरीक्षण :

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१) १८ ते २८ वर्षे वयोगटातील मतदारांची संख्या ३० व शेकडा प्रमाण २८.८४% आहे.

२) ४० ते ४९ वर्षे वयोगटातील मतदारांची संख्या २४ व शेकडा प्रमाण १६.३४% आहे.

३) ५० ते ५९ वर्षे वयोगटातील मतदारांची संख्या १७ असून शेकडा प्रमाण २३.०७६% आहे.

४) ६० च्या वर वयोगटातील मतदारांची संख्या २५ असून शेकडा प्रमाण ७.६९% आहे.

**अन्वयार्थ :**

वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, वयानुसार १८ ते २८ वर्षे या वयोगटातील मतदारांची संख्या सर्वात जास्त म्हणजे २८.८४% आहे.

## सारणी क्र. ५.२.२ लिंगानुसार मतदारांचे केलेले वर्गीकरण:-

लिंगानुसार मतदारांचे वर्गीकरण या सारणीवरून पुरुष मतदारांची संख्या जास्त आहे. ती ५७.६९% आहे. जात, धर्म दर्शविणाऱ्या सारणीवरून हिंदू धर्मातील मतदारांची संख्या जास्त आहे. तसेच सत्तापालटाबाबत अपेक्षा दर्शविणाऱ्या सारणीवरून असे दिसून येते की, ९७.१२% लोकांना सत्तापालटाबाबत अपेक्षा होती. तसेच काँग्रेस-विरोधातील असंतोष कारणीभूत आहेत असे म्हणणारे जास्त आहेत म्हणजे ९७.१२% आहेत. गेल्या १५ वर्षामध्ये गैरव्यवहारांची, भ्रष्टाचारांनी, घोटाळ्यांची प्रकरणे पाहिली असता असे दिसून येते की, काँग्रेस राष्ट्रवादी (युपीए) आघाडीचे नेते सर्वात जास्त गैरव्यवहार करणारे आहेत. बोफार्स, सेंट किटस् ह्या गैरव्यवहारात तर प्रत्यक्ष अनुक्रमे राजीव गांधी, तसेच पी.व्ही. नरसिंहराव व सहकारी मंत्री आरोपी, अलीकडील आदर्श गृहनिर्माण तसेच सिंचन पाटबंधारे मधे अनुक्रमे मुख्यमंत्री अशोक चव्हाण, तसेच अजितदादा पवारांचे नाव समोर आले. या घोटाळ्यांमध्ये ह्यांचा हात असल्याचे प्रसारमाध्यमे सांगतात, असे असताना हे भ्रष्ट शासन लोकांना कशाला हवे? व त्यामुळे लोकांना सत्तापालट व्हावी अशी अपेक्षा होती. व सत्तापालट होईल, व्हायलाच पाहिजे ही लोकांची भावना होती. हे अनुसूची भरून घेताना संशोधिकेला पाहायला मिळाले.


महागाई शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी, महिलांची असुरक्षितता भ्रष्टाचार हे महाराष्ट्रातील मुख्य प्रश्न आहेत. पुण्यामधील जनतेच्या समस्या म्हणजे महागाई, बेरोजगारी, कचरा निर्मूलन, अस्वच्छता, वाहतुकीची समस्या, आरोग्य सेवांची कमतरता अपुऱ्या सोयी सुविधा.

महाराष्ट्रातील समस्यांचा आढावा घेतला असता गेल्या ५ वर्षात सत्तेवरील काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकार शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या धोरणांबाबत, महागाई वाढ रोखण्यास, बेरोजगारांच्या समस्या दूर करण्यात नवनवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात इतके अपयशी ठरलेले दिसून येते तसेच निष्क्रिय ठरलेले दिसून येते.

पुण्याच्या संदर्भात कसबा पेठ व पर्वती या मतदारसंघाचा आढावा घेतला तर बरीचशी विकासकामे जी झाली आहेत. मागील पाच वर्षात ह्या दोन मतदारसंघात भाजपचेच कार्यकर्ते होते. पर्वतीतून आ. माधुरी मिसाळ व कसबा मतदारसंघातून गिरीष बापट ह्यांनी लोकांची विकासकामे केलेली दिसून येतात. व मोदी लाटेमुळे ह्या मतदारसंघात १३ व्या विधानसभेच्या निवडणूकीमधेही भाजपचेच उमेदवार निवडून आल्याचे दिसून येत आहे. तरी देखील काही प्रमाणात कसबा मतदारसंघात जुन्या पडक्या वाड्यांचा प्रश्न सुटत नसल्याचे दिसून येत आहे. तसेच पर्वतीमधून कचऱ्याचा प्रश्न अरुंद रस्त्यांचा प्रश्न सुटलेला नसल्याचे दिसून येते.

| अ. क्र. | लिंग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्त्री | ४४ | ४२.३१% |
| २ | पुरुष | ६० | ५७.६९% |
| | एकूण | १०४ | १००% |

**आलेख क्र. २ लिंगानुसार मतदारांचे केलेले वर्गीकरण**




**निरीक्षण :**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१. स्त्री मतदारांची संख्या ४४ असून शेकडा प्रमाण ४२.३१% आहे

२. तसेच पुरुष मतदारांची संख्या ६० असून शेकडा प्रमाण ५७.६९% आहे.

**अन्वयार्थ :**


वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, पुरूष मतदारांची संख्या स्त्री मतदारांपेक्षा अधिक आहे.

## सारणी क्र. ५.२.३ जात–धर्म दर्शविणारी सारणी

मतदारांच्या जात धर्मानुसार ही सारणी बनविण्यात आली आहे. अनुसुची भरून घेताना जेवढे प्रतिसादक मिळाले. त्यांचेही जात धर्मानुसार येथे वर्गीकरण करण्यात आले आहे.

| अ. क्र. | तपशील | मतदारांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | ५१ | ४९.०३% |
| २ | मुस्लिम | २३ | २२.११% |
| ३ | शिख | ११ | १०.५७% |
| ४ | ख्रिश्चन | ११ | १०.५७% |
| ५ | पारसी | ८ | ७.६९% |
| | एकूण | १०४ | १००% |

### आलेख क्र. ३ जात–धर्म




**निरीक्षण :**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१. मतदारांच्या जातीनुसार हिंदू धर्माच्या मतदार प्रतिसादकांची संख्या ५१असून शेकडा प्रमाण ४९.०३% आहे.

२. मुस्लिम धर्माच्या मतदार प्रतिसादकांची संख्या २३ व शेकडा प्रमाण ७.६९ % आहे.

३. शीख धर्माच्या मतदार प्रतिसादकांची संख्या ११ व शेकडा प्रमाण १०.५७% आहे.

४. ख्रिश्चन धर्माच्या मतदार प्रतिसादकांची संख्या ११ व शेकडा प्रमाण १०.५७% आहे.

५. पारशी धर्माच्या मतदार प्रतिसादकांची संख्या ८ व शेकडा प्रमाण १०.५७% आहे.

**अन्वयार्थ :**


वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, मतदारांच्या धर्मानुसार हिंदू धर्माच्या मतदार प्रतिसादकांची संख्या जास्त आहे.

## सारणी क्र. ५.२.४ मतदारसंघाचे नाव दर्शविणारी सारणी

कसबा व पर्वती हे दोन मतदारसंघ संशोधिकेने माहिती संकलनासाठी वापरले आहेत. कसबा मतदारसंघ हा ब्राम्हण, मराठा जातीसाठी आहे. तसेच पर्वती मतदार संघ हा एस.सी., एस.टी., ओबीसी साठीचा मतदारसंघ आहे. कसबा मतदारसंघ हा पुणे शहराच्या मध्यवर्ती भागात आहे. तर पर्वती मतदारसंघ हा पुनर्वसन झालेला मतदारसंघ आहे.

| अ. क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कसबा | ५५ | ५२.८८% |
| २ | पर्वती | ४९ | ४७.२२% |
| | एकूण | १०४ | १००% |

### आलेख क्र. ४ मतदारसंघाचे नाव




**निरीक्षण :**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१. कसबा मतदार संघातील प्रतिसादकांची संख्या ५५ असून शेकडा प्रमाण ५२.८८ आहे.

२. पर्वती मतदार संघातील प्रतिसादकांची संख्या ४९ असून शेकडा प्रमाण ४७.२२ आहे.


**अन्वयार्थ :**

वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, कसबा मतदार संघातील प्रतिसादकांची संख्या जास्त आहे.

## सारणी क्र. ४.२.५ सत्तापालटाबाबत अपेक्षा दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सत्तापालटाबाबत अपेक्षा असणारे | १०१ | ९७.१२% |
| २ | सत्तापालटाबाबत अपेक्षा नसणारे | ३ | २.८८% |
| | एकूण | १०४ | १००% |

## आलेख क्र. सत्तापालटाबाबत अपेक्षा




**निरीक्षण :**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१. सत्तापालटाबाबतची अपेक्षा असणारी मतदार संघातील प्रतिसादकांची संख्या १०१ असून शेकडा प्रमाण ९७.१२% आहे.

२. सत्तापालटाबाबतची अपेक्षा नसणारी मतदार संघातील प्रतिसादकांची संख्या ३ असून शेकडा प्रमाण २.८८% आहे.


**अन्वयार्थ :**

वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, जवळजवळ सर्वच प्रतिसादकांना सत्तापालटाबाबतची अपेक्षा होती.

## सारणी क्र. ५.२.६ काँग्रेसविरोधातील असंतोषाबाबत मत मांडणारी सारणी

| अ. क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेसविरोधातील असंतोष कारणीभूत आहे असे म्हणणारे | १०१ | ९७.१२% |
| २ | काँग्रेसविरोधातील असंतोष कारणीभूत नाही असे म्हणणारे | ३ | २.८८% |
| | एकूण | १०४ | १००% |

**आलेख क्र.** काँग्रेसविरोधातील असंतोषाबाबत मत




**निरीक्षण :**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१. काँग्रेसविरोधातील असंतोष कारणीभूत आहे असे म्हणणारे प्रतिसादकांची संख्या १०१ असून शेकडा प्रमाण ९७.१२% आहे.

२. काँग्रेसविरोधातील असंतोष कारणीभूत नाही असे म्हणणारे प्रतिसादकांची संख्या ३ असून शेकडा प्रमाण २.८८% आहे.


**अन्वयार्थ :**

वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, जवळजवळ सर्वच प्रतिसादक काँग्रेसविरोधातील असंतोष कारणीभूत आहे असे म्हणणारे आहेत.

## सारणी क्र. ५.२.७ विकासाला प्राधान्य दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विकासाला प्राधान्य देणारी होती | १०३ | ९९.००% |
| २ | विकासाला प्राधान्य देणारी  नव्हती | १ | १% |
| | एकूण | १०४ | १००% |

**आलेख क्र. विकासाला प्राधान्य दर्शविणारे मत**




**निरीक्षण :**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१. विधानसभा निवडणूक २०१४ जातीच्या प्रभावापेक्षा विकासाला प्राधान्य देणारी होती. असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या १०३ असून शेकडा प्रमाण ९९.००% आहे.

२. विधानसभा निवडणूक २०१४ जातीच्या प्रभावापेक्षा विकासाला प्राधान्य देणारी नव्हती असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या १ असून शेकडा प्रमाण १.००% आहे.


**अन्वयार्थ :**

वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, विधानसभा निवडणूक २०१४ जातीच्या प्रभावापेक्षा विकासाला प्राधान्य देणारी होती असे मत व्यक्त सर्वच प्रतिसादकांनी व्यक्त केले आहे.

## सारणी क्र. ५.२.८ मोदी लाटेचा प्रभाव दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | मोदी लाटेचा प्रभाव | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मोदी लाटेचा प्रभाव होता. | १०४ | १००% |
| २ | मोदी लाटेचा प्रभाव नव्हता. | ० | ०% |
| | एकूण | १०४ | १००% |

**आलेख क्र. मोदी लाटेचा प्रभाव**




**निरीक्षण :**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१. विधानसभा निवडणूक २०१४ विधानसभेच्या निवडणुकीवर मोदी लाटेचा प्रभाव पडला होता असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या १०४ असून शेकडा प्रमाण १००% आहे.

**अन्वयार्थ :**


वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, विधानसभा निवडणूक २०१४ विधानसभेच्या निवडणुकीवर मोदी लाटेचा प्रभाव पडला होता असे मत सर्वच प्रतिसादकांनी व्यक्त केले आहे.

## सारणी क्र. ५.२.९ – उमेदवाराची योग्यता दर्शविणारी सारणी

कसबा पेठ व पर्वती मतदारसंघातून अनुक्रमे गिरीष बापट व माधुरी मिसाळ या निवडणूकीत १३ व्या विधानसभा भाजप या पक्षातर्फे उभे राहिलेले उमेदवार होते. ह्या निवडणूकीत उमेदवार योग्य होते का? ह्या प्रश्नाला उत्तर योग्य होते असे प्रतिसादकांकडून देण्यात आले आहे. १०४ प्रतिसादकांपैकी १०१ प्रतिसादकांनी उमेदवार १३ व्या विधानसभेच्या निवडणूकीसाठी योग्य आहे असे दर्शविलेले आहे.

| अ. क्र. | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | योग्य | १०१ | ९७.१२% |
| २ | अयोग्य | ३ | २.८८% |
| | एकूण | १०४ | १००% |

**आलेख क्र. उमेदवाराची योग्यता**




**निरीक्षण :**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१. विधानसभा निवडणूक २०१४ विधानसभेच्या निवडणुकीत उभे राहिलेले उमेदवार योग्य होते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या १०१ असून शेकडा प्रमाण ९७.१२% आहे.

२. विधानसभा निवडणूक २०१४ विधानसभेच्या निवडणुकीत उभे राहिलेले उमेदवार योग्य नव्हते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ३ असून शेकडा प्रमाण २.८८% आहे.

**अन्वयार्थ :**


वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, जवळजवळ सर्वच प्रतिसादकांनी विधानसभा निवडणूक २०१४ च्या निवडणुकीत उभे राहिलेले उमेदवार योग्य होते असा प्रतिसाद दिला आहे.

## सारणी क्र. ५.२.१० निवडणूक यंत्रणेची कार्यक्षमता दर्शविणारी सारणी

१३ व्या विधानसभेच्या निवडणूकीच्या वेळी निवडणूक यंत्रणेने एक प्रोग्राम पत्रिका, Systematic Voters Education And Electrical participation progarmme बनविली होती. व त्यानुसार निवडणूकीमधील सर्व यंत्रणा कामे करीत होती. मी मतदान करणार अशी शपथ जनतेकडून घेतली जात होती. मतदानाच्या स्लिपा अगदी घरपोच जावून सुद्धा दिल्या जात होत्या. मतदानाच्या दिवशी सुद्धा स्लिपा नसलेल्या व्यक्तींना त्या दिल्या जात होत्या. विविध मतदान केंद्रासाठी अधिकारी वर्ग नियुक्त केला गेला होता. लोकांना मतदान करताना मशिन, कशी वापरायची याबाबत देखील मार्गदर्शन केले जात होते. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर पाण्याची सोय इ. सोयी केल्या होत्या. भरारी पथकांची नियुक्ती देखील मतदानकेंद्रावर करण्यात आली होती. अशाप्रकारे जनतेला सर्व दिसत असल्या कारणाने निवडणूक यंत्रणा कार्यक्षम होती असे १०४ पैकी १०१ प्रतिसादकांनी सांगितले आहे.

| अ. क्र. | निवडणूक यंत्रणा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कार्यक्षम होती | १०१ | ९७.१२% |
| २ | कार्यक्षम नव्हती | ३ | २.८८% |
| | एकूण | १०४ | १००% |

**आलेख क्र. निवडणूक यंत्रणेची कार्यक्षमता**




**निरीक्षण :**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१. विधानसभा निवडणूकीतील निवडणूक यंत्रणेची कार्यक्षमता चांगली होती असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या १०१ असून शेकडा प्रमाण ९७.१२आहे.

२. विधानसभा निवडणूकीतील निवडणूक यंत्रणेची कार्यक्षमता चांगली नव्हती असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ३ असून शेकडा प्रमाण २.८८ आहे.

**अन्वयार्थ :**


वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, जवळजवळ सर्वच प्रतिसादकांनी निवडणूक यंत्रणा कार्यक्षम होती असे मत व्यक्त केले आहे.

## सारणी क्र. ५.२.११ आचारसंहिता भंगाच्या गुन्ह्यांची टक्केवारी दर्शविणारी सारणी

पुणे विधानसभा मतदारसंघात आचारसंहिता भंगाचे गुन्हे खूप कमी प्रमाणात घडले, ते सुद्धा निवडणूक प्रचारासाठी रॅली काढणे, व काही ठिकाणी स्वेटर वाटप, साड्या वाटप, वस्तू वाटप आचारसंहिता भंगाचे गुन्हे घडले असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ६४.४२% आहे तर आचारसंहिता भंगाचे गुन्हे घडले नाहीत. याबाबत मत मांडणाऱ्यांचे ३५.५८% आहेत.

| अ. क्र. | तपशील – आचारसंहिता गुन्हे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गुन्हे घडले – होय | ६७ | ६४.४२% |
| २ | गुन्हे घडले – नाही | ३७ | ३५.५८% |
| | एकूण | १०४ | १००% |

**आलेख क्र. आचारसंहिता भंगाचे गुन्ह्यांची टक्केवारी**




**निरीक्षण :**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१. विधानसभा निवडणूकीत आचारसंहिताभंगाचे गुन्हे घडले असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ६७ असून शेकडा प्रमाण ६४.४२% आहे.

२. विधानसभा निवडणूकीत आचारसंहिताभंगाचे गुन्हे घडले नाहीत असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ३७ असून शेकडा प्रमाण ३५.२८% आहे.

**अन्वयार्थ :**


वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, विधानसभा निवडणूकीत आचारसंहिताभंगाचे गुन्हे घडले असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण तुलनेने अधिक आहे.

## सारणी क्र. ५.२.१२ – महिलांचा निवडणूकीवरील प्रभाव दर्शविणारी सारणी

दिलेल्या मतानुसार ७७% महिलांचा प्रतिसादकांनी निवडणूकीवर प्रभाव होता. परंतु ९२.३०% प्रतिसादकांच्या मतानुसार महिलांचा निवडणूकीवर प्रभाव पडलेला नव्हता. संभाव्यपद्धतीतील यादृच्छिक नमुना निवड (लॉटरी पद्धती वापरून जेव्हा नमुना निवड केली तेव्हा १०४ प्रतिसादक मिळाले. त्यापैकी ४४ स्त्री व ६० पुरुष प्रतिसादक मिळाले. लिंगानुसार मतदारांचे वर्गीकरण केले. तेव्हा ४२.३१% स्त्री मतदार तसेच ५७.६९% पुरुष मतदार होते.

| अ. क्र. | निवडणूकीवरील प्रभाव | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | महिलांचा निवडणूकीवर प्रभाव होता | ८ | ७.७% |
| २ | महिलांचा निवडणूकीवर प्रभाव नव्हता | ९६ | ९२.३०% |
| | एकूण | १०४ | १००% |

**आलेख क्र. महिलांचा निवडणूकीवरील प्रभाव**




**निरीक्षण :**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१. विधानसभा निवडणूकीत महिलाचा निवडणूकीवर प्रभाव होता असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ८ असून शेकडा प्रमाण ७.७% आहे.

२. विधानसभा निवडणूकीत महिलाचा निवडणूकीवर प्रभाव होता असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ९६ असून शेकडा प्रमाण ९२.३०% आहे.

**अन्वयार्थ :**

वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, महिलांचा विधानसभा निवडणूकीवर फारसा पडला नाही असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण लक्षणीय आहे.


## सारणी क्र. ५.२.१३ – महायुतीत भाजपला पाठिंबा दर्शविणारी सारणी

१३ व्या विधानसभा निवडणूकीत बहुजन महासंघ, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, शेतकरी कामगार संघटना ह्यांनी भाजपबरोबर जाण्याचे ठरविले होते. शिवसेना–भाजपाची जेव्हा युती होती तेव्हा देखील ह्या मित्रपक्षांनी युतीला पाठिंबा दिला होता. भाजपाला सत्ता मिळाल्यानंतर मात्र ह्या मित्रपक्षांना राजू शेट्टी, रामदास आठवले ह्यांना सत्तेत कोणतेही स्थान मिळाल्याचे दिसून येत नाही.

प्रतिसादकांनी महायुतीचा भाजपाला पाठिंबा होता असे म्हणणाऱ्यांची संख्या जास्त म्हणजे ८९.४२% असलेली दिसून येते.

| अ. क्र. | तपशील – महायुतीचा पाठिंबा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | महायुतीत भाजपला पाठिंबा होता | ९३ | ८९.४२% |
| २ | महायुतीत भाजपला पाठिंबा नव्हता | ११ | १०.५८% |
| | एकूण | १०४ | १००% |

**आलेख क्र. महायुतीत भाजपला पाठिंबा**




**निरीक्षण :**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की,

१. महायुतीत भाजपला पाठिंबा होता असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ११ असून शेकडा प्रमाण १०.५८% आहे.

२. महायुतीत भाजपला पाठिंबा होता असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ९३ असून शेकडा प्रमाण ८९.४२% आहे.

**अन्वयार्थ :**

वरील सारणी व आलेखावरून असे स्पष्ट होते की, विधानसभा निवडणूकीत महायुतीत भाजपला पाठिंबा नव्हता असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण जास्त आहे.

**समारोप –**

अशाप्रकारे या प्रकरणात अनुसुचीवरून सारणी बनवली आहे व आलेखाद्वारे निरीक्षण व अन्वयार्थ काढलेला आहे.

# प्रकरण ६

# पुणे विधानसभा निवडणूक २०१४ अन्वयाने निष्कर्ष, उपाययोजना गृहितकांची पडताळणी

## प्रकरण ६

# निष्कर्ष, उपाययोजना, गृहितकांची पडताळणी

**निष्कर्ष :**

कसबा पेठ व पर्वती या मतदारसंघातील मतदारांकडून अनुसूची भरून घेतली गेली त्या अनुसुचीनुसार सारणी बनवली गेली. अनुसूचीवरून वय दर्शविणाऱ्या सारणीवरून १८ ते २८ वर्ष या वयोगटातील मतदारांची संख्या जास्त म्हणजे २८.८४% आहे.

या २०१४ च्या विधानसभेच्या निवडणूकीत पुण्यामध्ये कॉलेज कॅम्पसवर तरूण वर्गाकडून I will vote अशा शपथा निवडणूक अधिकाऱ्यांनी ह्या तरूण तरूणींना शाळा कॉलेज कॅम्पसवर घ्यायला लावल्या होत्या. I will vote हा एक प्रोग्रामच ह्या निवडणूकीचा एक महत्त्वाचा घटक होता. निवडणूक यंत्रणेने ही एक चांगली कल्पना म्हणा किंवा एक योजना ह्या निवडणूकीत कार्यरत केली होती व त्यानुसारही 'एक भावनिक कर्तव्य', 'वचनाचे पालन करणे' ह्या भूमिकेतूनही तरूण वर्गाने ह्या निवडणूकीत मोठ्या संख्येने सहभागी होवून आपले योगदान दिलेले दिसून येते. ते २८.८४% एवढे असलेले दिसून येते.

तसेच १६ व्या लोकसभेच्या निवडणूका ह्या १३ व्या विधानसभेच्या निवडणूकीपूर्वी झाल्या, त्यामध्ये देखील 'डिजीटल प्रचार' नरेंद्र मोदींचा होता. जेव्हा मे महिन्यात १६ व्या लोकसभेसाठी निवडणूका पार पाडल्या तेव्हा मोदींच्या फेसबुक पेजवर १५ लाख फॉलोअर्स होते. नरेंद्र मोदींचा सोशल मिडीयावरचा प्रचार फेसबुकवरूनच चालायचा (संदर्भ - राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन, पान २०) ट्विटरवरही मोदींचे तरूण समर्थक होते. अनेक तरुणांनी 'स्वत:ची मोदी फेसबुक' पेजेस तयार केली होती. उदा. विकास पांडे या कार्यकत्याने 'आय सपोर्ट मोदी' नावाचं तर दुसऱ्या एकाने 'नमो फॉर पीएम' असे पेज तयार केले होते.

ही सगळी पेजेस अंतिमत: मोदींच्या सोशल मिडीया यंत्रणेचा भाग बनली. निवडणूका संपल्या तेव्हा मोदींच्या फॉलोअर्सची संख्या ४० लाख ७० हजार एवढी होती. नरेंद्र मोदींना मीडियात मिळालेल्या अतिरेकी कव्हरेजमुळे त्यांच्या मतांमध्ये वाढ झाली. भाजप सत्तेवर आला. ह्याच मोदी लाटेचा १३ व्या विधानसभेच्या निवडणूकीवरही तरण वर्गावर प्रभाव पडलेला दिसून येतो आहे.

तसेच १६ व्या लोसभेच्या पूर्वी भ्रष्टाचार विरोधी जी जनआंदोलने झाली. अण्णा हजारे, रामदेवबाबा त्यांना देखील ह्या तरूण वर्गाने प्रचंड प्रमाणात प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. अण्णा हजारे यांचे उपोषण चालू असताना तर 'देशात सर्व शाळा, कॉलेज, ऑफिसेस' येथे ''मी भ्रष्टाचार करणार नाही.'' अशा शपथा नागरिकांकडून घेण्यात आल्या. तसेच देशातील तरूण वर्गांनी आयटी मधील असो की इतर बिझनेस प्रोफेशन मधल्या पांढऱ्या टोप्या घालून 'मी अण्णा हजारे' तसेच साखळी धरून अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाला पाठिंबा दिल्याचे दिसून येते. अशाप्रकारे जी भावी पिढी, देशाचा आधारस्तंभ आहे त्यांना प्रकर्षाने बदल, विकास हवा आहे. त्यांना भ्रष्ट शासन नको आहे. हे येथे ह्या निवडणूकीत प्रकर्षाने जाणवून येत आहे. तसेच तरूण वर्गाला हवेहवेसेच आधुनिक तंत्रज्ञान वापरून मोदींनी तरूण वर्गाचा विश्वास संपादन केला. तसेच १६ व्या लोकसभेची निवडणूक

जिंकल्यानंतरही मोदीजी कोणत्या योजना राबवत आहेत, दौरे केले तर ते कशासंदर्भात हे संपूर्ण देशाला कळत आहे. मोदीजी रेडिओवरूनही सतत जनतेच्या संपर्कातच असतात. त्यामुळे ते काय काम करतात हे सगळ्यांनाच कळत आहे.

**निष्कर्ष –**

१. वय दर्शविणाऱ्या सारणीवरुन १८ ते २८ वर्ष या वयोगटातील मतदारांची संख्या जास्त म्हणजे २८.८४% आहे.

२. लिंगानुसार मतदारांचे वर्गीकरण या सारणीवरुन पुरुष मतदारांची संख्या जास्त आहे, ती ५७.६९% आहे.

३. जात, धर्म दर्शविणारी सारणी वरून हिंदू धर्मातील मतदारांची संख्या जास्त आहे.

४. सत्तापालटाबाबत अपेक्षा दर्शविणाऱ्या सारणीवरुन असे दिसून येते की, ९७.१२% लोकांना सत्तापालटाबाबत अपेक्षा होती.

५. काँग्रेसविरोधातील असंतोष कारणीभूत आहे असे म्हणणारे जास्त आहेत म्हणजे ९७.१२% आहेत.

६. ९९% लोकांच्या म्हणण्यानुसार विधानसभा निवडणूक २०१४ जातीच्या प्रभावापेक्षा विकासाला प्राधान्य देणारी होती.

७. १००% लोकांच्या म्हणण्यानुसार मोदी लाटेचा प्रभाव विधानसभेच्या निवडणूकीवर पडला होता.

८. ९७.१२% लोकांच्या म्हणण्यानुसार निवडून आलेला उमेदवार योग्य आहे.

९. ९७.१२% निवेदकांच्या मतानुसार निवडणूक यंत्रणा कार्यक्षम होती.

१०. ६४.४२% मतदारांच्या म्हणण्यानुसार आचारसंहिता भंगाचे गुन्हे घडले.

११. महिलांचा निवडणुकीवरील प्रभाव दाखविणाऱ्या सारणीवरुन महिलांचा निवडणुकीवर प्रभाव पडला नसलेला दिसून येतो. महिला उमेदवार निवडणूकीमध्ये उभे करण्यात पक्षांनी टाळाटाळ केली.

१२. महायुतीचा भाजपला असलेला पाठिंबा दर्शविणारी सारणीवरून महायुतीचा भाजपला पाठिंबा होता असे म्हणणारे ८९.४२% असलेले दिसून येतात.

## ६.२ – उपाययोजना

१. निवडणुकांमध्ये महिला उमेदवारांना जास्तीत जास्त संख्येने निवडणूक लढविण्यासाठी उभे करावे. महिला उमेदवारांचा सहभाग जास्तीत जास्त असावा. पक्षांनी जास्तीत जास्त महिला उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभ्या कराव्यात.

२. सत्तेवरील पक्षाने भ्रष्टाचार रोखण्यासाठी तसेच महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात. महागाई रोखण्यासाठी प्रयत्न करावेत.

३. पक्षांनी फेसबुक, ट्विटर तंत्रज्ञानाचा वापर फक्त निवडणूकीच्या काळापुरता करू नये.

## ६.३ – गृहितकांची पडताळणी

१. पुणे शहर विधानसभा निवडणूक २०१४ मधील सत्तांतराला आघाडी सरकार (काँग्रेस + राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी) यांच्यावरील जनतेमधील असंतोष कारणीभूत आहे.

२. पुणे शहर, विधानसभेच्या निवडणूकीवर मोदी लाटेचा प्रभाव होता.

३. महिलांची असुरक्षितता, महागाई, घोटाळे, भ्रष्टाचार यांना जनता कंटाळली होती व त्याचे पर्यवसन भाजप सत्तेवर येण्यात झाले.

४. विधानसभा निवडणूकीवर – २०१४ जातीच्या प्रभावापेक्षा विकासाचा प्रभाव होता. ती विकासाला प्राधान्य देणारी होती.

५. स्वबळावर निवडणूक लढल्यामुळे भाजपला शिवसेनेची मदत घेऊन मंत्रीमंडळ बनवावे लागले.

६. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीवर महिलांचा प्रभाव पडला नाही.

**समारोप –**

या प्रकरणामध्ये शोधप्रबंधासाठी जे संशोधन प्रश्न होते. तसेच जी गृहितके मांडली गेली होती त्यावरील निष्कर्ष उपाययोजना तसेच गृहितकांची पडताळणी करण्यात आली आहे.

# सारांश

शोधप्रबंधातील एक अतिशय महत्त्वाचे प्रकरण म्हणजे सारांश हे असते. या प्रकरणात शोधप्रबंधात समाविष्ट असणाऱ्या प्रकरणांचा थोडक्यात सारांश देण्यात आलेला आहे.

**प्रकरण १ :**

या प्रकरणामध्ये प्रास्ताविक व संशोधन पद्धती यामध्ये संशोधन प्रश्न, संशोधन शोध प्रबंधाची उद्दिष्ट्ये व गृहितके, अभ्यास विषयातील मर्यादा, संशोधनाचे महत्त्व, संशोधन साहित्याचा आढावा, सैद्धांतिक पार्श्वभूमी, संशोधन क्षेत्राची निवड, नमुना निवड पद्धती, तथ्य संकलन व विश्लेषण याबाबत विश्लेषण केले आहे.

या प्रकरणामध्ये विधानसभा निवडणूक २०१४ अन्वयाने सत्तापालटाच्या कारणांचा शोध घेतला आहे. आघाडी सरकारविरोधातील असंतोष, महागाई, भ्रष्टाचार, गैरव्यवहार, घोटाळे, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, भ्रष्टाचार विरोधातील जनआंदोलने, मोदी लाटेचा प्रभाव, मल्टिमिडियाचा प्रभावी वापर इ. संबंधी विश्लेषण केले आहे.

प्रकरण एक मधील प्रास्ताविक मधे जनतेचे सार्वभौमत्व मतदानाचा अधिकार वापरून जनता कशा प्रकारे शासनाला नियंत्रीत करू शकते. ह्याचे विवेचन केले आहे. तसेच १९६० ते १९७५ दरम्यानचे काँग्रेसी व्यवस्थेचे वर्णन, १९७० नंतरचे महाराष्ट्रातील राजकारण, त्यावेळच्या गटबाजीचे राजकारण, राजकारणातील स्पर्धात्मकतेचा उदय, राज्याच्या राजकारणातील बदल कशा प्रकारचा होता यांचा आढावा घेतलेला आहे.

तसेच २०१४ विधानसभा निवडणूक या ऐतिहासिक व राज्याच्या राजकारणाला कशा वेगळे वळण देणाऱ्या ठरल्या. महिला उमेदवार निवडणूक लढविण्याबाबत अनास्था कशा प्रकारे होती. प्रत्येक पक्ष या निवडणुकीत स्वबळावर लढला आहे. परंतु शेवटी भाजप सत्तेवर आला असला तरी पुन्हा कशाप्रकारे युती करावी लागली याचे विवेचन येथे केले आहे. तसेच काँग्रेस, राष्ट्रवादी आघाडी सरकारचा दारूण पराभवास आघाड्यांचे राजकारणच कशा प्रकारे कारणीभूत आहे. त्यांनी केलेले घोटाळे, गैरव्यवहार कशा प्रकारे कारणीभूत आहेत. हे सरकार या काळात निष्क्रिय कसे होते. काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारवरील लोकांची नाराजी. तसेच सहाच महिने आधी झालेल्या लोकसभा निवडणूकीतील भाजपचा विजय, जनतेमधील राजकीय जागृती होण्यास कारणीभूत पार्श्वभूमी - भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलने, त्यांना मिळालेला प्रचंड प्रमाणातील पाठिंबा व शेवटी पुणे शहर निवडणुकीचा संपूर्ण आढावा याबाबत प्रास्ताविक या प्रकरणात केलेले आहे.

**१.१ –** मधे संशोधिकसमोर शोधप्रबंधासाठी संशोधन करत असताना जे प्रश्न निर्माण झाले होते त्याचे विवेचन केले आहे. ते प्रश्न असे की काँग्रेस, राष्ट्रवादी, मनसे, शिवसेना, बहुजन महासंघ, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया इनके पक्ष असताना भाजपालाच सत्ता मिळाली व त्याचबरोबर भाजपप्रणित महाआघाडी सत्तेवर का आले नाहीत.

**१.२ –** मोदी लाट म्हणजे काय ? मोदी लाटेचा प्रभाव जनतेवर होता म्हणजे काय? महाराष्ट्रातील जनतेत युपीए आघाडी बाबत असंतोष आहे का? त्यामागे कोणती कारणे असावीत. भाजपाचे सरकार

येण्याआधी सत्तेवर असणाऱ्या काँग्रेस, राष्ट्रवादी सरकारने जनतेसाठी जनकल्याणाच्या कोणत्या योजना राबविल्या नाहीत का? तसेच फक्त १३ व्या विधानसभा निवडणुकीमध्ये पुणे शहरातून भाजप या पक्षाने महिलांना उमेदवारी दिली, इतर पक्षांनी महिला उमेदवार निवडणुकीसाठी का उभ्या केल्या नाहीत. तसेच महायुती म्हणजे काय? महायुतीमध्ये येणारे पक्ष कोणते आहेत. महायुतीचा पाठिंबा भाजपला होता का. म्हणून भाजप सत्तेवर आला हे प्रश्न संशोधिकापुढे होते.

**१.३ संशोधनाची उद्दिष्टे** – सांगितली आहेत ती म्हणजे पुणे शहर विधानसभा निवडणूक २०१४ चा समग्र आढावा घेणे. सत्तांतराची कारणे अभ्यासणे, २०१४ विधानसभा निवडणुकीमध्ये जातीपेक्षा विकासाला प्राधान्य दिले होते का? उमेदवार निवडणूकीसाठी उभे करताना जातीचा विचार केला होता का? याचा अभ्यास करणे. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४ मध्ये सक्रिय सहभागी असलेल्या पक्ष व गटातटांचा आढावा घेणे विधानसभा निवडणूक – २०१४ च्या माध्यमातून लिंगभावाधारित राजकारणाचा आढावा घेणे.

**१.४ गृहितके –** पुढील १.४ प्रकरणामध्ये संशोधिकेने गृहितके मांडली आहेत. ती अशी, पुणे शहर विधानसभा निवडणूक २०१४ मधील सत्तांतराला काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारमधील प्रस्थापितांवरील असंतोष कारणीभूत आहे, तसेच ह्या निवडणूकीवर मोदी लाटेचा प्रभाव होता. ही निवडणूक जातीच्या प्रभावापेक्षा विकासाला प्राधान्य देणारी होती. १३ वी विधानसभेची निवडणूक लढल्यामुळे कोणत्याच पक्षाला बहुमत मिळणार नाही. त्यामुळे सत्ता स्थापनेसाठी आघाडी / युती करावी लागेल. पुणे शहरामध्ये निवडणूकीवर महिलांचा प्रभाव पडला नाही.

१.५ संशोधनाचे महत्त्व : या मध्ये संशोधनाची गरज व महत्त्व कळण्याच्या दृष्टीने मोदीलाटेचा विधानसभा निवडणूकीवरील प्रभाव, निवडणूक यंत्रणेची कार्यक्षमता, शिवसेना-भाजप युती, काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी तुटल्यामळे मतविभागणीवरील परिणाम, विधानसभा निवडणूक २०१४ पुणेशहराच्या अनुषंगाने आचारसंहिताभंगाचे स्वरूप हे कळण्याच्या दृष्टीने या संशोधनाची गरज महत्त्व, पुणे शहरातील जे उमदवारे निवडून आले त्यामागील कारणांचा शोध, पुणे विधानसभा मतदारसंघाचे जातीनिहाय वर्गीकरण, जातीचा प्रभाव, निवडणूकीमध्ये प्रचाराची साधने, प्रत्येक मतदारसंघातील समस्यांचे ज्ञान, विधानसभा निवडणूकीवर जातीच्या प्रभावापेक्षा विकासाचा प्रभाव होता का? ह्या मुद्द्यांचा शोध येथे मांडलेले आहेत.

**१.६** सैद्धांतिक पार्श्वभूमी यामध्ये विविध राजकीय विचारवंतांनी निवडणूक विषयक हे सिद्धांत मांडले जसे की पो लॉक, मार्शल यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**१.७** संकल्पनांची कार्यवाही व्याख्या : या प्रकरणात निवडणूका म्हणजे काय, राज्यघटनेतील निवडणूकासंदर्भातील कलमे कोणती आहेत. तसेच मतदार यादी बाबत राज्यघटनेतील कलमांबाबत तसेच मतदारसंघाच्या निर्मितीबाबत, रचनेबाबत. प्रौढमताधिकार त्याच्या राज्यघटनेतील कलमाबाबत तसेच मताधिकाराची पात्रता वय यांबाबत सांगितले आहे. विधानसभेच्या निमितीर्ची कारणे, रचना निवडणूकीच्या आयोग बाबत राज्यघटनेतील कलम निवडणूक आयोगाची कार्ये, आचारसंहिता म्हणजे काय, आचारसंहिता कधी लागू होते, आचारसंहिता पालनामध्ये कोणकोणत्या गोष्टी समाविष्ट आहेत

याबाबत तसेच भारतातील आघाड्या, युपी.ए. तसेच, एन. डी. ए. या आघाडड्यांबाबत व त्यात समाविष्ट असणाऱ्या पक्षांबाबत थोडक्यात विधान केले आहे.

**१.८** – या प्रकरणात अभ्यास विषयातील मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. त्या म्हणजे प्रस्तुत संशोधन हे केवळ कसबा व पर्वती या मतदारसंघापुरतेच मर्यादित आहे. तसेच प्रस्तुत शोध हा १०४ नमुन्यांपुरताच मर्यादित आहे.

भविष्यात संशोधन कर्त्यास माहितीचा दुय्यम स्त्रोत म्हणून उपयोग.

पुणे शहर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीचा संपूर्ण आढावा घेतला आहे. यामध्ये पुणे शहराची ओळख करून दिली आहे. विधानसभा मतदारसंघ हद्दीचा परिसर, निवडणूकीस उभे राहिलेले उमेदवार, निवडणूकीवरील जातीचा प्रभाव, पुणे शहर निवडणूक यंत्रणा, पुण्यातील खास प्रचारसभा, पुण्यातील मागील विधानसभा निवडणूकांचा आढावा व विधानसभा निवडणूक २०१४ चा निकाल ह्या सर्व गोष्टींचा आढावा घेतला आहे.

**प्रकरण २ :**

''२०१४ विधानसभा निवडणूक एक चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ पुणे शहर'' ह्या शोधप्रबंधाचे संशोधन करीत असताना आगलावे प्रदिप यांचे पुस्तक, सामाजिक संशोधन पद्धती तसेच आधुनिक भारतातील सामाजिक समस्या. ह्या पुस्तकाचा संशोधिकेस खूप उपयोग झालेला आहे. तसेच प्रा. बी.व्ही. पाटील यांचे 'भारतीय राज्यव्यवस्था : महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह' तसेच भोळे भा. ल. यांचे भारताचे शासन आणि राजकारण गोखले आर. एम., तसेच गोखले शरदचंद्र यांच्या 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण' तसेच 'आढावा सत्तांतराचा' या पुस्तकांचादेखील संशोधिकेला उपयोग झालेला आहे. तसेच जनमानसाची शिदोरी ह्या मासिकाचा देखील खूप उपयोग झालेला आहे. तसेच खांदवे एकनाथ यांच्या 'लढा लोकपालचा – उद्रेक आम आदमीचा' त्याचप्रमाणे राजदीप सरदेसाई यांच्या देशाच्या चेहरा बदलणारी निवडणूक, सुलभा ब्रम्हे यांचे 'शासनपुरस्कृत लूट' या पुस्तकांचा तसेच www.eci.gov.in या वेबसाईटचा देखील संशोधिकेला संशोधन शोधप्रबंध लिहिताना मोठ्या प्रमाणात उपयोग झालेला आहे.

**प्रकरण ३** व **प्रकरण ४ :**

शोधप्रबंधाची व्याप्तीमध्ये पुणे विधानसभा मतदारसंघांचा संपूर्ण आढावा, मतदारसंघ ओळख, हद्दीचा परिसर, मागील मतदार संघातील निवडणुकीचा निकाल, उभे राहिलेले उमेदवार, जिंकलेले, पराभूत उमेदवार, प्रचार साहित्यामधील नाविन्यता, निवडणूक यंत्रणेची कार्यक्षमता, राबविलेल्या योजना, आचारसंहिता व उमेदवारांवर दाखल झालेले गुन्हे इ. संदर्भात संपूर्ण आढावा घेतला आहे. सत्तांतराची कारणे शोधली आहेत.

शोधप्रबंधाच्या व्याप्ती यासाठी आहे की त्यामध्ये सामाजिक संस्था, राजकीय संस्था यांना विविध प्रकारचे प्रकल्प राबविण्यासाठी मदत.

**प्रकरण ५ :**

यामध्ये संशोधन करीत असताना माहितीचे संकलन, माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन कोणत्या प्रकारे केले आहे याचे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे.

या प्रकरणात वय दर्शविणारी सारणी, लिंग, जात-धर्म, मतदारसंघाचे नाव दर्शविणारी सारणी, सत्तापालटाबाबत अपेक्षा दर्शविणारी, काँग्रेस विरोधातील असंतोष दर्शविणारी, विकासाला प्राधान्य दर्शविणारी सारणी, मोदी लाटेचा विधानसभेच्या निवडणूकीवर झालेली परिणाम दर्शविणारी सारणी, उमेदवाराची योग्यता दर्शविणारी सारणी, आचारसंहिता भंगाच्या गुन्ह्यांची टक्केवारी दर्शविणारी सारणी, महिलांचा निवडणुकीवरील प्रभाव दर्शविणारी सारणी, महायुतीचा भाजपाला असलेला पाठिंबा दर्शविणारी सारणी इत्यादी सारख्या बनवून त्यानुसार निष्कर्ष काढून अन्वयार्थ लावण्यात काढण्यात आलेला आहे.

**प्रकरण ६ :**

प्रस्तुत संशोधन शोधप्रबंधामधील सर्व प्रकरणांचा सारांश देण्यात आलेला आहेत. यामध्ये संशोधनाचे निष्कर्ष उपाययोजना तसेच गृहितकांची पडताळणी करण्यात आली आहे. तसेच संशोधनासाठी उपयोगी पडलेल्या परिशिष्टांची यादी जोडण्यात आली आहे. ही परिशिष्टांची यादी भारतीय निवडणूक आयोग तसेच सेंटर फॉर स्टडी ऑफ डेव्हलपिंग स्टडीज - सी एसडीएस यांच्याकडून घेण्यात आलेली आहे.

**संदर्भसूची :**

संदर्भग्रंथ सूची दिली आहे. यामध्ये संशोधन करीत असताना ज्या संदर्भग्रंथांचा वापर करण्यात आला त्यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

**परिशिष्ट :**

शेवटी परिशिष्टे/अनुसूची जोडण्यात आली आहे. तसेच प्रचाराचे फोटो, जाहिरनामे जोडण्यात आले आहेत.

# संदर्भ ग्रंथसूची:


१) राजदीप सरदेसाई, २०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन पान नं. २०

- ओ.पी. गाबा 'ॲन इंट्रडक्शन टू पोलिटिकल थिअरी राजनीतिशास्त्र परिचय' – मराठी अनुवादक – प्रा. तुकाराम जाधव – के सागर पब्लिकेशन – आवृत्ती २ री सन २०११
- आगलावे, प्रदीप – 'आधुनिक भारतातील सामाजिक समस्या' – विद्या प्रकाशन, नागपूर ङ्ग प्रथम आवृत्ती – २००१
- आगलावे, प्रदिप – 'सामाजिक संशोधन पद्धती' – साईनाथ प्रकाशन – नागपूर, २००७
- बजले, धनंजय. 'लढा लोकपालचा – उद्रेक आम आदमीचा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे पान – ११०, पान ९ ते २४
- ब्रम्हे, सुलभा. 'शासनपुरस्कृत लूट', तृतीय आवृत्ती – सप्टेंबर २०१४, पान २, ३, ५, ७
- गोखले, शरदचंद्र– 'आढावा सत्तांतराचा' प्रकाशक : केसरी प्रकाशन, आवृत्ती : पहिली, ऑगस्ट १९९०
- गोखले, आर.एम. – 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण' प्रथमावृत्ती
- भारतीय राज्यव्यवस्था : 'महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह' – प्रा. बी.व्ही. पाटील : के सागर पब्लिकेशन्स – पुणे २००८.
- भोळे, भा.ल. – 'भारताचे शासन आणि राजकारण', पिंपळपुरे प्रकाशन, नागपूर १९८९
- व्होरा, राजेंद्र व पळशीकर, सुहास – 'राज्यशास्त्र कोश – दास्ताने रामचंद्र आणि कंपनी' पुणे (१९८७) पृ.क्र. १३६.
- फडके, य.दि. – 'लोकसभा निवडणूक १९५२ ते १९९९', अक्षर प्रकाशन, मुंबई ऑगस्ट १९९९ पृष्ठ क्र. ९५
- व्होरा, राजेंद्र व पळशीकर, सुहास. 'महाराष्ट्रातील सत्तांतर', आवृत्ती पहिली १ जाने १९९६ ग्रंथाली प्रकाशन, प्रकाशन क्र. १०८
- ठाकरे, माणिकराव. 'शिदोरी– जनमताचा कौल मान्य– विधानसभेसाठी नव्या कार्यक्रमांची गरज' पान ५
- विखे पाटील, राधाकृष्ण. 'शिदोरी – दुसरी हरितक्रांती', पान १८ व १९.
- दर्डा, राजेंद्र– 'शिदोरी – शिक्षण हक्क कायद्याची प्रभावी अंमल बजावणी', पान – २६, २७, २८
- खांदवे, एकनाथ. 'महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण', प्रकरण – ४ थे, निवडणूका – पान नं. १७२

- खांदवे, एकनाथ. ‘महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण’, प्रकरण – ४ थे, निवडणूका – पान नं. १७८
- सरदेसाई, राजदीप. ‘देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक’ अक्षर प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१४

# अनुसुची

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

सामाजिक शास्त्रे विद्याशाखा एम् फिल अभ्यासक्रम

''सन-२०१४ विधानसभा निवडणूक एक चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ पुणे शहर''

संशोधक विद्यार्थीनी - रती शिरोळे

संशोधन मार्गदर्शक - डॉ. माणिक सोनावणे

मुलाखत अनुसूची

१) नाव -

२) वय -

अ) १८ ते २८

ब) २९ ते ३९

क) ४० ते ४९

ड) ५० ते ५९

इ) ६० च्या वर

३) स्त्री/पुरुष -

अ) स्त्री

ब) पुरुष

१) जात / धर्म -

२)

५) तुमच्या मतदार संघाचे नाव -

१) हडपसर विधानसभा मतदारसंघ

२) कसबा विधानसभा मतदारसंघ

३) शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ

४) कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघ

५) कोथरुड विधानसभा मतदारसंघ

६) पर्वती विधानसभा मतदारसंघ

७) वडगावशेरी विधानसभा मतदारसंघ

८) खडकवासला विधानसभा मतदारसंघ

६) केंद्रातील भाजपा सरकार तसेच पुणे शहरामध्ये भाजपाला आठही जागा मिळाल्या हा सत्तापालट तुम्हाला अपेक्षीत होता का, ह्या सत्तापालटामागे कोणती कारणे आहेत असे तुम्हाला वाटते.

अ) होय ब) नाही

७) सत्तापालट होण्यामागे काँग्रेस विरोधातील असंतोष कारणीभूत आहे का?

अ) होय ब) नाही

८) विधानसभा निवडणूक २०१४ जातीच्या प्रभावापेक्षा विकासाला प्राधान्य देणारा होता का असे तुम्हाला वाटते का?

अ) होय ब) नाही

९) मतदारसंघात आजपर्यंत कोणकोणती विकासकामे झाली आहेत. ती परिपूर्ण वाटतात का?

अ) होय ब) नाही

१०) तुमच्या मते 'मोदी लाटेचा विधानसभेच्या निवडणूकीवर परिणाम झाला का?

अ) होय ब) नाही

११) तुमच्या मतदारसंघातून निवडून आलेला उमेदवार योग्य आहे का तुमचे मत सांगा. यापूर्वी त्या मतदारसंघात कोणकोणती कामे केली आहेत.

अ) होय ब) नाही

१२) तुमच्या मतदारसंघातील निवडणूक यंत्रणा कार्यक्षम होती का. कशाप्रकारे ?

अ) होय ब) नाही

१३) आचारसंहिता भंगाचे गुन्हे तुमच्या मतदारसंघात घडले का. स्वरुप लिहा.

अ) होय ब) नाही

१४) महिलांना उमेदवारी देण्यासाठी पक्षांनी टाळाटाळ केली काय असे तुम्हाला वाटते काय महिलांचा प्रभाव 'विधानसभा निवडणूक २०१४' च्या निवडणूकीवर पडला होता का.

अ) होय ब) नाही

१५) महायुतीच्या पाठिंब्यामुळे भाजपाला सत्ता मिळविणे शक्य झाले असे तुम्हाला वाटते का?

अ) होय ब) नाही